म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र २६४८
IRBK-0102648
IRBK-0102648
IRBK-0102648

1964
-1947
-17 years ago
DRAMA

# संगीत
# संशय–कल्लोल नाटक

संगीत
संशय - कल्लोल नाटक
म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ३५८८ हे पुस्तक
दि.

कै० गोविंद बल्लाळ देवल

दुर्गा, झुंजारराव, संगीत मृच्छकटिक, शापसंभ्रम, शारदा, विक्रमोर्वशीय इत्यादि नाटकांचे कर्ते

यांनीं रचिलें.

IRBK-0102648
IRBK-0102648

आवृत्ति चवथी
सन १९४७ इसवी.

या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क प्रकाशकानें आपल्याकडे ठेविले आहेत.

मूल्य १॥ रुपया

## – आभार –

ही चवथी आवृत्ति काढण्याचा योग ज्या महाराष्ट्रीय रसिकां कृपेनें येत आहे त्यांचा मी सदैव ऋणी आहे. त्यांनीं मजवर कृपालोभ सदैव ठेवावा हीच विनंती..

दिनांक २३ मे
१९४७
सांगली

सर्वांचा कृपाकांक्षी,
**रामचंद्र गोविंद देवल**
प्रकाशक

मुद्रक :
**श्री. माधवराव तेंडुलकर**
**पब्लिसिटी प्रिंटिंग प्रेस**
मोदी चेंबर्स, फ्रेंच ब्रिज, मुंबई ४

प्रकाशक :
**रामचंद्र गोविंद दे**
सांगली

संशय-कल्लोळ

संगीत

# संशय-कल्लोल नाटक.

## अंक पहिला

### प्रवेश १ ला.

नांदी (आलनवी)

सौख्यसुधा वितरो ॥ सदा नव ॥ तुम्हां सदाशिव ॥ हिमगिरिजाधव
साधुजनांचा ताप परिहरो ॥ ध्रु० ॥ स्वकरें निज शिरिं गंगा बसवी ॥
मत्सरभावें सतीस रुसवी ॥ शशि लक्षिसि तूं आशिवे केवीं ॥
पुसे रुसे तो भवि तारो ॥ १ ॥

साकी

बलवत्पदनत गोविंदानें संगीतीं नटविलें ॥
संशय-कल्लोलाख्य सुनाटक हास्यरसें आश्रयिलें ॥
प्रयोगरूपें तें ॥ श्रवणेक्षणिं ध्या स्थिरचित्तें ॥ १ ॥

पद

[ नांदीनंतर साधु-प्रवेश करून ]

हृदयिं धरा हा बोध खरा ॥ संसारीं शांतिचा झरा ॥ ध्रु० ॥
संशय खट झोटिंग महा ॥ देउं नका त्या ठाव जरा ॥ १ ॥
निशाचरी कल्पना खुळी ॥ कवटाळिल ही भीति धरा ॥ २ ॥
बहुरूपा ती जनवाणी ॥ खरी मानितां घात पुरा ॥ ३ ॥

आमच्या कार्तिकनाथाच्या दीपोत्सवाकरितां बाईसाहेबांनीं एक मण तेल देण्याचं कबूल केलं —

**फाल्गुनराव**—[ पडद्यांत ] जा येथून, तुला कांहीं मिळणार नाहीं.

**साधु**—अहो, असे उगीच अंगावर कां येतां ? बाईसाहेबांनीं कबूल केलं, म्हणून मी मागायला आलों.

**फाल्गुनराव**—[ पडद्यांत ] नुसते ढोंगी—

**साधु**—तुम्हांला धर्मादाय करायचा नसेल तर करूं नका. उगीच संशय कां घेतां ? ही संशयाची वृत्ति दानधर्माच्या आड येऊन पुण्यक्षय करते, इतकंच नव्हे तर संसारांतील रोजच्या कृत्यांतहि हें संशयाचं पिशाच्च मुखांत माती कालवतं. नका करूं दानधर्म, मी जातो, पण तुमचेहि स्वतःचे कल्याणासाठीं माझा बोध ध्यानांत ठेवा.

**हृदयिं धरा हा बोध खरा ॥—** ( जातो. )

**फाल्गुनराव**—[ बाहेर येऊन ] अरे ढोंग्या—

पद

शिणवुं नको कंठ असा ॥ तृषित न मी बोधरसा ॥ ढोंग्या राही, उमाही, जरासा ॥ ध्रु० ॥ साधु न तुम्ही, भोंदु चोर ॥ धूर्त कपटी शठ कठोर ॥ पाडितसां व्यसनिं थोर ॥ देवखुळ्या स्त्रीपुरुषां ॥ १ ॥

चल निघ. समजलों. माझ्या बायकोला कोणाचा तरी निरोप पोंचवायला, नाहीं तर चिठ्ठीचपाटी द्यायला, कुणी तरी आला असेल झालं. ती तरी कसली हिकमती !

९ १९६२

आज म्हणे मावशीला भेटायला जातें, आज बहिणीचा निरोप आला होता, आज काय आत्याबाईनं बोलावणं पाठवलंन्; दररोज नवी युक्ति काढीत होती; पण आतां त्यातली एक देखील युक्ति चालू द्यायचा नाहीं म्हणावं. आणि एवढ्यासाठीं तर या विशाखपुराबाहेरच्या स्वतःच्या बंगल्यांत येऊन राहिलों. हों, अशा बायकोला शहरांत राहून जपणार किती ? त्यांतून चंगी भंगी छत्तिसरंगी अशा लोकांचा सुळसुळाट अलीकडे तर अगदीं अनावर झाला आहे. रामदास, हरदास, पुराणिक, वेदांती, ब्रह्मचारी, एकापेक्षां एक बिलंदर ! तें कांहीं नव्हे. मी केलं हेंच फार उत्तम ! तिला बाहेर जायला नको आणि तिच्याशीं कुणी बोलायला नको. यांत मला मात्र पाहारा करावा लागतो, पण तो पुरवला. आतां एकटं जें बसायचं तें तिला हांक मारून दमयंतीचं चरित्र तरी वाचायला सांगावं. अग ए, त्या आंतल्या चंदनी पेटींत वरतींच एक पुस्तक आहे, तें घेऊन ये पाहूं. ऐकलस का ग ? अरे ! ओ देत नाहीं. ( दाराकडे जात ) कां, आतां मौनव्रत धरणार वाटतं ? अं, इथेंहि दिसत नाहीं ! अग, ए, कुठें आहेस ग ? ( इकडे तिकडे पाहून ) गेली वाटतं ! दिल्यान तुरी हातावर ! भादव्या, अरे ए भादव्या, भादव्या, चल लवकर. फाल्गुनराव, बसा आतां हांका मारीत ! ए भादव्या, आलास कीं नाहींस रे ? हा सुद्धां चोर तिलाच सामील झाला वाटतं ! ( भादव्या येतो त्यास ) कायरे, कुठें आहे ती ?

**भादव्या**—मागल्या दारनं कार्तिकनाथाच्या देवळाकडे गेल्या धनीसाहेब.

**फाल्गुन**—मागल्या दारानं ! भादव्या, जा आधीं, आत्तांच्या आत्तां गवंड्याला बोलावून घेऊन ये, आणि तो दरवाजा आधीं बंद करून टाक. आजपासून नियम; दोन दरवाजांच्या घरांत म्हणून रहावयाचं नाहीं. या दरवाजावर बसलों तर त्या दरवाजानं गेली ! अशा सतरा दारं आणि तेहतीस खिडक्यांच्या घरांत नवऱ्याला शंभर डोळे असले तरी कसे पुरणार ? तूं काय म्हटलंस ? कार्तिकनाथाच्या देवळांत गेली ?

**भादव्या**—होय धनीसाहेब.

**फाल्गुन**—अगदीं नटून सजून गेली का रे ?

**भादव्या**—म्हणजे कशा धनीसाहेब ? रोजच्याप्रमाणं गेल्या.

**फाल्गुन**—आंगावर सगळे दागिने होते का ? तो बुट्टीचा शालू नेसली होती का ? नाकांत नवी नथ होती का ? आंगावर तो बादली शेला होता ?

**भादव्या**—होय, होता धनीसाहेब.

**फाल्गुन**—झालं तर. आणखीं काय पाहिजे ?

**भादव्या**—या आपल्या बोलण्याचा रोख निराळा दिसतोय्. उमेट म्हणून दोन तोंडांत मारा, पण बाईसाहेबांविषयीं इतकी बारीक चौकशी करणं बरं नव्हे सरकार. मी चाकर माणूस; पण अलीकडे आपली बाईसाहेबांवर इतराजी झाल्यासारखी दिसते.

**फाल्गुन**—इतराजी झाली असती तर तिनं इतके देव्हारे कशाला माजविले असते ? मी बायल्या होऊन, भुंग्याप्रमाणं तिच्या भोंवतीं पिंगा घालायला लागलों, असं तिच्या लक्षांत येतांच तिनं मर्यादेचा बुरखा दिलान् झुगारून, आणि लागली नाचायाला हवी तशी ! मींच जर प्रथम तिला करड्या नजरेनं उठतां लाथ आणि बसतां बुक्कीचा खुराक चालू केला असता, तर माझ्या करड्या घोडीप्रमाणं ती कह्यांत राहिली असती. पण म्हटलं, शिकली संवरलेली आहे, घरंदाजाची आहे, तेव्हां भलतीच खोड असायची नाहीं. पण शिकण्यावर काय आहे ? वरच्या रंगानं आतलं रूप थोडंच पालटतं ? खापरी ती खापरीच.

**भादव्या**—गुन्हा माफ असावा धनीसाहेब. बाईसाहेबांना नांव ठेवायला एक तिळाएवढीं जागा दिसत नाहीं. मग आपण भलतीच खोड कोणती म्हणतां ती भगवानाला ठाऊक.

**फाल्गुन**—तिला नांव ठेवायला तुला तिळाएवढीं जागा दिसत नाहीं; पण मला भोंपळ्याएवढीं दिसते, त्याला काय करतोस ? ह्या गोष्टी कोणापाशीं बोलायच्या नाहींत; कारण गृहच्छिद्रं आहेत हीं. पण तूं माझा जुना, इनामी, विश्वासांतला नोकर म्हणून तुला मसलतींत घेतो. हें बघ, तिनं माझ्या काळजाला घरें पाडली आहेत, तिनं माझ्या तोंडाला काजळ फासायचा घाट घातला आहे.

**भादव्या**—छे: छे: छे: छे: ! धनीसाहेब, आपल्या मनांत जेव्हां अशा विपरीत कल्पना येतात, तेव्हां त्यांच्यावर खास देवाचा कोप झाला. आपण कशावरून

म्हणतां तें म्हणा, पण मी तर फूल उचलून सांगतों कीं, आपला संशय अगदीं पोकळ-फोल टरफल आहे. त्यांत कांहीं खरं नाहीं.

**फाल्गुन**—पोकळ संशय म्हणतोस ? अरे ! परवां जेष्ठांच्या लग्नांत वरातीच्या दिवशीं तिच्या काय चेष्टा चालल्या होत्या त्या मी या डोळ्यांनीं पाहिल्या आहेत. कांहींतरी कारण काढून मधेंच हंसायचं, माझ्याकडे बघून नाक मुरडायचं, मोठ्या नखऱ्यानं इकडे तिकडे मिरवायचं, पुरुषाच्या अंगाला मुद्दाम लगटून जायचं; अरे, अशा एक कां हजार गोष्टी ! लग्न झाल्यावर कांहीं दिवस अशी चोख वागली कीं, पिंजारलेल्या मोरपंखाच्या डोळ्याप्रमाणं परपुरुषाच्या डोळ्याला डोळा ठरायचा नाहीं ! पण अलीकडे तो सभ्यपणा, ती मर्यादा, ती लज्जा सारी नाहींशीं झाली ! इतकं कशाला ? आतां ती मला विचारल्याशिवाय कार्तिकनाथाला कां गेली ?

**भाद्र्या**—फार दिवसांत जायला झालं नाहीं म्हणून गेल्या असतील. त्यांत काय आहे ?

**फाल्गुन**—त्यांत काय ? तूं पागल आहेस. तुला कळत नाहीं. देवाचं दर्शन घ्यायला नव्हे, तर या वेळीं देवळांत घिरट्या घालणाऱ्या सोद्यांना आपलं दर्शन द्यायला गेली आहे. देव घरांत नव्हते कां ? पण अशा बायकांना नट्टापट्टा करून देवळांतच गेलं पाहिजे. सारी लफंगी मंडळी या वेळेला तेथें जमायची !

**भाद्र्या**—अन्याय ! अन्याय ! अन्याय ! धनीसाहेब अन्याय करतां आहां ! हीच बाईसाहेबांची निंदा दुसऱ्यांनीं कुणीं केली असती तर खून पाडला असतां इथं खून !

**फाल्गुन**—अरे चोरा, मिलाफ्या, त्या लबाड ठकड्या बायकोची तरफदारी करतोस काय ? माझा पगार आणि तिची नोकरी !

**भाद्र्या**—सरकार, हा माझा राम राम नोकरीला ! द्या मला हुकूम. कुठेंहि राबून पोट भरीन; पण बाईसाहेबांसारख्या शुद्ध, निर्मल बायकोला लबाड म्हणणाऱ्या धन्याची भाकरी नाहीं खायचा. करा माझा पगार चुकता. हा मी चाललों. ( पथारी, तांब्या, कांबळें, धोतर, गोळा करूं लागतो. )

**फाल्गुन**—( आपल्या मनाशीं ) या गुलामाला इतक्यांत बुजावून उपयोग नाहीं. जरा चुचकारून घेतला पाहिजे. कारण, खरी खोटी खात्री असल्याशिवाय

हा नोकरी सोडायला तयार व्हायचा नाहीं; आणि मी तरी असं प्रत्यक्ष काय पाहिलं आहे! अजून हें माझं कदाचित् तर्कटहि असेल. (उघड) तशी मी तिला अजून लबाड ठरवीत नाहीं रे! पण हीं लक्षणं वाईट कीं नाहींत? बायकांची जात. लगाम ढिला सोडून उपयोगी नाहीं, इतकच म्हणणं माझं. ठेव तें सगळं जिथल्या तिथं.

**भादव्या**--(ठेवीत) हं, हें आपलं ह्मणणं रास्त दिसतं. धनीसाहेब, माझी अक्कल किती? पण कांहीं पाहिल्यावांचून असा संशय धरणं आपल्यासारख्या थोरांना जरा---

**फाल्गुन**--(लटकें हंसत) हा बावळटा! हें सगळं खरं समजलास वाटतं? इतका वेळ मी तुझं मन बघण्यासाठीं तसं बोलत होतों. बरें तूं जा आतां; आणखी कुत्र्याला फिरवून आण. जाऊन आलास ह्मणजे तुला दुसरं कांहीं जरूरीचें काम सांगायचं आहे.

**भादव्या**--बरं तर, कुत्र्याला फिरवून हा आलोंच बघा धनी साहेब. (जातो.)

**फाल्गुन**--(गेला असें पाहून) खात्रीनें सांगतों, माझ्या बायकोनं याला पैसा दाखविला आणि त्याला हा लालचावला. बरं आहे म्हणावं! कुठं गेली म्हणाला हा? कार्तिकनाथाच्या देवळाकडे काय? असाच जातों आणि असेल तशी पकडून आणतों तिला. खांबाशीं जखडून टाकलं नाहीं तर नांव दुसरं! पण फाल्गुनराव, अशा अवदसेशीं लग्नच केलं नसतंस तर?

### पद

(शंका घोसि घोर)

खोटी बुद्धि कावें झाली ॥ भर्टी लग्नघटि खोटी धरिली ॥ वरिली स्त्री ती खोटि निघाली ॥ ध्रु० ॥ थोर कुळावरि भाळुनि गेलों ॥ बाह्य सुशिक्षण रूपा दिपलों ॥ पाय पुजुनि घरिं कृत्या आणिली ॥ १ ॥

# प्रवेश २ रा.

( आश्विनशेट स्वतःशीं बोलत फिरतो. )

**आश्विन**—मी आज करणार आहें, त्या गोष्टीला माझा जिवलग मित्र वैशाखशेट याचासुद्धां मनापासून सल्ला नाहीं. आणि त्याचंहि म्हणणं वाजवीं आहे. कारण अशा प्रसंगीं राजरस्ता सोडून मी जर मुद्दाम विकट पायवाटेनं जायचं मनांत आणलं, तर तें त्याला कसं पसंत पडणार? पण करावं काय? ऐनपंचविशीच्या जवानींत लागोपाठ तीन बायका दगावल्या. वेल लावावी, खतपाणी घालावं आणि अशी कुठं फुलाफळाला येते न येते तोंच अचानक कांहीं रोग पडून मरून जावी, तशांतला माझ्या तिन्हीं बायकांचा प्रकार झाला. शेवटीं अगदीं जिकीरीस येऊन माघमाघेश्वर म्हणून कोणी हिंदुस्थानांतले एक नामांकित ज्योतिषी आले होते, त्यांनाहि पत्रिका दाखविली. पत्रिका पाहतांच त्यांनीं सांगितलं कीं, 'तुम्हाला मंगळ अत्यंत अनिष्ट असून भार्यास्थानावर सर्व दुष्ट ग्रहांची पूर्ण दृष्टि आहे. अर्थात लग्नाची बायको कांहीं तुम्हाला लाभावयाची नाहीं. तेव्हां या भानगडींत पडूं नका; लग्नांत कांहीं प्रकार करून पाहिलात तर मात्र स्त्रीसुखाचा संभव दिसतो.' हें त्यांचं पत्रिकावाचन मला पटून लग्नाचा बेत अजिबात सोडून दिला. आणि ज्योतिषीमहाराजांनीं सुचविल्याप्रमाणें एखादी उत्तम चालीरितीची नायकिणीची मुलगी पाहून, तिच्याशीं विवाहाच्या स्त्रीप्रमाणं संसारसुख घ्यावं असा निश्चय केला. माझ्या सुदैवानें मघा नायकिणीची मुलगी रेवती ही हवी होती, त्यापेक्षां दसपट चांगली मिळाली. जवळ जवळ एक महिनाभर तिच्या घरीं राबता ठेवून परीक्षा पाहिली. पण तिच्यांत व्यंग असं तर दिसलं नाहींच, उलट तिच्या मनांत माझ्यासारख्या एका गृहस्थाशीं लग्नाच्या स्त्रीप्रमाणं संबंध ठेवून, जन्मभर संसार करावा असं असून, गेलीं तीन वर्षे ती अगदीं कडकडीत कुमारिकाव्रतानं राहिली आहे. योगायोग जुळून यावयाचा म्हणजे असा येतो झालं. काल मन मोकळं करून प्रत्यक्ष दोघांचं बोलणं झालं. नक्की रुकाराची वचनभाक इथें येऊन, श्रीरमाकांतासमोर देतें असं सांगून निघून गेली. ( कान देऊन ) हा प्रकार एकंदरींत धर्मदृष्टीनं किंचित् गौण असला तरी, प्रेमसुखाच्या नजरेनं हा आमचा जुळणारा संबंध उत्तम आहे

असं कोण म्हणणार नाहीं ? (कान देऊन) हा रुमझुम रुमझुम मंजुळ आवाज कसला बरं ? अथवा प्रश्न कशाला ? तिच्याच पैंजणाचा ! अहाहा ! साधी चालण्याची पावलं सुद्धां कशीं तालांत पडतात. पैंजण तरी किती सुरेल आहे ! रुमझुम, रुमझुम ओ हो ! यावं यावं तृषितचातकमेघमाले ! यावं.

पद

( लावणाची चाल )

**सुकांत चंद्रानना पातली भ्रूधनु सरसावुनी ॥**
**कटाक्ष खरशर सोडुनि भेदित हृदयाचि गजगामिनी ॥**
**रदन दिसति जणुं शशिबिंबाचे खंड मुखीं खोंविले ॥**
**कुरळ केश शिरिं सरळ नासिका नेत्र कमलिनीदलें ॥**

( रेवती येते. )

**रेवती**—खाशी ! खाशी ! तान तर खूप ठेवून दिली ! इतके दिवस हा गाण्याचा गुण चोरून ठेविला होता म्हणायचा ?

**आश्विन**—या संगीत देवतेपुढं लाजेनं लपून बसला होता, तो तसाच प्रसंग आल्याशिवाय कसा बाहेर निघायचा ?

**रेवती**—मग आज प्रसंग आला वाटतं ?

**आश्विन**—हो, असं या प्रफुल्लित मुखकमलावरून वाटतं.

**रेवती**—मनांत मांडे खायला नको कोण म्हणणार ?

**आश्विन**—पण प्रत्यक्ष मिळाल्यावर मनांत कोण खाणार ?

**रेवती**—वाहवा ! अगदीं प्रासाला प्रास जुळवून भाषण चाललं आहे ! आपण ही कवीची दीक्षा घेतली तरी केव्हांपासून ?

**आश्विन**—या सद्गुणलावण्याच्या जाळ्यांत गुंतलों तेव्हांपासून.

**रेवती**—कवितेला विषय तरी कोणता असा ?

**आश्विन**—कोणता म्हणजे ? तूं, तुझं तारुण्य, तुझं रूप, तुझे गुण, तुझं हसणं, बोलणं, चालणं, सर्व तूं.

**रेवती**—तें जाऊं द्या मेलं. पुरुषांना तारीफच फार करायला पाहिजे. पण, मला आज आपण आपली तसबीर द्यायची कबूल केली होती ना? कां हो अजून नाहीं दिली?

**आश्विन**—अग, अस्सल सोडून नकल कशाला? म्हणून नाहीं दिली.

**रेवती**—चला, बोलूं नका माझ्याशीं! (रागानें तोंड वळविते.)

**आश्विन**—बस्स! याचं नांव मुरका! आतां झालं माझं काम. ही घे तसबीर (देतो.) माझ्यापेक्षां तिचंच नशीब मोठं!

**रेवती**—(पाहून हंसत) ही आपली कां तसबीर?

## पद

(जाव मोरे बैया)

**साम्य तिळहि नच दिसत मुखाचें ॥ नाम तरी कोरवा शिरावरिं ॥ ओळखुं येईल चित्र कुणाचें ॥ ध्रु० ॥ मजजवळि असे याहुनि सुंदर प्रीतिचितारिणि करिचें प्रतिबिंब सुबक या मूर्तीचें ॥ १ ॥**

**आश्विन**—दाखीव, दाखीव तर पाहूं कुठें आहे ती, म्हणजे तिच्याच हातची तुझी एक माझ्याजवळ आहे ती तुला दाखवितों. हं पाहूं!

**रेवती**—ही कोण घाई पण! ही पहा हृदयांत लटकवून ठेविली आहे.

**आश्विन**—शाबास! शाबास! मिळालं मला उत्तर! चल तर रमाकांता-समोर परस्पर वचनभाकपूर्वक करदानग्रहणाचा मंगलविधि आनंदोत्साहानं करूं.

**रेवती**—पण आपल्याला एक गोष्ट सांगायची आहे तेवढी मात्र आपण निरंतर ध्यानांत बाळगायची.

**आश्विन**—एक कां? हजारों सांग. आतां उद्योग काय दुसरा? तूं सांगणार आणि मी ऐकणार. हं, सांग सांग लवकर,

**रेवती**:—सांगायचं हेंच कीं, आपला स्वभाव थोडा उतावळा दिसतो. उगीच कांहीं तरी कल्पनेवर कल्पना रचून माझ्याविषयीं कधीं निरर्थक संशय घ्याल तर मला——

**आश्विन**—समजलों, तोंड नको असं करूंस, पण तुझ्याविषयीं संशय येईल कसा ?

**रेवती**—पण याच मंगलकालीं आपलं सुचवून ठेवतें, माझाहि स्वभाव अजून किंचित् अल्लड, थट्टेखोर आहे, तेव्हां एखादं—

**आश्विन**—आलं ध्यानांत. अशा स्वभावांत तर खरी मजा आहे.

**रेवती**—तसंच मी बरीच मत्सरी, थोडी मानी आणि जराशी रुसरी आहे, म्हणून—

**आश्विन**—मग यांत काय ? हे गुण तर संसाराला लज्जत आणतात. हं, झालं सांगून ?

**रेवती**—नाहीं आणखी शेवटचं थोडं सांगायचंय्.

पद

( हमसे नजरिया )

**प्रथम करा हा विचार पुरता ॥ आवरोनि ममता ॥ ध्रु० ॥**
**धनाढ्य आपण मान्य कुळींचे ॥ हीन कुळींची मी मज वरितां ॥ १ ॥**
**करितिल निंदा हसतिल सारे ॥ जाति धर्म कुलहि अवगणितां ॥ २ ॥**
**लग्नगांठ ही पडे एकदां ॥ न ये पुन्हां कधिं तीं सोडवितां ॥ ३ ॥**

**आश्विन**—आलं ध्यानांत. वरं चल, ( देवासमोर जाऊन )

**रेवती**—

पद ८

( निपटनिडर )

**मंगलादिनिं तन, मन, धन, दान पदिं करीतें ॥**
**सहाचरणसूचक हा कर करांत देतें ॥ ध्रु० ॥**
**स्वीकारुनि पत्निपदीं धन्य मज करावें ॥**
**आर्याव्रत सेविन ही शपथ मीहि घेतें ॥ १ ॥**

**आश्विन—**

**पद**

( भय हें नवें )

**कर हा करीं धरिला शुभांगी ॥ सुदिनीं रमाकांतासमोरी ॥ धृ ॥**
**सुखदा सदा मत्स्वामिनी तूं ॥ गृहसंपदा उपभोगि सारी ॥ १ ॥**

पण या सर्वांवर एक--

**रेवती—**छे; तें पहा तिकडून कुणी तरी येत आहे. आज रात्रीं सत्यनारायण आहे. लवकर यायचं. मी कार्तिकनाथाला जाऊन घरीं जातें.

**आश्विन—**मी येऊं का कार्तिकनाथापर्यंत ? म्हणजे मिळूनच दर्शन घेऊं.

**रेवती—**भलतंच कांहीं तरी ( डोळ्यांनीं खुणावते आणि जाते. )

**आश्विन—**अहाहा !

**पद**

( आज अंजन )

**धन्य आनंददिन पूर्ण मम कामना ॥**
**मुदित कुलदेवता सफल आराधना ॥ ध्रु० ॥**
**लाभ व्हावा जिचा लोभ धरिला महा ॥**
**प्राप्त मज होय ती युवति मधुरानना ॥ १ ॥**

( जातो. )

---

## प्रवेश ३ रा.

( फाल्गुनरवांचे घरापुढील रस्ता. )

( कृत्तिकाबाई प्रवेश करते. )

**कृत्तिका:—**मी त्यांचा डोळा चुकवून घाईघाईनें देवदर्शन घेऊन आलें. पण स्वारीनं घरीं कांहीं घोटाळा केला नसला म्हणजे पुरे. नाहीं तर कायसं म्हणतात

ना ? " ठमाबाईचे झाले बारा राम आणि घरीं नवरोजींनीं साधलं काम " त्यांतलं व्हायचं ! अगबाई ! दरवाजा लावलाय. ( धक्का मारून ) रोहिणी, अग रोहिणी, दार उघड– मेल्यांनो ! कुणी ओ सुद्धां देत नाहीं. यांनीं आरंभलं आहे तरी काय आंत ? टपतां टपतां चोर सांपडणारसं वाटतं. पण हें दार कसं उघडणार ? अग चित्रे, रोहिणी ! मेल्या वाटतं सगळ्या. आतां काय करावं ? अग दार उघडा दार. पण मी इकडं काय ओरडत उभी राहिलें ? तिकडच जाऊन छपून उभं राहावं. (जाते.)

( रोहिणी व स्वाती दार उघडून बाहेर येतात. )

**रोहिणी**—इथें तर कुणी नाहीं. मग दारावर धक्के कोण मारीत होतं तें ? स्वाती, बघितल्यास अशा इथें चमत्कारिक संशयाच्या भूतचेष्टा चालतात. पाहिलं तर दोघहि सरळ, पण या संशयसमंधाची बाधा दोघांनीहि सारखीच. बरं आतां कधीं येशील आणखी ? जरा थांबेनास कां ?

**स्वाती**—छेग बाई ! येऊन कांहीं थोडा वेळ नाहीं झाला. जातें आतां. नाहीं तर काय म्हणतात कीं नाहीं–आपण कुणबिणी–काम संभाळून सगळं करायचं. बरं पण रोहिणी, मीच काय म्हणून तुला वरच्येवर भेटायला यावं ? तूं कां एकदां तिकडे येत नाहींस ?

**रोहिणी**—मी आणि तुला भेटायला येणार ? इतकं कुठं आहे बाई माझं नशीब ! मला अशी खाष्ट धनीण भेटली आहे, इकडचं तिकडं व्हायला फुरसत मिळत नाहीं. बयाचं सारखं तोंड चाललेलं असतं. हें कर, तें कर, तें ठेव, हें आण, माडीवर जा, खालीं ये, नको नोकरी, अस्सं झालं आहे मला.

**स्वाती**—मग राहिली आहेस कशाला इथं ? कुठं तरी चाकरीच करायची, मग काय ? ही नाहीं दुसरी !

**रोहिणी**—ते खरं; पण मिळाली पाहिजे ना वेळेवर ! तुझ्यासारखी जर मला एखादी मिळेल तर मी आज सोडायला तयार आहे. हे लुगडं धनिणीनंच दिलं वाटतं ? अगदीं कोरंच आहे म्हणायचं.

**स्वाती**—हो त्यांनींच दिलं. एक महिनाभरसुद्धां नेसल्या नाहींत. त्यांची माझ्यावर चांगली मर्जी आहे. लुगडी चोळ्या वरचेवर देतात. आपलं माणूस चांगलं दिसावं म्हणून ही पहा त्यांनीं मला नथसुद्धां घालायला दिली आहे. तुला नाहीं वाटतं कांहीं मिळत ?

**रोहिणी**—मला ? अग, त्यांच्या लुगड्यावर एक नव्हे दोन नव्हे दहाजणांचें डोळे. माझ्या वाटणीला कुठून येणार तें ?

( कृतिकाबाई येते )

**कृत्तिका**—( आपल्याशीं ) तिकडेहि सामसूमच !' अगबाई ! ही कोण माझ्या दाराशीं ?

**स्वाती**—बरं जातें आतां शंभरदां निघालें नि शंभरदा—

**कृत्तिका**—कायग बहिरटे ! इतक्या हांका मारल्या, दारावर धक्के मारले, कान फुटले होते कीं तुझे ? दार उघडायला काय झालं होतं ?

**रोहिणी**—हांक ऐकल्याबरोबर दार उघडलं बाईसाहेब, पण इथं कुणीच नव्हतं.

**कृत्तिका**—ही कोण दुसरी ? कायग ए, इथें काय ठेवलंय तुझं ? कशाला आली आहेस ? कांहीं काम कां आहे ?

**स्वाती**—काम–माझं काम–माझं कसलं काम ?

**कृत्तिका**—काम, काम, काय करतेस ? अशी घोटाळतेस कां ? स्पष्ट सांग पोटशूळावर औषध मागायला कां अर्धेशिशी टोंचून घ्यायला ? बायकांच्या दुखण्यांवर रामबाण घ्यायला, कां कुणी अडली आहे तिच्याकरितां मंत्राचं पाणी न्यायला आमच्या यजमानाकडे आली आहेस ?

**स्वाती**—त्यांच्याकडं कशाला मी येऊं ?

**कृत्तिका**—कशाला तें आपल्या मनाला विचार. कां ग रोहिणी, आणि तुझी हिला मदत ! चांगलं ! चांगलं ! चांगलं इमान राखतेस. अग सटवे !

**रोहिणी**—हें काय बाईसाहेब बोलतां आपण ? मी असलं काम करणार बायको नव्हे हो. ही बिचारी माझ्या गांवची, इथं श्रावणशेटच्या भरणीबाईजवळ

कुळंबीण असते. सहज मला भेटायला म्हणून आली होती, तसल्या फंदांतली नाहीं हीं, अगदीं भोळी आहे. बाईसाहेब !

**कृत्तिका**—अग भोळी आहे म्हणूनच म्हणतें ! अशा भोळयाभाबड्या आमच्या यजमानांकडे दवापाणी, मात्रामंत्र मागायला यायच्या. बायकांना फुकट औषध द्यायचं सासूबाईचं पुण्यव्रत चालवलं आहे ना ? का ग, हें लुगडं तुला कुणी दिलं ? खरंच सांग.

**स्वाती :**—मला भरणीबाईसाहेबांनीं दिलं.

**कृत्तिका :**— हो, भरणीबाईसाहेब देताहेत असलं लुगडं ? कां दिलं, कुणी दिलं, केव्हां दिलं, सगळं माझ्या ध्यानांत येऊन चुकलं आहे. जा आतां. जा नीघ, पुन्हां इकडं तोंड दाखवलंस तर खबरदार. चल हो चालती. ( ती जाते ) ती पहा, ती पहा नटवी, कशी झुलत चालली आहे ती. ही भोळी कां ? रोहिणीला वाटतं मी अगदीं बोळयानं दूध पितें नाहीं ग ? भरणीबाईनं तें लुगडं तिला दिलं कां ? लबाड कुठली मुलखाची ! आमच्या ह्यांनींच दिलं कीं नाहीं ? खरं सांग. नको सांगूस. भरणीबाईची आणि माझी चांगली ओळख आहे. मी आतां जाऊन तिला चिठ्ठी लिहितें. पण काय रोहिणी, हे कुठं आहेत ?

**रोहिणी**—कुठं बाहेर गेले आहेत बाईसाहेब.

**कृत्तिका**—बाहेर गेले ? ते कां गेले ? केव्हांसे गेलेत ?

**रोहिणी**—खरोखरच मला ठाऊक नाहीं बाईसाहेब.

**कृत्तिका**—सांग खोटं. पाहिजे तितकं खोटं सांग. पण मी कांहीं पत्ता काढल्याशिवाय अन्न घ्यायची नाहीं. मी आतां जाऊन भरणीबाईना पत्र लिहितें. तूं जा आणि त्या भादव्याला माझ्याकडे लावून दे. कसा माझा छळ मांडला आहे ! देवा, तुला डोळे आहेत ! ( जाते. )

## प्रवेश ४ था.

( रेवती देवाला जाऊन घरीं परत जातांना. )

**रेवती**—कसं घर गांठतं कोण जाणे ! आधीच उपास, त्यांत उन्हाची तिरीप लागून जीव कसा अगदीं कासावीस झाला आहे. अग बाई बाई !

( फाल्गुनराव येतो. )

**फाल्गुन**—तिचा कुठं पत्ता नाहीं. देवळांत गेलों, बागेंत गेलों, आंबराईत पाहिली, कुठें मागमूस नाहीं. जावं आतां घरींच. अरे ही कोण ? आणि असं कां करते आहे ?

**रेवती**—अग बाई ! पडलें हो पडलें ! धांवा कुणी तरी. ( एकदम घेरी येऊन पडते. )

**फाल्गुन**—अरेरे ! आलों हुं, भिऊं नकोस. ( तिला सांवरून वारा घालूं लागतो. ) कुणाची कोण आहे बिचारी, कुणाला ठाऊक ! बरं तर बरं, नाहीं तर या दगडावर कपाळ फुटून प्राण सुद्धां जायचा.

( कृतिका माडीच्या खिडकीचें दार उघडून- )

**कृत्तिका**—कुत्रा कां भोंकतो बरं ? कां रे ? हें समोर कोण झाडाखालीं ? आमची खाशी स्वारी वाटतं ? बसून काय करताहेत ? अगबाई ! तो त्यांच्या खांद्यावर हात कुणाचा ! काय ग बाई हे पुरुष निलाजरे तरी ! भर दिवसा-वाटेवर-घरासमोर-( न्याहाळीत ) ही एक मेली फांदी आड येते-

**फाल्गुन**—किती घाम आला आहे पहा. ( हातरुमालानें तिच्या अंगावरील घाम पुसतो. )

**कृत्तिका**—त्या अवदसेचा आपल्या हातरुमालानं घाम पुसताहेत, हें पहाण्यापेक्षां देवा मला आंधळी कां केली नाहींस ! बिछान्यांवर माझे पाय कधीं झोंपेंत उघडे पडले तर ते सुद्धां कधीं दुलईनं झांकले नाहींत, आणि या सवतीचा घाम पुसायला, पदर सांवरायला, तिचं ओझं अंगावर घ्यायला, लाज नाहीं वाटत ? ठीकच आहे " घरचीचं तें मिठवणी आणि बाहेरचीचं मिष्ठापाणी " ! !

**फाल्गुन**—( रेवतीच्या कानाजवळ तोंड नेऊन ) कां आलीस कां शुद्धीवर ? ए—

**कृत्तिका**—आतां काय करावं, गालाजवळ तोंड ! अहो, दुसऱ्या कोणाची नाहीं, पण सूर्यनारायणाची तरी लाज धरा.

**रेवती**—( बेशुद्धींत असतां ) छे: छे: ! रस्त्यांत काय पण !

**कृत्तिका**—ऐका ऐका, जळली तुमची अक्कल ती ! तिची तरी घ्या थोडी उसनी !

**फाल्गुन**— माझ्या घरांत येतेस कां ? कांहीं वेळानं तुला घरीं पोंचवीन.

**कृत्तिका**—घरांत ? या घरांत ? येऊं दे तर सटवी. तिच्या झिंज्या नाहीं उपटल्या तर ही नांवाची कृत्तिकाच नव्हे. पाऊल तरी टाक म्हणावं कीं नखांनीं तोंडच फाडून टाकतें. म्हणे घरांत येतेस कां ? आग लागो तुमच्या नवरेपणाला ! थांबा मीच येऊन देतें उत्तर. ( खिडकीपासून निघून जाते. )

**फाल्गुन**—तुझं घर कुठं ? नांव काय ? कुणाची मुलगी तूं ?

**रेवती**—( कण्हत ) माझं घर मंगळवाड्यांत. मी मघानायकिणीची मुलगी. माझं नांव रेवती. आज सोमवार म्हणून सकाळीं अंग धुवून कार्तिकनाथाला म्हणून आलें; दर्शन घेतलं आणि प्रदक्षिणा घालून परतलें. परवांपासून पित्त झालंच होतं. त्यांत आज हें सकाळचं ऊन लागून एकाएकीं भोंवळ आली. आपण जवळ होतां म्हणून बरं झालं.

**फाल्गुन**—माझ्या घरांत येऊन थोडा मुरावळा खातेस का ? म्हणजे बरं वाटेल जरा. हवीतर दुधांतून मात्रा देतों.

**रेवती**—नको म्हणायचं जिवावर येते, पण पूजा केल्याशिवाय कांहीं खायचं नसतं. जवळ आहे घर; जातें हळूं हळूं.

**फाल्गुन**—बरं, मर्जी तुझी. तुला घरापर्यंत पोंचवितों म्हणजे झालं. ऊठ हळूंच. ( दोघे जातात. )

( कृत्तिका लंगडत लंगडत येते. )

**कृत्तिका**—मेलं कायसंसं म्हणतात ना " घाईत घाई आणि विंचू डसलाग बाई ! " जिन्यांतून उतरतांना अशी ठेंच लागली कीं, कळ मस्तकांत जाऊन अंधेरी आली डोळ्यापुढं ! जाऊं दे ती ठेंच. होईल मेली बरी. पण झाडाखालीं कुणी दिसत नाहीं. म्हणजे ? घरांत शिरली कीं काय ? तें कोण जातं तें ? अं हं, ! मग गेली कुठें ? इकडेहि नाहीं कुणी. ( धांदलीनें ) रोहिणी, अग रोहिणी ! ही सुध्दां मेली कुठं नाहींशी झाली. ( रोहिणी येते. ) कायग, हे कुठं आहेत ?

**रोहिणी**—मला काय ठाऊक बाईसाहेब !

देवानी



**कृत्तिका**—आतां इतक्यांत घरांत नाहीं गेले ?

**रोहिणी**—नाहीं बाईसाहेब, मी सोप्यावरच होतें.

**कृत्तिका**—सांग खोटं. तुझी जीभ झडेल बघ. चांडाळणी, नवराबायकोंत असा विघाड घालतेस, सात जन्म मुरळी होशील; तूं नाहीं म्हटलंस म्हणून मी कुठं ऐकतें ! आळीन् आळी धुंडाळून त्यांना बाहेर काढते बघ. अगबाई मेलेग मेलें. मेली ठेंचेवर ठेंच ! हें काय ? ही तिच्याच कुणा तरी ह्याची तसबीर वाटतं ? हें ठीक–ठीक झालं; खासं झालं ! आतां म्हणावं सातापाताळांत लपून बैस. ही सुतानं स्वर्गाला जाणारी कृत्तिका आहे. तिथून तिला शोधून काढते, तर होय म्हण. पण पहिल्यानं यांची एकदां चांगली मोडली पाहिजे. आज हें असं केलं, उद्यां एखाद्या सटवीला माझ्या उरावर आणून नाचवतील. नवरे, नवरे, नवरे ! असले कसले हे कसाब नवरे ? ( जाते. )

---

## प्रवेश ५ वा.

( फाल्गुनराव आणि भादव्या. )

**फाल्गुन**—भादव्या, तूं खरं बोलणारा आणि इमानी नोकर आहेस, म्हणून माझ्या मनांतून या दसऱ्याला तुझ्या हातांत एक चांगलसं रुप्याचं कडं ठोकून घालायचं आहे. कडं चालेल, कीं एक अशा मोठ्या पदराचं पागोटं बांधूं? बोल. दोन्ही आवडत नसली तर छान त्रिधारी रेशीमकांठाचं धोतर देतों हवं तर. कां तूर्त कांहींच नको ? कांहीं हरकत नाहीं. पुढं पाहूं केव्हांतरी. बरं हें बघ, इकडूंच जा आणि ती खोलींत काय करते, तें पाहून ये बरं.

**भादव्या**—( आपल्याशीं ) धनीसाहेब खूष झाले आणि पहिल्यानं कडं ठोकलं हातांत. कड्याचं झालं पागोटं, पागोट्याचं केलं धोतर आणि माझं नाहीं नाहीं, होय नाहीं, जे धोतरावरून निसटले ते आले ‘ पुढें पाहूं ’ वर ! तरी मेहेरबानी म्हणतों, आहे हें काढून घेतलं नाहीं.

**फाल्गुन**—कायरे भादव्या, विचार कसला करतोस? हें पाहिजे का, तें पाहिजे का, म्हणून विचारलं, तेव्हां हें-मी-कशाला-असं केलस आणि आतां करतो विचार! जा, पाहून ये जा.

**भादव्या**—छे धनीसाहेब, त्याचा नव्हतों विचार करीत. आपण असतांना मला बक्षीस कशाला पाहिजे? बिनकाट भरपूर पगार मिळाला कीं बस्स. पण बाईसाहेबांचं कपाळ दुखतं आहे म्हणून—

**फाल्गुन**—त्यासाठींच मी समाचार घ्यायला जाणार आहे. जा पाहून ये. मी येणार आहें म्हणून सांगूं नकोस तिला वरं का!

**भादव्या**—मी कशाला सांगू धनीसाहेब! (जातो.)

**फाल्गुन**—आतां सकाळीं कुठं गेली होतीस, कोणाला भेटलीस, काय बोलणं झालं, बरोबर कोण होतं, जायचं केव्हां ठरलं होतं, कोणाकोणाचं ठरलं होतं, प्रश्नावर प्रश्न. अशी सारखी बारगोळी सुरूं करतों—माझ्या सरबत्तीपुढं ती काय टिकणार? उत्तर देतांना कुठंतरी घोटाळेल, गांगरेल, अडखळेल, चुकेल, मग काय जरा खिंड पडली, कीं चाल्लों सर करीत. अखेर तिच्या तोंडानं तिची लुच्चेगिरी वदवीन तर शहामत फाल्गुनरावाची! (भादव्या येतो.) कायरे काय करते आहे?

**भादव्या**—कांहीं नाहीं. कोचावर टेंकून पडल्या आहेत. जवळ रोहिणी उभी आहे आणि कण्हत कण्हत कायसं बोलत आहेत.

**फाल्गुन**—बरं, जा तूं आपल्या कामाला. (दोघेहि जातात.)

(मागें सांगितल्याप्रमाणें कृत्तिका व रोहिणी प्रवेश करतात.)

**कृत्तिका**—अग कसली धर्मार्थ औषधं आणि कुठल्या वायावापड्या? म्हणें आईसाहेबांनीं मरतांना शपथ घातली आहे! हीं सगळीं ढोंगसोंगं मला कळतात म्हणावं! बायकांचे रोग बायकांनीं पाहावेत; पुरुषांनीं काय म्हणून? हीं सावजं पकडायचीं जाळीं तुला आंधळीला दिसत नाहींत. मी सुद्धां तशीच होतें. पण आज माझे चांगलेंच डोळे उघडले. उगीच नाहीं माझ्या जिवाचा जळफळाट होत. (पदर डोळ्यास लावून) मी का गुणांनं वाईट आहें, कां रूपानं वेडीविद्री आहें,

कां रंगानं राखुंडी आहें, कां वयानं झालें, म्हणून हे माझ्यादेखत असे थेर करतात. मेली आम्हां बायकांना देवाला जायची सुद्धां चोरी ! आसमाणसांना भेटायला जायची बंदी आणि यांनीं मात्र जनामनाची लाजलज्जा गुंडाळून ठेवून दिवसा ढवळ्या भर रस्त्यावर हवा तसा चावटपणा करावा. पुन्हा आपले संभावित ! काय मेलं जुलूम जुलूम सोसावा तरी किती ?

**रोहिणी**—आपण प्रत्यक्षच पाहिलं म्हणतां, मग काय बोलूं ? पण त्यांचंहि करणं एका अर्थी बरोबर दिसतं. कारण दुबळ्या बिचाऱ्या बायकांवर जर गाजवूं नये तर आमच्या पुरुषांनीं आपला शूरपणा, आपला स्वतंत्रपणा, आपली अरेरावी, गाजवावी तरी कुठं ?

**कृत्तिका**—खरोखर सांगतें, अशा जिण्यापेक्षां एखाद्या वेळेला असं वाटतं कीं, हिरकणी खाऊं, कां अफू खाऊं, कां विष पिऊं, कां तळ्याविहिरींत जाऊन जीव देऊं ? कायशी म्हण आहेना मेली " नवी नवी नवलाची आणि वापरली कीं कवडी मोलाची " तशी गत ! लग्न झाल्यावर कांहीं दिवस मला उराशीं बाळगूं, कीं खांद्यावर वाहूं, कीं कडेवर घेऊं, असं करीत होते. ज्यांनीं त्यांनीं म्हणावं कीं, ही बाई भाग्याची म्हणून असा बिजवर पण हौशी नवरा मिळाला ! पण अलीकडे बघतें तों आपलं सदा धुसफुसणं ! सदा कपाळाला आठ्या. सुधा एक शब्द बोलतील तर शपथ ! दागिनेच कां घालतेस, शालूच कां नेसतेस, देवालाच कां जातेस, एक ना दोन.

**रोहिणी**—पण करायचं काय बाईसाहेब ? ज्यांची सत्ता त्यांची लत्ता खाल्ली पाहिजे.

**कृत्तिका**—हो लत्ता खातात ! सांगताना कुठल्याशा देशांत म्हणे बायका नवऱ्यांना गुलामाप्रमाणं राबवतात. तसं झालं पाहिजे इथं, म्हणजे आमच्या चुलीपुढं शिपाई आणि दाराबाहेर भागुबाई अशा नवरोबांचे डोळे उघडतील, अंजन मिळेल चांगलं !

**रोहिणी**—पण हें तरी चांगलं कां ?

**कृत्तिका**—मी कुठं चांगलं म्हणतें ? मी आपली फटकळ तोंडाची, निर्मळ मनाची नि सरळ चालीची बायको आहें. निदान लग्नांतल्या शपथेप्रमाणं तरी

त्यांनीं वागावं म्हणजे आम्हांला अधिक कांहीं नको. जाऊं दे ही कर्मकटकट—पण सकाळीं तुझ्याकडे कोण आली होती, तें सांगत नाहींस का ? ( फाल्गुनराव हळूंच येतो. )

**रोहिणी**—बाईसाहेब, मी सांगितलं यांत एक अक्षरसुद्धां खोटं नाहीं. ती ती खरोखर त्यांच्या घरीं राहते.

**फाल्गुन**—( आडून ) काय सांगितलंन ? एथून नाहीं चांगलं ऐकूं येत. पण ती आहे कुणी तरी. ही कोण ? ( जरासा पुढें सरतो. )

**कृत्तिका**—अग दगडे, मागचे उपकार स्मरून तरी खरं सांग ! नाहीं तर नागीण पोसली आणि पोसणारालाच डसली, असं करूं नकोस.

**रोहिणी**—आपण असं म्हटल्यावर मग काय ?

**फाल्गुन**—( आडून ) हें सगळं मोघम चाललं आहे, अजून चांगलासा धागा नाहीं सांपडत.

**कृत्तिका**—बरं जा, नको सांगूं. आतां येईल माझ्या पत्राचं उत्तर बरं ! " कोंबडं झांकलं म्हणून तांबडं फुटायचं रहात नाहीं " समजलीस. मीच त्याचा शोध काढतें. चल चालती हो इथून.

**फाल्गुन**—( आडून ) त्याचा सर्व शोध काढतें ! " ती "—चा " तो " झाला का इतक्यांत ? " ती " ती कोण ? आणि हा " तो " कोण ?

**कृत्तिका**—जा म्हणतें ना. माझ्या डोळ्यांसमोर उभी राहूं नकोस. थोडंसं गुलाबपाणी घेऊन ये जा. ( ती गेल्यावर तसबीर हातांत घेऊन तिच्याकडे पाहात ) आमच्या खाशा स्वारीची गांठ पडली म्हणून त्या सटवीनं तुला, असं झुगारून दिलं ना ?

**फाल्गुन**—( आडून ) हें काय, कुणाची तरी तसबीर दिसते. शंका कशाला ? मघांशीं जी देवाला म्हणून बाहेर पडली होती, ती ही आपल्या जिवलगाची तसबीर घेऊन आली घरीं. पण नीट पाहूं आधीं.

**कृत्तिका**—( हातानें दाखवीत ) रूप किती गोड आहे ! तिनं अशा हिऱ्याला फेंकून देऊन आमच्या नवरोजींत काय अधिक पाहिलं कोण जाणे !

**फाल्गुन**—( आडून ) त्याच्या स्वरूपाची तारीफ, आणि मला उद्देशून वाईट तोंड करतेस का ? बरं आहे, पाहून घेईन !

**कृत्तिका**—या तसबिरीवर लावलेल्या अत्तराचा वास तरी किती मधुर येतो आहे. ( वास घेते. )

**फाल्गुन**—( आडून रागानें ) काय बेशरम आहे पहा ! त्या तसबिरींतल्या चोरांचं चुंबन घेते. देऊं का एकदम फडकावून श्रीमुखांत ? पण नको, आपल्याला अडाण्यासारखा हात टाकायचा नाहीं. युक्तीयुक्तीनंच पाऊल टाकायचं !

**कृत्तिका**—अग चांडाळणी, नशिबानं असा मिळाला होता म्हणून तूं हिला रात्रंदिवस मोठ्या प्रीतीनं अस्सं अस्सं ( उराशीं लावते. ) उराशीं बाळगावंस, पण पारख पाहिजे ना !

**फाल्गुन**—( आडून अतिरागानें ) आतां तर बेशरमपणाचा कळस झाला. त्याला अगदीं उराशीं आंवळून धरते ! या वेळीं जर—छे छे, रानटी विचार नाहीं कामाचा. आमचं शस्त्र म्हणजे विचार. विचारानंच काय होईल तें होईल.

**कृत्तिका**—( तसबिरींतल्या चित्रास उद्देशून ) तुझ्यासारखा नवरा मिळायला तपश्चर्याच केली पाहिजे, नी त्या आमचे हे जंगली महाराजांना ( इतक्यांत फाल्गुनराव तिच्या हातांतील तसबीर हिसकावून घेतो. ) अग बाई ! हें कोण ?

**फाल्गुन**—मी जंगली महाराज तुझ्या या गुलछबू महाराजांना भेटायला आलों. सांग आतां, सांपडलीस कां नाहीं ?

**कृत्तिका**—मी कुठं पळून गेलें होतें ? जन्माचीच सांपडली आहें तुमच्या तावडींत ! पण आपल्याला फावलं वाटतं घरीं यायला ?

**फाल्गुन**—तुझ्याबद्दल जबाब दे आधीं.

**कृत्तिका**—माझ्याबद्दल कसला जबाब ?

**फाल्गुन**—( हातांतल्या तसबिरीस उद्देशून ) हें काय हें ?

**कृत्तिका**—ही आपल्याच निर्लज्जपणाची साक्ष.

**फाल्गुन**—माझ्या निर्लज्जपणाची साक्ष? बरोबर आहे तुझं म्हणणं. माझाच निर्लज्जपणा! कबूल आहे.

**कृत्तिका**—आणखी कबूल करायला लाज नाहीं वाटत?

**फाल्गुन**—खऱ्या गोष्टीला लाज कसली? आपल्या मनमोहनची तसवीर घेऊन तिचे मुके घेतांना आणि तिला उराशीं कवळून धरतांना मी तुला प्रत्यक्ष पाहातों, तरी तुला लाथ मारून घराबाहेर हांकलून द्यायचं माझ्या मनांत येत नाहीं. तेव्हां हा माझाच निर्लज्जपणा नव्हे का?

**कृत्तिका**—आतां काय म्हटलंत आपण? मेल्यांनो! काय न्याय बघा. "आपण शेण खायचं आणि दुसऱ्याचं तोंड हुंगायचं." खासा न्याय!!

**फाल्गुन**—खबरदार जास्ती बोलशील तर. ही तुझ्या दिलगाची तसवीर तुझ्या हातांत धरली आहे.

**कृत्तिका**—ठीक आहे, नाहीं बोलत, चालूं द्या आपलंच. आपण अगदीं निष्पाप हो! अगदीं कासोट्याचं पाणी घ्यावं! आपल्याला परस्त्री म्हणजे मातेसमान! परस्त्रीकडे आपण वांकड्या नजरेनं कसं तें पाहिलं देखील नाहीं आजपर्यंत. निदान मला तरी कांहीं दिसलं नाहीं हो. छे, छे, अगदीं दिसलं नाहीं.

**फाल्गुन**—काय म्हणतेस?

**कृत्तिका**—म्हणायचं काय? खरं तेंच म्हणतें. एक तासदेखील झाला नसेल, भर रस्त्यांत माझ्या खिडकीसमोर आपण कुणाला मांडीवर घेऊन बसलां होतां तें? मी कांहीं पाहिलं नाहीं! अगदीं डोळे मिटून उभी होतें!!

**फाल्गुन**—काय, काय, पुन्हां बोल.

**कृत्तिका**—पदर अस्ताव्यस्त पडलेला, तिचा गोंडस हात आपल्या खांद्यावर, आपला हात तिच्या गालांवर! केव्हां? छे, छे, मला अगदीं दिसलं नाहीं, आपण एकपत्नी! आपल्या हातून असं कस होईल? साक्षात् रामाचे अवतार!!!

**फाल्गुन**--( मनाशीं ) हं, असं काय? आतां समजलों. तो प्रकार हिनं पाहिलान् वाटतं. ज्यांना खरी हकीगत माहीत नाहीं, त्यांना तो गैर दिसण्यासारखा झाला, पण माझ्या मनांत कांहीं पाप नव्हतं.

**कृत्तिका**—कां घोटाळ्यांत पडली स्वारी ! आपण धुतलेल्या तांदळासारखे निर्मळ ! आपल्या मनांत त्या वेळीं कांहीं पाप नव्हतं ! मग कां असं तोंड उतरलं? घरांत येतेस का जराशी ? ' आणायची होती त्या सटवीला घरांत, मग दाखविली असती गम्मत.

**फाल्गुन**--ती जर बिचारी एकाएकी घेरी येऊन रस्त्यांत पडली--

**कृतिका**--समजलं ! आपण फार कोंवळ्या मनाचे, तेव्हां आपल्या अंतःकरणाला दयेचा पाझर फुटून आपण तिला पोटाशीं धरली होती वाटतं? तिला घेरी आलेली पाहून, आपलं मन कळवळलं म्हणूनच तिच्या गालावरून हवा तसा हात फिरवीत होतां नाहीं का? खरंच, आपलं कां नाहीं लोण्यापेक्षां कोंवळं मन म्हणून आपण नाजूक ओठांनीं तिच्या गालावरचा घाम पुशीत होतां, असंच ना ?

**फाल्गुन**—( आपल्याशीं ) हिनं तर माझंच बोट माझ्याच डोळ्यांत घालून तोंड बंद केल्यासारखं केलंन्. आतां असं करून नाहीं उपयोग. ( उघड ) ठीक आहे. चालूं दे तुझी वटवट. या तसबिरीच्या साह्यानं तुझा प्यारा कोण आहे, हें शोधून काढतों आणि मग सांगतों काय सांगायचं तें. हा निघालोंच त्या उद्योगाला. काय समजली आहेस तूं? ( रागानें जातो. )

**कृत्तिका**--चला, हें सोंग नेहमींचंच आहे तुमचं. असं कांहीं तरी कारण काढून बाहेर पडायचं आणि मग हवी तशी चैन उडवायची. काय मेला चमत्कार पहा! देवा, नको रे नको हें बायकांचं जिणं ! एका गाण्यांत म्हटलं आहेना, " सत्तात्रिस जन्मींचीं पापें प्राणी आचरती ॥ फळें तयांची भोगाया ही स्त्री जाती " तें अगदीं खरंग बाई ! ( जाते. )

**फाल्गुन**—( प्रवेश करून ) कायग ए-गेली वाटतं. बरं आहे. जाऊं दे. काय जगांतला उलटा न्याय आहे पहा. मी कराग्रला गेलों काय आणि हिनं त्याचा अर्थ काय घेतलान्.

पद—( तिमिर भय होय. )

**नष्ट कालिकाल हा । दुष्ट शनि राहु बळि दुष्ट संचित छळी । काय न कळे मला ॥ ध्रु ॥ पोर मुर्च्छित पडे । सावरलि हें घडे । पुण्य परि वांकुडें पाप वाटे, तिला ॥ १ ॥ प्रिय चित्र चुंबिलें । हृदयिंही कवळिलें । नेत्रिं या पाहिलें । तरि म्हणे निर्मला ॥ ५ ॥**

# अंक दुसरा

## प्रवेश १ ला

( फाल्गुनरावाचं घर. )

**फाल्गुन**—कालचा अर्धा दिवस आणि अर्धी रात्र शोधांत घालविली, पण ह्या चेहेऱ्याचा गृहस्थ कांहीं भेटला नाहीं. चौकांत गेलों, वसंतबागेंत गेलों, संध्याकाळीं कार्तिकनाथाच्या देवळांत कीर्तनाला गेलों; कधीं जायचा नाहीं, पण काल रात्री एक दोन ठिकाणीं जलशास देखील गेलों. कारण तिथें म्हणजे शोकी लोक गोळा व्हायचेंच. पण कुठं मागमूस नाहीं ! असो, आज भादव्यापासूनच आरंभ करूं. भादव्या, ए भादव्या, काय करतो आहेस ? जरा इकडे येऊन जा पाहूं !

**भादव्या**—( आंतून ) झुंबरावरचा मळ झाडतों आहे धनीसाहेब, आलोंच.

( भादव्या हात आपटीत येतो. )

**फाल्गुन**—तुला एक छानदार चीज दाखवितों. ही पहा तसबीर कशी आहे ?

**भादव्या**—( अचंब्यानें ) फार म्हणजे फारच नामी आहे, धनीसाहेब. हें अणीदार-सरळ नाक, पाणीदार गरगरीत डोळे, ही कोचीदार भडक पगडी, या कमानदार रेंखलेल्या भिवया, ह्या पिळदार मिशा, हातांत ऐटदार मुठीची छडी, हा झोंकदार अंगरखा, जसा कांहीं राजा बसला आहे महालांत ! पण मला ही दाखवून काय करायची आहे धनीसाहेब ? ( हंसतों ) एखाद्या खुपसुरत बायकोनं पाहिली तर ती फिदाचं व्हायची त्याच्यावर.

**फाल्गुन**—( मनाशीं ) अगदीं बरोबर. अनुभवाचं बोलला. झालीच आहे फिदा. ( उघड ) तुला दाखवूं नको तर कोणाला दाखवूं? तिला दाखवूं का?

**भाद्र्या**—छे:धनीसाहेब, असं कसं म्हणतां? लग्नाच्या बायकोनं बघून काय करायचं? ते वाईट, फार वाईट.

**फाल्गुन**—अरे आपली मजेनं जवळ बाळगायला. नवरा कामाला गेला, म्हणजे करमणूक घटकाभर! बरं ते जाऊं दे–ही कुणाची समजलास का? ते आपले तूंच सांग पाहूं आधीं, तुझ्या ओळखीचे आहेत हे?

**भाद्र्या**—छे! माझ्या नाहींत बोवा ओळखीचे दिसत. हा चेहरा मी आज पहातो कायतो. असल्या थोर लोकांच्या आणि आमच्यासारख्या गरीब माणसाच्या ओळखी कशा होणार?

**फाल्गुन**—(मनाशीं) काय चोर आहे, अगदीं थांग लागूं देत नाहीं! (उघड) अरे कधीं कधीं आपल्या घरीं येतात ते. तिची आणि ह्यांची कांहीं ओळख आहे माहेरची.

**भाद्र्या**—मीं तर त्यांना कधीं पाहिलं नाहीं.

**फाल्गुन**—कधीं पाहिलं नाहींस? कधीं ह्यांच्याशीं बोलला नाहींस? कधीं यांच्याकडे तिच्याकडून चिठी चपाटी घेऊन गेला नाहींस? कधीं हें तिच्याकडे साखरपाण्याला आले नव्हते? सकाळीं? संध्याकाळीं? तीन प्रहरीं? रात्रीं? कधीं कधीं नव्हते? मार माझ्या पायावर हात, नव्हते म्हणून.

**भाद्र्या**—पण आपल्याशीं खोटं कशाला बोलूं धनीसाहेब! कधीं बोललों नाहीं, कधीं पाहिला नाहीं. चिठी नाहीं, चपाटी नाहीं, कांहीं नाहीं. हा मारतो पायावर हात, खोटं बोलत असेन, तर या पायाच्या पायावर जळून जाईन.

**फाल्गुन**—अरे, अशा शपथांनी जर हात जळते, तर आज दुनियेंत मनुष्य दिसलं नसतं; सगळे जळून खाक झाले असते. निदान बायका तरी पार झाल्या असत्या.

**भाद्र्या**—मी प्रत्यक्ष पाहिलं आहे धनीसाहेब. आमच्या गांवांत एका धनगरानं खोटी शपथ वाहिली, त्यावरोंबर त्याचीं अर्धीं अधिक मेंढरं तिथल्या तिथं पटापट मेली बघा.

**फाल्गुन**—तें जाऊं दे. आधीं ह्यांतली तुला काय हकीकत माहित आहे सांग. खरं सांग, मागशील तें देतों. छानदार एक घर बांधून देतों. थोडीशी जमीन देतों. हें बघ. तिनं तुला काय दिलं आहे, त्यापेक्षां तुला हजारपट जास्त देतों, पण हा गृहस्थ कोण तेवढं सांग.

**भाद्र्या**—खरंच सांगूं धनीसाहेब! अगदीं बापाची शपथ घेऊन सांगतों त्यांतलं मला कांहींएक ठाऊक नाहीं. याउप्पर मला काय शिक्षा कराल ती करा.

**फाल्गुन**—ठीक आहे, नको सांगूं, बाहेर पडल्याशिवाय राहायचं नाही समजलास? ( भाद्र्या जातो )

### पद

( कां न मुरली. )

**कोण जगिं मला हितकर उरलें ॥ स्त्रिया पुरुष गृह पशुही फिरले ॥ ध्रु० ॥ स्त्री परलंपट सेवक फसवे ॥ श्वानहि रक्षणकार्य विसरलें ॥ १ ॥**

(नोकर येतो)

**नोकर**-(पडद्यांतून) फाल्गुनरावांचा बंगला हाच काय?

**फाल्गुन**—होय, हाच. त्यांच्याकडे काय काम आहे तुझं?

**नोकर**—त्यांच्याकडे नाहीं, आंत त्यांच्या बाईकडे काम आहे.

**फाल्गुन**—( मनाशीं ) मला स्वप्न पडलंच होतं. कारण माझ्याकडे कुणाचं काय काम असणार आमची बायको असतांना? अलीकडे पाहतों तों बायकांकडेच फार कामं निघूं लागलीं ( उघड ) बरं समजलों, पण कोणाकडून आलास रे?

**नोकर**—ते शनिबागेच्या कोपऱ्यावर—पण नांव सांगूं नकोस म्हणून सांगितलं आहे मला.

**फाल्गुन**—( एक रुपया हातांत धरून ) हा घे. हं आतां तूं नांव सांगितलंस म्हणून त्यांना कसं कळणार?

**नोकर**—( मनाशीं ) हे म्हणतात तें खरंच. तो कशाला विचारायला येतो आहे यांना ? ( उघड ) रुपया कशाला पाहिजे महाराज ? पण–बरं–तर आपली मर्जी. शनिवारेच्या कोंपऱ्यावर श्रावणशेट म्हणून राहातात. ते–त्यांनीं ही चिठ्ठी फाल्गुनरावांच्या बायकोला द्यायला दिली आहे.

**फाल्गुन**—असं, असं, असं ! तर मग मीच फाल्गुनराव. ती बाहेर गेली आहे. आण ती चिठ्ठी इकडे.

**नोकर**—त्यांच्यापाशींच दे, असा हुकूम आहे महाराज.

**फाल्गुन**—( आणखी दोन रुपये काढून ) हे घे. आणि फाल्गुनरावांच्या बायकोलाच दिली आहे म्हणून सांग, म्हणजे झालं. नवऱ्याजवळ दिली काय आणि बायकोजवळ दिली काय, ती बाहेरून आली कीं मीं ही देतों.

**नोकर**—( मनाशीं ) तरी काय हरकत आहे ? बायकोची चिठी घेऊन नवऱ्याला काय करायचं आहे ? तो देईलच तिला. आपण रुपये उगीच कां बुडवा ? गृहस्थ मोठा उदार आहे. ( उघड ) बरं तर महाराज ( रुपया घेऊन ) ही चिठ्ठी बाईंना द्यायची. येतो तर.

**फाल्गुन**—बरं ये. मी देतों ही तिला. पण तूं आपल्या धन्याला तिलाच दिली म्हणून सांगशील ना ? नाहींतर–बरं जा.

**नोकर**—जी महाराज. ( जातो. )

**फाल्गुन**—ही श्रावण शेटाची चिठ्ठी ( उघडूं लागतो. ) माझ्या बायकोकडे कां ? कशासाठीं ? त्याचा आणि हिचा काय संबंध ? तो कोण हिचा ? काय संबंध आणि नांव सांगायचा हुकूम नाहीं तो काय म्हणून ? सरळ चिठ्ठीला चोरी कां ? तेव्हां सरळ नव्हे हेंच खास. आंत कांहीं तरी भानगड आहे. बायका लिहायला वाचायला शिकल्या म्हणजे अशी पत्रापत्री सुरू करतात. ठीक आहे ! काय लिहितो तो ? " विनंती विशेष. तुमची चिठ्ठी मला पोहोंचली. सौभाग्यवतीची माहेरीं रवानगी करून दिली. आणखी पंधरा दिवसांनीं येईल, म्हणून मी उत्तरीं कळवितों कीं, तुह्मी विचारलेल्या प्रश्नासंबंधानें कांहीं काळजी करण्याची जरुर नाहीं. स्वाती

ही आमच्या घरची विश्वासू कुळंबिण आहे. तुमच्यांत आणि तुमच्या यजमानांत भानगड उपस्थित होण्याचा कांहीं संभव नाहीं. यावरून काय तें लक्षांत आणावें. अधिक लिहिणें नको हे विनंती." असं काय ? "सौभाग्यवतीची माहेरी रवानगी करुन दिली." ती कां ? हिला विघ्न येईल म्हणून ! "आणखी पंधरा दिवसांनी परत येईल" तोपर्यंत तर चैन झाली ! पुढें काय ह्मणतो ? विचारलेल्या प्रश्नासंबंधांत कांहीं काळजी करण्याची जरुर नाहीं ! "ठीकच जरुर नाहीं ! कशाला असेल ? बघणार कोण ? कळणार कुणाला ? हें ध्यानांत आलं, आणखी काळजी का नको हेंही समजलं. बरं पुढें काय म्हणतात, हे राजश्री ! "स्वाती विश्वासू कुळंबिण आहे." हो तिनं आजपर्यंत शेंकडो कामं केलीं असतील, आणखी बक्षिसं उपटली असतील. "पुढें भानगड उपस्थित होण्याचा संभव नाहीं. यावरून काय तें लक्षांत आणावं ! हेंच हिनं आतां घरून नटेपटे करुन देवाला म्हणून बाहेर पडावं आणखी रस्ता चुकवून कार्तिकनाथाला जायचं तें श्रावणशेटाला जावं फार उत्तम बेत ! जा ह्मणावं आतां ! ही चिठ्ठी घेऊन श्रावणशेटाला गाठूं का ? पण नको. आपल्याला अशा आड रस्त्याला जायचं नाहीं. आतां काय ? पुराव्यावर पुरावा. हवा तितका पुरावा मिळायला लागला. ही तसबीर, ही चिठ्ठी, आणखी दमानं घेतलं तर आणखीसुद्धां मिळेल. तेव्हां आतां आ हाः ! असं करावं. ही जी विश्वासू कुळंबीण आहे तिला भेटावं, लागेल तितका पैसा देऊन फितूर करुन घ्यावी, आणि पैसा दिसला, म्हणजे ती फितूर होणारच. आणि मग एक एक हळूच बाहेर काढून घ्यावं. ठीक ठरला बेत. पण काय—अरे भादव्या, भादव्या इकडे ये. मघांशीं इमानीपणाची ऐट मारीत होतास, आतां पाहतों तुझा इमानीपणा कसाला लावून. कबूल आहेसना ?

**भादव्या**—हो धनीसाहेब. हा कांहीं डरणारा इमानी नोकर नव्हे. लावा कसाला.

**फाल्गुन**—आधीं तुला एक विचारतों, स्वाती स्वाती म्हणून एक कुळंबीण आहे ती ओळखीची आहे का तुझ्या ?

**भादव्या**—हो धनीसाहेब. आपल्या रोहिणीकडे येत असते वरचेवर.

**फाल्गुनः**––(मनाशीं) याच्या ओळखीची आहे, आणखी रोहिणीकडे येत असते वरचेवर ! चाललं सुताला सूत जुळत. (उघड) बरं तूं जाऊन तिला गुप्तपणानं भेट आणि आज संध्याकाळीं तोंडाला तोंड दिसेनासं झालं म्हणजे कुणाला न कळत या बंगल्याच्या आंबराईत मला येऊन भेट म्हणून सांग. हें काम मोठ्या हुषारीनंच झालं पाहिजे बरं का ?

**भाद्व्या**––हो, करतों धनीसाहेब.

**फाल्गुन**—पण हें रोहिणीला कळतां उपयोगी नाहीं. कारण ती आहे तिच्या मसलतींतली. शिवाय-पण तें तुला इतक्यांत नाहीं सांगत. ती कुणाला दिसून उपयोगी नाहीं. जा तर तावडतोब. हें काम केलंस म्हणजे मग–मघांशीं सांगितलंच पण हें बघ, इकडे ये. आणखी कांहीं सांगायचं आहे. नीट ऐकून घे. तिचं माझं एकांतांत कांहीं नाजूक गोष्टींसंबंधानं बोलणं व्हायचं आहे. हा जर का माझ्या बायकोला सुगावा लागला तर सगळंच फसलं म्हणून समज म्हणून तिला म्हणावं नीट बुरखा घेऊन सांगितल्या ठिकाणी येऊन उभी रहा. समजलास ! बुरखा-बुरखा घेऊन आली पाहिजे.

**भाद्व्या**-–पण धनीसाहेब, बुरखा घेऊन आली तर संशयाला जास्त कारण होईल.

**फाल्गुन**––नाहीं, नाहीं. त्यांतली खुबी तुझ्या लक्षांत नाहीं यायची. बुरखा पाहिजेच. तुला काय ? सांगितलेलं काम करायचं बस्स !

**भाद्व्या**—बरं तर हुकुमाप्रमाणें कामगिरी बजावून येतों (जातो.)

**फाल्गुन**––ही जर हुल्लड साधली तर–आणि हजार वांट्यांनीं साधणार ! मग काय ? गांवभर तिची फटफजिती केली नाही, तर नांव बदलून ठेवीन. बरं, चला आतां एक चक्कर मारून येऊं शहरांत, या चोराची गांठ पडली तर बरंच झालं, नाहीं तर तितकीच वेळ गेली. (जातो.)

## प्रवेश २ रा.

**स्थळ—रस्ता.**

( आश्विनशेट व त्याचे मित्र वैशाखशेट येतात. )

**वैशाख**—हें तर सगळं तुमच्या मनाप्रमाणं झालं. मग चेहरा कां असा पडलेला ? छानदार वल्ली मिळाली आहे ! आतां तर असा खुलला पाहिजे कीं ज्याचं नांव तें !

**आश्विन**—( मनाशीं ) वल्ली मिळाली आहे. पण ती विषारी निघेलसा रंग दिसतो.

**वैशाख**—कां ? बोलत कां नाहीं ? कां मनांतल्या मनांत आनंदाचे घुटके चालले आहेत आणि मला मात्र वरून हें सोंग दाखवायचं. पण खरा आनंद मित्रापासून चोरून ठेवण्यांत मौज नाहीं.

**आश्विन**—तुझ्यापासून आनंदाची गोष्ट चोरून ठेवली, असं कधीं झालं आहे ?

**वैशाख**—नाहीं. मग चेहरा कां असा, ते सांग.

**आश्विन**—काल रात्रीं सबंध जाग्रण झालं म्हणून असा दिसत असेल कदाचित्; काल सत्यनारायण होता.

**वैशाख**—सत्यनारायण ? कुठें ? तिथं ? त्यांच्या घरीं ! द्या टाळी तर. हा कशाबद्दल समजलास का ? मनोरथ पूर्ण झाले म्हणून.

**आश्विन**—कुणाचे मनोरथ पूर्ण झाले असतील ते असोत.

**वैशाख**—कुणाचे म्हणजे दोघांचे. तुमचे आणि तिचे. कां ?

**आश्विन**—आपले तर नाहींत बुवा. मग तिचे झाले असेल तर कुणाला ठाऊक !

**वैशाख**—( मनाशीं ) हें कांहीं निराळंच प्रकरण दिसतं आहे. ( उघड ) आश्विनशेट, थट्टा राहिली; खरं सांगा, काल काय झालं ?

**आश्विन**—सांगतों, पण ऐकल्यावर विनाकारण थट्टा नाहीं करायची. ऐक तर काल सत्यनारायणाला रेवतीच्या घरीं गेलों होतों, पण नेहमींचा आदरसत्कार

किंवा अगत्य ह्मण, तें सुद्धां दिसलं नाहीं. चारचौघे आले होते त्यांतलाच मी. ते बसले होते त्यांतच मी बसलों होतों. ते उठून गेले त्यांच्याबरोबर मी उठून घरीं आलों.

**वैशाख**— आणखी ?

**आश्विन**—अरे, प्रेमाची पट्टी नाहीं आणखी काय? सरसकट बारा टक्के. बाकीच्यांना पट्ट्या दिल्या त्यांतलीच मला एक, आणखी ती देखील सुकलेली !

**वैशाख**—कालचा गडबडीचा दिवस होता, म्हणून जरा दुर्लक्ष झालं असेल इतकंच. बरं, सत्यनारायण झाल्यानंतर गाणंबिणं होतं की काय कुणाचं ?

**आश्विन**—तेंच; नाहीं ह्मणायला एकदां प्रसाद देतांना हळूंच सांगितलंन् कीं आज रात्रभर जलसा चालायचाय. मर्जीप्रमाणं करायचं. वस्स, याच्यापेक्षां दुसरा शब्द नाहीं तिच्या तोंडांतून.

**वैशाख**—मग तिच्याकडे काय बरं चूक आहे? तुमच्या मनांतून इतक्या मंडळीच्या देखत तिनं—

**आश्विन**—बस, बस, पुढें बोलूं नकोस. तूं माझ्यावर घसरशील हें मी भविष्य केलंच होतं. बरं, जरा इथें उभा रहा. त्या सोनाराकडे आंगठी दिली आहे, ती घेऊन येतों. ( जातो. )

**वैशाख**—या गृहस्थाचा मोठा संशयी स्वभाव; नाहींतर कित्ती उत्तम आहे स्नेहाला ! प्राणाला प्राण देईल. पण चंचल बुद्धीचा आतां याला मी चांगला वाटतों आहे पण घटकेनं वाटेनच याचा नेम नाहीं. नसतीं कारणं काढून नेहमी संशयाच्या पाशांत अडकलेला असायचाच ! ही एक तऱ्हा म्हणावी झालं; पण हे कोण येताहेत इकडे !

(फाल्गुनराव तसबीर घेऊन येतो. )

**फाल्गुनराव**—खून करून फरारी झालेला अनोळखी मनुष्य देखील खुणेवांचून इतक्या अवधींत पकडून आणला असता. पण माझ्या हातांत या गृहस्थाची तसबीर असून हा मला सांपडत नाहीं, आश्चर्य आहे ! हा कोण आमच्या बंगल्याच्या आस-

फाल्गुनराग



पास घिरट्या घालणारा ! पाहूं कदाचित् चेहेरा जमला तर ! ( पुढें येत येत ) पण बोलावं काय ह्याच्याशीं ? ( उघड ) अहो ! मेहेरबानी करून ( आंगठी काढून ) हा खडा काय किंमतीला घ्यावा, सांगा पाहूं ? ( आंगठी त्याचे हातांत देतो. ) अजमासानं–पण होईल तिक्की नक्की किंमत सांगा.

**वैशाख**—( आंगठी घेऊन. ) मला कांहीं खड्याची चांगलीशी पारख नाहीं. पण-पाहतों. या-खड्याची किं–म–त–

**फाल्गुन**—( तसाबिरीकडे व त्याच्याकडे पहत ) नाकं सारखीं दिसतात, पण भिंवया–( पाहूं लागतो. )

**वैशाख**—ही सराफ्यांत घेतली काय ?

**फाल्गुन**— हो सराफ्यांतच घेतली, काय किमत करतां ?

**वैशाख**—तीच पहातों आहे. किंमत–( पाहूं लागतो. )

**फाल्गुन**—डोळे सुद्धां जुळत नाहींत. नाहींत म्हणावं-तर असं इथून पाहूं. ( पाहूं लागतो. )

**वैशाख**—सरासरी अजमासानं सांगतो हं. सरासरी पांचशेंपर्यंत जाईल. पांचपन्नास अलीकडे पलीकडे. ( पुन्हां पहातो. )

**फाल्गुन**—( मनाशीं ) छे: कांहींच नाहीं जुळत. याच्या चेहेऱ्याचा घाट अगदींच निराळा.

**वैशाख**— हो तितकीच–पांचशेंपर्यंत.

**फाल्गुन**—आहे. जवळच आहे म्हणायची. मी हा खडा अडीचशेंला घेतला.

**वैशाख**—अडीचशेंला ? चांगला मिळाला. ( आंगठी परत देतो. )

**आश्विन**—( आंतून ) वैशाख, झालं माझं काम. चल या आंबराईच्या बंगल्यावरून जाऊं.

**फाल्गुन**—( आपल्याशीं ) आंबराईच्या बंगल्यावरून जाऊं ! हा कोण आमच्या बंगल्यावरून जाणारा ? या आठ पंधरा दिवसांत आमच्या बंगल्याचा रस्ता म्हणजे रहदारीचा रस्ताच झाला आहे. पाहिजे त्यानं उठावं आणि बंगल्यावरून जावं, म्हणजे आहे काय हें ?

**आश्विन**--( प्रवेश करून ) वैशाख येतोसना? चल, कदाचित् देवाला गेली असेल तर तिचीही गांठ पडेल. ( दोघे कुजबुजूं लागतात. )

**फाल्गुन**—तिची गांठ पडेल! काय पहा-पाहिजे त्यानें देवाला जातांना तिची गांठ घ्यावी ह्यापेक्षां माझी बेअब्रू अधिक ती कोणती? पण ह्याचा चेहरा एकदां रोंखून ठेवूं.

**वैशाख**—हं? शाबास! तुम्ही तरी पुरेच नादी दिसतां. अहो, मघांशीं काय बोललां होतां आणि आत्तां काय बोलतां? कांहीं तरी मेळ?

**आश्विन**—( पुढें येत येत. ) नाहीं. त्यांतलं कारण असं की–(त्याच्या कानांत कुजबुजूं लागतो. )

**फाल्गुन**—( मनाशीं ) याचीच दिसते आहे तसवीर. पण एके ठिकाणीं उभं राहून चांगलं नाहीं दिसत. अशी युक्ति करूं. " परनार विषाचा प्याला! तूं लागुं नको त्या नादाला." ( असें गुणगुणत त्या तसविरीकडे पहात इकडे तिकडे फिरतो. ) हे डोळे तर जुळले. " परनार विषाचा प्याला" हें नाकही त्याच्या-सारखं आहे. " तूं लागुं त्या नादाला. "—

**वैशाख**—( आश्विनशेटास ) अहो, हें तर मी मघांशीच मनांत आणलं होतं. कारण आपली बुद्धि शाश्वत असती तर काय झालं नसतं?

**आश्विन**—तें खरं असेल तुझ्या मतानं, पण मला विचारशील तर तिची नजरच तशी आहे. हें पहा– ( कानांत कुजबुजूं लागतो. )

**फाल्गुन**—वर्ण जुळला, भिंवया जुळल्या, चेहेरा जुळला, जुळल्यं सगळं! तो, तोच हा. " परनार विषाचा प्याला. "

**आश्विन**—वैशाख, हा कोण रे आमच्याकडे बघतो, गुणगुणतो. पुन्हां पहातो, पुन्हां गुणगुणतो. आहे कोण?

**वैशाख**—आहे कुणी तरी वेडगळ झालं. राहिना उभा मजेंत.

**फाल्गुन**—" परनार विषाचा प्याला " असं म्हणतांना त्याची मुद्रा फिरलीरे फिरली!

**वैशाख**—अशा वेडेपिरांना खुलें हिंडूं देतात, हें चांगलं नव्हे. कदाचित् अशानं यांचं वेड जास्त होत असेल. तो पाहिलात कसा बघतो आहे? तो दिसण्यांत चांगला दिसतो.

**फाल्गुन**—तोच, तोच, तोच. तो पहा गालावरचा तीळ, आणि हा तीळ. डाव्या डोळ्याखालीं–डाव्या डोळ्याखालीं, गालाच्या जरा वर "परनार विषाचा प्याला."

**आश्विन**—वैशाख, ऐक. याला परनारीचं वेड लागलं आहे.

**फाल्गुन**—(मनाशीं) हें दुरून झालं. आतां बोलायचं कांहीं तरी निमित्त काढून एकदां जवळ जाऊन ताडून पहावं. (जवळ जाऊन दोघांकडे पहात) अहो महाराज, अहो! यंदा कांहीं बंड होण्याचा संभव आहे म्हणतात, खरं का हो?

**आश्विन**—(हंसत) बंड! कुठलं? आपल्याला नाहीं माहित. वैशाख हे कुणी बंडखोर दिसतात!

**वैशाख**—अरे, मला मघांशीं खड्याचीच किंमत विचारीत होता.

**फाल्गुन**—अगदीं रेषान् रेषा–तीळन् तीळ–अगदीं बरोबर आहे. "परनार विषाचा प्याला." (गुणगुणतो.)

**आश्विन**—या काय वेड्याच्या नादीं लागतोस? चल आपण जाऊं!

**वैशाख**—चल तर–तरी दगडी वेड नाहीं. मौजेचंच आहे. (चालूं लागतात.)

**फाल्गुन**—(मनाशीं) हा चालला पहा. निसटून जायला पाहतो! हाच तो हरामखोर! माझ्या बायकोला तसबीर देणारा हाच. पण ह्याचं नांव गांव कसं कळावं? (उघड) अहो, जरा थांबा. आणखी मी विचारतों तेवढं मेहेरबानी करून, म्हणजे–आपलं नांव मार्गशीर्षशेटजी का हो?

**आश्विन**—(हंसत) मार्गशीर्षशेट? नव्हे, माझं नांव आश्विनशेट. कां वरं?

**फाल्गुन**—नाहीं आपलं–बरं आपल्या बंधूंचं नांव तरी–मी म्हणतों तें नांव आहे कां.

**आश्विन**—बंधूंचं नाहीं–माझं नाहीं–पुतण्याचं नाहीं आणि चुलत्याचंहि नाहीं. आमच्या घरांत तें कुणाचंच नाहीं.

**फाल्गुन**—मला वाटलं असावं म्हणून. कारण हे गृहस्थ माझे फार मोठे स्नेही आहेत; त्यांचा तुमचा तोंडवळा वराच जमतो, म्हणून विचारलं. माझ्याजवळ त्यांची एक तसबीर आहे. आपण मेहेरबानीनं जर तसदी घ्याल तर थोडी ताडून पाहतों.

**आश्विन**—वैशाख, अरे, ही एक साडेसातीच भेटली आहे आपल्याला! बरं पहा ताडून. ( फाल्गुनराव पाहूं लागतो. ) का कांहीं जुळत कां?

**फाल्गुन**—जरासा चेहरा वळवाल तर बरं होईल.

**वैशाख**—( हंसत ) अहो सरदारसाहेब, शेटसाहेब, सावकारसाहेब, पुरे करा हा त्रास, जाऊं द्या आम्हांला! चला हो या माथेफिरू मनुष्याच्या नादीं लागून काय उपयोग? चला, खासे वेडेपीर आहेत. ( हंसत ) अहो, एकाद्या मशीदींत जाऊन बसा.

**फाल्गुन**—( मनाशीं ) दोघेही माझ्याकडे पाहून हंसताहेत. हंसा. तुम्हीच काय, सर्व शहर हंसणार आतां! आतां असं केलं तर? ( उघड ) अहो ही पहा तसबीर, ( मनाशीं ) पण नको. ( लपवितो. )

**आश्विन**—अरे हें काय? मी रेवतीला दिलेल्या तसबिरीसारखी ही दिसते! हें कसं झालं? झाला घोंटाळा! तीच जर ही असली—( जरा पुढें सरकतो. )

**फाल्गुन**—( मनाशीं ) गोळी लागली रे लागली! म्हणून स्वारी जवळ जवळ सरकायला लागली. बहुतकरून माझ्या हातून हिसकाऊन घ्यायचा स्वारीचा बेत दिसतो. घ्या म्हणावं ही मी खिशांतच ठेवतों म्हणजे झालं. चल जा, बैस तेथें. ( तसबीर खिशांत घालतो. )

**आश्विन**—यानं ती खिशांत घातली! वेडा म्हणतां म्हणतां वैशाख, हा आम्हांलाच पेढे चारणार.

**वैशाख**—( हळूंच ) तुम्हीं जरा साखर पसरा, म्हणजे झालं!

**फाल्गुन**—( मनाशीं ) दोघांचं मिळून कांहीं तरी खलबत झालं आहे. आतां तर इथून पळच काढला पाहिजे.

**आश्विन**—अहो. कृपा करून एकदां—

**फाल्गुन**—( गडबडीनें ) जयगोपाळ, जयगोपाळ !

**आश्विन**—एकदां पाहून देतों—

**फाल्गुन**—काय पाहून देतों ?

**आश्विन**—ती तसबीर तुमच्याच हातून पहातों.

**फाल्गुन**—तसबीर ! छे: भिकार आहे. उगीच चितान्याच्या पोरानं कागदाच्या चिटोन्यावर रंग फासला आहे झालं !

**आश्विन**—पण बाहेर तरी काढा. पाहूं कशी आहे ती.

**फाल्गुन**—( धांदलीनें पळत ) छेः हो, आपल्यासारख्यांनीं तसदी घेण्यासारखी मुळींच नाहीं, कांहीं तरी आहे झालं !

**वैशाख**—( जरा रागानें ) अहो, पण जरा दाखवानात कां ! आम्ही कांहीं खात नाहीं. पाहून देतो परत. हं, दाखवा पाहूं.

**फाल्गुन**—( मनाशीं ) हे आले आतां कजेलीला. आतां केलाच पाहिजे पोबारा. नाहींतर हे आहेत दोघे आणि मी सांपडलों एकटा. ( उघड ) अगदींच गचाळ आहे हो. जातो आतां. जयगोपाळ जयगोपाळ ! छे: छे: मला फुरसत नाहीं. आणखी दाखवीन केव्हां तरी. जयगोपाळ ! ( पळत जातो. )

**आश्विन**—वैशाख, मी रेवतीला दिलेली तसबीर ती हीच.

**वैशाख**—भलतंच कांहीं तरी. कशावरून म्हणतां तीच म्हणून ?

**आश्विन**—अरे, मीं पाहिली म्हणून ! तशी नकशीची चौकट माझ्य तसबिरीलाच होती.

**वैशाख**—अरे, चौकटीसारख्या चौकटी पुष्कळ असतात, कांहीं तरी तर्क काढीत बसायचं !

**आश्विन**—अरे ! तर्क नव्हे प्रत्यक्ष मी पाहिली. तिनं ती तसबीर या भामट्याला दिली यांत संशय नाहीं.

**वैशाख**—हं, तर्क रचीत चाललांत, संभाळा.

**आश्विन**—आतां काय संभाळा. झाला घोंटाळा, आणि मी म्हणतो माझा प्रत्यय पाहिजे असेल, तर काल रात्रींचं तिचं माझ्याशीं वर्तन मीं तुला सांगितलंच मघाशीं.

**वैशाख**—(मनाशीं) आतां ह्याच्या स्वभावाला काय करावं ? नुसती चौकटी-सारखी चौकट पाहून याचं डोकं विघडलं ! आतां कमाल झाली (उघड) ती तसबीर तुमची नव्हे, खास नव्हे. रेवती नायकिणीची मुलगी झाली म्हणून इतकी कांहीं बेमान नाहीं !

**आश्विन**—छे: रे ! तीच, तीच. पैज तुझी माझी; रेवती आपल्या जातीच्या गुणावर गेली, आणि जायचीच. कारण—

**पद.** (कोयलियाकोकु.)

**ही बहु चपल वारांगना ॥ साहस, दंभ, लोभ कपटानृत**
**भाषण टाकिल कशि या स्वगुणा ॥ ध्रु ॥ प्रेमचित्रिका**
**दिधली तीतें ॥ अर्पि परी ती प्रिय पुरुषातें ॥ कुललीला**
**या तिच्या देति संताप मना ॥ १ ॥**

चल तर तिच्याकडे जाऊं, त्याशिवाय नाहीं उलगडा व्हायचा.

**वैशाख**—अहो पण घाई कां अशी ? जेवण झाल्यावर जाऊं.

**आश्विन**—आधीं उलगडा आणखी मग जेवण. हा मंगळ–मंगळ–मंगळ बाधतो आहे मला ! (दोघे जातात.)

**फाल्गुन**—(बाहेर येऊन) हा चालला. पहा. अरे चोरा, माझ्या संसारांत बिब्बा घातलास !

**पद.** (तनय मूढा)

**अधमा केली रक्षा मम सौख्याची सारी ॥ ध्रु ॥ शोध तुझा**
**लाविन धुंडोनी ॥ पाप तिचें मापोनी ॥ दवडिन बाहेरी ॥ १ ॥**

(जातो.)

# प्रवेश ३ रा.

**स्थळ:**—रेवतीचें घर.

( रेवती व तिची मैत्रीण अनुराधा. )

**अनुराधा**—अलीकडे बरेच दिवस आश्विनशेटजींचं तुझ्याकडे वरचेवर येणंजाणं बोलणंबसणं पाहून मला हें कधींच स्वप्न पडलं होतं. पण मला न कळवतां असं करशील हें मात्र माझ्या ध्यानांत आलं नव्हतं.

**रेवती**—तुझा रुकार पडेलसं वाटलं नाहीं, म्हणून नाहीं कळवलं.

**अनुराधा**—कसा रुकार पडेल? खरंच सांगतें. अगदीं पोरंकट विचार केलास! अग, हे तुझे चांगले पैसे मिळवायचे दिवस. आणि यांत जर एकाच पुरुषाला धरून राहिलीस, तर पुढें काय करणार? तोंडाला सुरकुत्या पडल्यावर कांहीं घडी येईल?

**रेवती**—आज गोष्ट काढलीस म्हणून सांगतें—

पद

**तनुविक्रय पाप महा॥ पापांच्या वसले कळसीं॥ ध्रु.॥**
**स्त्रियांस भूषण लाज विनय हे कोमल भाव मनींचे॥ ते**
**जाळाया धनार्थ नच तो देव घालि जन्मासीं॥ १॥**

**अनुराधा**—अग, दररोज नवा थाट! कसली काळजी नाहीं. रात्रन् दिवस आनंदांत घालायचे सोडून हें कुठलं ब्रह्मज्ञान शिकलीस कोण जाणे! मी कशाला बोलूं? आठ दिवसांत कंटाळशील बघ. मी म्हणतें, तुझ्या आजीपणजीपासून हा धंदा करीत आल्या त्या सगळ्या वेड्या कां होत्या? त्यांनीं शरीराचा विक्रा करून पैसा करून ठेवलाना? आणि त्याच पैशावर तूं उड्या मारतेस ना? यांत काय अधिक केलंस? यापेक्षां बैरागीण होऊन एकतारी वाजवीत फिरलीस तर मी खरं तरी म्हणेन. अजागळ कुठली! अग, कुणाचा घातपात न करतां हा धंदा चालवूनच पैसा मिळविण्यांत कांहीं पाप नाहीं; उलट लोकांचं मन संभाळून संतुष्ट राखण्यांत पुण्यच आहे, समजलीस?

**रेवती**—पुरेत पुरेत या पुण्याच्या गोष्टी ! मी तुला इतकंच सांगते—

**पद ( ढोलन मेंढें घर आवे )**

**निंद्य जीवनक्रम अमुचा ॥ आमरणांत निशीदिनिं सततचि एक रूप पालटना त्याचा ॥ ध्रु. ॥ स्मित सोंगी स्तुति लटकी आर्जव ॥ तोषरोष दांभिक वरवरचा ॥ १ ॥**

**अनुराधा**—अग, त्यापेक्षां असंच करिनास मग ? अलीकडं या शाळा वोकाळल्यापासून आमच्या जातींतल्या मुलींत लग्नाचं खूळ डोकावूं लागलंय, म्हणून लग्नच लावून कां घेत नाहींस त्यांच्याशीं ?

**रेवती**—लग्न नाहीं तर काय म्हणायचं याला ?

**पद**

**लग्नविधींतील खरें मर्म काय । ठाउक तें मुळिंहि तुज नसे ॥ ध्रु. ॥ वैवाहिक होममंत्र अंतःपट अक्षतादि ॥ पोषक हे विधि, मिळणीं जीव जिवा सार हें असे ॥ १ ॥**

**अनुराधा**—बरं बाई, तूं आहेस पटाईत, शिकून तरवेज झालेली. मला बोलण्यांत हटणार आहेस ? रहा, अश्विनशेटजींची बायको होऊन तरी आनंदांत रहा म्हणजे मिळवलीस. तुझी माझी मैत्री म्हणून सांगून ठेवतें, त्यांचा स्वभाव आहे म्हणे तऱ्हेवाईक. तेव्हां नीट जपून वाग. जातें आतां, उशीर झाला. गजरे करून ठेवायचे आहेत.　　( जाऊं लागते. )

**रेवती**—अग,गजरे गजरे ते असे किती करायचेत ? जरा बसून जा.

**अनुराधा**—( दूर पाहून ) मी तुला कांहीं एकटी नाहीं सोडून जात, ते पहा तुझे नवीन यजमान—अगबाई ! पण हें काय भलतंच बोललें मी—तुझे पतिराज आले हो—आतां तरी जाऊं ?

**रेवती**—समजलं. समजलं. संध्याकाळीं येशील का ? जा तर. ( अनुराधा जाते. ) ही कांहीं नेहमींची वेळ नव्हे. दुसरं कोण आहे बरोबर ? वैशाखशेट अधिक वाटतं ? पण स्वारींची मुद्रा फिरलेली दिसते. काल रात्रीं सत्यनारायणाचे

गडबडींत त्यांच्याशीं बोलबसायला झालं नव्हतं म्हणून रागावले होते, त्यांतलाच हा बासा राग असेल. ( आश्विनशेट व वैशाखशेट येतात. ) यायचं असं—वैशाखशेट, या बसा—आज हवा फार गरम झाली आहे नाहीं ?

**वैशाख**—उन्हानं; दुसरं काय ? ऊन उतरलं म्हणजे होईल थंड आपोआप.

**आश्विन**—( वैशाखास ) ही पांचपेंचाचीं बोलणीं नकोत. आत्तांच्या आत्तां काय तो उलगडा झाला पाहिजे. ( कुजबुजूं लागतो. )

**रेवती**—हळूंच हो. मला ऐकायला येईल नाहींतर. माझे कान फार तिखट आहेत म्हणून म्हणतें—कुजबुज करायला बाहेर नव्हती वाटतं फुरसत ! बरं तर चालूं दे. मी जराशी जाऊन येतें. ( जाऊं लागते. )

**वैशाख**—छे : तसं कांहीं नाहीं. काल तुम्हांला यांनीं तसबीर दिली, ती माझ्या मनांतून एकदां पाहायची आहे.

**रेवती**—मला दिल्यावरच पाहाण्यांत कांहीं अधिक आहे वाटतं ? बरं पाहिजेच असेल तर दाखवितें—डोळे नकोत कांहीं मोठे व्हायला ! (तसबीर पहाण्यास जाते.)

**वैशाख**—झालं आश्विनशेट ! ती पहा आणायला गेली. दिलीन् म्हणजे झाली अगदीं सोळा आणे !

**आश्विन**—होणारसा रंग दिसतो खरा. हिच्यावर भलताच आरोप करून आपण मोठी चुकी केली बुवा ! बर, झालं तें झालं. आतां मेहरबानी करून तिच्याजवळ तरी यांतलं कांहीं बोलूं नकोस. नाहींतर आमच्या फजितीला पारावारच नाहींसा होईल.

**रेवती**—अं ? या खणांत नाहीं दिसत; मग कुठें ठेवली बरं—हो-खरंच, काल घरीं आल्यावर पहिल्यानं मी त्या तावदानी पेटीकडे गेलें होतें. तिच्यावर पाहूं या. ( तिकडे जाते. )

**वैशाख**—यापुढें तरी असा भलताच संशय घेत जाऊं नका.

**आश्विन**—छे: आतां कधीं स्वप्नांत सुद्धां संशय यायचा नाहीं. चांगली अद्दल घडली आज-पण बोलूं नकोस रे, तिचा कान इकडे आहे, तो पहा.

**रेवती**—म्हणजे इथेंही नाहीं? मग ठेवली कुठें तर–ही नव्हे–इथेंही नाहीं. आतां? हं. समजलें. ( उघड ) अहो महाराज, आपण कांहीं तरी नजरबंद विद्या लढविलीत इथें खास, खास सांगतें. नाहींतर इथें ठेवलेली तसबीर नाहींशी कशी झाली हो? हो, होयना वैशाखशेट?

**वैशाख**—नाहीं. शपथपूर्वक आमच्याकडे नाहीं. तुम्हींच पहा कुठें ठेवली ती.

**आश्विन**—( वैशाखास ) कां? माझा संशय खरा कां खोटा? अरे–मला पक्कं ठाऊक. मी कसा खोटा संशय घेईन? ( रेवतीस ) अहो, आमची नजरबंद नव्हे.

**वैशाख**—( त्याला दाबून ) अरे, ती थट्टेनं म्हणत असेल. म्हणून म्हणतों इतक्यांत बोलूं नको. जरा दम खा.

**रेवती**—इथंही नाहीं. कुठं मेली पडली आहे कोण जाणे!

**आश्विन**—( वैशाखास ) ती पहा मी मोठ्या प्रेमानं दिलेल्या तसविरीला मेली म्हणते; ही आमच्या तसबिरीची किंमत काय?

**रेवती**—( आश्विनशेटास ) खरोखरच ती कुठें ठेवली ती सांपडत नाहीं.

**आश्विन**—नाहींच सांपडायची मला ठाऊक आहे.

**रेवती**—ठाऊक आहे म्हणजे? ( जवळ जाऊन ) मग द्या कुठं आहे ती.

**आश्विन**—हं! अशी लाडीगोडी लावूं नका आतां. लाडीगोडीला पाघळणारा मी गृहस्थ नव्हें.

**रेवती**—अगबाई, आतां मात्र अगदीं खरा राग आला हं–भ्यालें मी अगदीं –हं सांगा आतां कुठं आहे ती?

**आश्विन**—अशा थट्टेथट्टेनंच दुसऱ्याचा प्राण घेणाऱ्या तुम्ही! समजलीस? निव्वळ थट्टेनच ती तसबीर देऊन टाकली असशील?

**रेवती**—कुणाला देऊन टाकली असशील?

**आश्विन**—फिरवलान् मोहरा. ( रेवतीस ) कुणाला म्हणजे? ज्याला दिलीस त्याला आणि त्यांच्या हातांत ती मी आज–आतां नुकती पाहिली.

# अंक तिसरा.

## प्रवेश १ ला.

( फाल्गुनरावाचें घर—कृत्तिका येते. )

**कृत्तिका**—काल श्रावणशेटाच्या बायकोला चिठ्ठी लिहिली तिचं उत्तर निदान आज सकाळीं तरी यायला पाहिजे होतं, तें अजून कसं आलं नाहीं ? कां त्याच्या-वर मध्येंच कुणी घाला घातला कोण जाणे ! तो कोण, भादव्या का रे ! भादव्या कुणीकडे चालला आहेस ?

( भादव्या येतो. )

**भादव्या**—जी बाईसाहेब, दिवाणखान्यांत बैठक पसरायला जातों.

**कृत्तिका**—जरा इकडे ये पाहूं. हा एक मेला-मोठा लबाड.

**भादव्या**—काय बाईसाहेब ?

**कृत्तिका**—तूं खरं सांगायचा नाहींसच, पण आपली विचारतें. अरे काल, आज, कुणी माझ्याकडे चिठ्ठी घेऊन आला होता कारे ? नाहीं म्हणायचासच तूं. अन्न खातोस त्याची शपथ आहे बघ, गुलामा !

**भादव्या**—खरंच मला ठाऊक नाहीं बाईसाहेब ! कोण यायचं होतं ?

**कृत्तिका**—तुलारे कां चौकशी मेल्या ! विचारलं त्याचं उत्तर द्यावं. "कोण चाललं पुढं तर कितक्याचं घोडं" हें विचारून तुला काय करायचंय ? मरण्या यायचा होता !

**भादव्या**—तर मग कुणी नव्हतं आलं बाईसाहेब.

**कृत्तिका**—बरं, आज सकाळीं तुला यांनीं कुठं धाडलं होतं ? खरं सांग.

**भादव्या**—( स्वगत ) त्यांचा हुकूम कीं यांना कळवूं नकोस. आणि यांचा हुकूम खरं सांग. या जोड हुकमाच्या कैचींत अडकलों. आतां-( उघड ) मला बाईसाहेब कुठें धाडलं होतं ? छे: बाईसाहेब.

**कृत्तिका**—मेली तुझी बाईसाहेब ! कुठं गेला होतास तें सांग आधीं.

**भादव्या**—मी कुठें गेलों बाईसाहेब ? कुत्र्याला फिरवून आणला, दाणा खरारा केला; आणखी-कुठं गेलों होतों बाईसाहेब ! आणि तुम्हांला कुणीं सांगितलं ?

**कृत्तिका**—मला कर्णपिशाच्चानं सांगितलं. पण कुठं गेला होतास तें सांगतोस कीं नाहीं ?

**भादव्या**—छे: बाईसाहेब ! मी कशाला जाऊं ?

**कृत्तिका**—समजलं मेल्या ! नको सांगूस हो. बघतोय् पहा आणखी कसा तो ! "मुद्रा बावळ्याची आणखी नजर कावळ्याची." थांबा मेल्यांनो ! तुम्हां सगळ्यांना घरांतून हाकलून लावीन तेव्हांच सुखानं निजेन. बाहेर कोणरे बोलत आहे तें ! शब्द ओळखीचा नाहीं दिसत. कुणी बाहेरख्यालींतला सोबती असेल. या लबाडांच्याच संगतीनं स्वारी बिघडली. थांब, ऐकतें काय बोलताहेत तें.

( कान देते. )

**भादव्या**—बाईसाहेब, माझ्यावर जर विश्वास असेल—

**कृत्तिका**—थांब म्हणतें ना. या बोलण्यांतलं मला कांहीं कळूं नये म्हणून तोंड चालविलं आहेस वाटतं. ( पुन्हा ऐकूं लागते. )

**भादव्या**—छे: बाईसाहेब. मी कशाला—

**कृत्तिका**—गप रहातोस कीं नाहीं मेल्या! जा चालता हो इथून, जा. ( भादव्या जातो. ) हं आलांत का ?* कुठें गेली होती आपली धिंडका इतका वेळ ? ( रोहिणी येते. ) आणि मला विचारल्याशिवाय कशी गेली होतीस ? सांग अगोदर.

**रोहिणी**—रागावूं नका बाईसाहेब! काल त्या बिचारीला आपण नाहीं नाहीं तें बोललांत, मलाही भलतंच म्हटलंत—माझं असो मेलं, पण तिची समजूत करायला म्हणून तिच्याकडे गेलें होतें.

**कृत्तिका**—हं समजलं समजलं कां गेली होतीस तें. खरं बाहेर पडले म्हणून सांधासांधी करायला गेली होतीस. तू त्या सटवीचं तोंड बंद करशील, पण मी भरणीबाईलाच विचारतें म्हणजे झालं. तरी म्हटलं चिठ्ठीचं उत्तर कां नाहीं ? कुणी बिब्बा घातला ? अग सटवे, तूं ती माझ्या कामांत असा चोंबडेपणा करतेस का ? थांब.

**रोहिणी**—पण बाईसाहेब, माझं ऐकून तरी घ्या अगोदर. मी आपलंच काम करायला गेलें म्हणानात.

**कृत्तिका**—माझं काम! अग दांडगे!

**रोहिणी**—ऐका तरी बाईसाहेब, यजमानसाहेबांबद्दल आपल्या मनांत संशय आला होता तो अगदीं खरा आहे, अशी माझी खात्री झाली.

**कृत्तिका**—हं हं, तीग कशी ? सांग सांग पाहूं.

**रोहिणी**—मी स्वातीला भेटायला गेलें होतें, म्हणून सांगितलंच तुम्हांला—तिनं एक चमत्कारिक गोष्ट सांगितलीन् बाईसाहेब.

**कृत्तिका**—ती काय ग ? ये, जवळ ये, अशी. हं, सांग आतां काय गोष्ट ती.

**रोहिणी**—हें बघा बाईसाहेब, ( इकडे तिकडे पाहून ) यजमान साहेबांचा निरोप घेऊन भादव्या आज सकाळीं तिकडे गेला होता.

**कृत्तिका**—त्यांचा निरोप घेऊन भादव्या तिच्याकडे गेला होता. ? कायग बाई हें कारस्थान ! अरे मेल्या भादव्या ! तर मग काय निरोप तो ?

**रोहिणी**—यजमानसाहेबांनीं स्वातीला आज संध्याकाळीं अंधार पडला म्हणजे या आंबराईच्या कोंपऱ्यांवर भेटायला बोलावलं आहे.

**कृत्तिका**—तिला त्यांनीं अंधार पडल्यावर बोलावलं आहे ? अग हेंच तर मी म्हणत होतें पण तूं काय शहाणी !

**रोहिणी**—ऐका तरी बाईसाहेब. पुढें आणखी बोलावलं तें कसं म्हणून नाहीं विचारलंत ?

**कृत्तिका**—हं सांग सांग कसं बोलावलं आहे ?

**रोहिणी**—तिला सांगितलं आहे कीं, तूं संध्याकाळ झाली म्हणजे कुणाला न कळत—( एक नोकर येतो. )

**कृत्तिका**—कां रे मेल्या ! विचारल्याशिवाय कां आलास ? कुणीं बोलावलं होतं तुला ? चल, चालता हो.

**नोकर**—बाईसाहेब, बाहेर एक गृहस्थ आला आहे, त्याच्या मनांतून धनी-साहेबाजवळ तसविरीसंबंधानं कांहीं बोलायचं आहे, असं म्हणतोय् तो.

**कृत्तिका**—तसबिरीसंबंधानं बोलायचं आहे ? अग तेंच ग तेंच. मी म्हटलं तेंच दिसतं. या गृहस्थाकडून कांहीं तरी अधिक सुगावा लागला तर लागेल. ( नोकरास ) जा, त्यांना आंत घेऊन ये. ( नोकर जातो. ) एकून मेला भादव्या गेला होता का तिच्याकडे ? आणखी आमच्या नवरोजींनीं, स्वातीला संध्याकाळीं भेटायला बोलावलं आहे का ? आणखी तिला काय सांगितलं आहे म्हटलंस

**रोहिणी**—स्वाती बिचारी अगदीं घाबरून गेली आहे हो ! पुरुषच ते ! काय नेम आहे त्यांचा ? त्यांतून संध्याकाळीं एकटं आंबराईत, इतकंच नव्हे तर बाई-साहेब बुरखा घेऊन बोलावलं आहे. आणखी—



**कृत्तिका**—बुरखा घेऊन म्हणजे कुणाला दिसूं नये. आतां कशाला बोलावलं आहे हें एखादं पोर नाहीं कां सांगणार—पण हा गृहस्थ आलाच. एकदां वाटतं याला भेटूं नये, पण भेटल्यावांचून सोय नाहीं. रोहिणी, तूं जरा त्या खोलींत जाऊन बैस. हा गेला म्हणजे येऊन सर्व सांग. (रोहिणी जाते.) संध्याकाळीं बुरखा घेऊन—मांजर अगदीं डोळे झांकून दूध पितं, त्याला वाटतं आतां कोण बघणार? (आश्विनशेट येतो.) या, बसा असे.

**आश्विन**—माझ्या मनांतून फाल्गुनरावांची कांहीं गोष्टीसंबंधानं गांठ घ्यायची होती. केव्हां भेटतील बरं?

**कृत्तिका**—तसबिरी संबंधानं वाटतं?

**आश्विन**—होय. मी माझी तसबीर एका म्हणजे-हो समजाना—समजा कशाला-आला प्रसंग म्हणून उघडच सांगतों. एका नायकिणीच्या मुलीला मी माझी तसबीर दिली होती. त्या तसबिरीची म्हणजे मोठीशी पर्वा आहे असं नाहीं, पण कांहीं नाजूक गोष्टीचा उलगडा करण्याकरितां तिची मला जरुरी आहे. कारण त्या गोष्टीवर माझं जन्माचं सुखदुःख अवलंबून आहे.

**कृत्तिका**—आलं लक्षांत कसं तें. बरं ती मुलगी शेंपन्नासांत देखणी आहे का?

**आश्विन**—शेंपन्नासांत कां हजारांत म्हणाना? असो; म्हणा—तेव्हां अशी मला शंका आली आहे कीं तिनं ती तसबीर दुसऱ्याला देऊन टाकली.

**कृत्तिका**—अगदीं बरोबर. माझाही तर्क अगदीं बरोबर जुळला. मलाही शंका आली होती कीं—

**आश्विन**—ती काय बरं? तिनं ती तसबीर फाल्गुनरावांना दिली म्हणून?

**कृत्तिका**—हो, अशीच.

**आश्विन**—फाल्गुनरावांना दिली म्हणून? झाला, संशयाचा निकालच झाला. आणखी काय पाहिजे?

**कृत्तिका**—(डोळ्याला पदर लावून) माझ्या मात्र जन्माचं मातेरं केलं हो!

**आश्विन**—(मनाशीं) बिचारी रडूं लागली. अरे अरे, यावरून तर अगदीं स्पष्ट दिसतं !

**कृत्तिका**—बरं, त्या मुलीचं नांव काय बरं ?

**आश्विन**—रेवती.

**कृत्तिका**—रेवती का ? (मनाशीं) असो, नांव तरी कळलं सटवीचं !

**आश्विन**—तुमच्या दृष्टीस ती कधीं पडली होती का ?

**कृत्तिका**—ती ? माझ्या दृष्टीस ! अहो काय सांगूं आतां ? बायकांनीं अशा गोष्टी पुरुषांजवळ बोलूं नयेत म्हणून, नाहीं तर काय काय दृष्टीस पडलं नीं काय काय नाहीं, सगळं सांगितलं असतं.

**आश्विन**—म्हणजे, कांहीं भलतासलता प्रकार पाहिलात कीं काय ?

**कृत्तिका**—अहो, एखादी सतरा अठरा वर्षांची तरणी ताठी पोरंगी परक्या पुरुषाच्या आंगावर खुशाल हवी तशी लोळूं लागली, तर तुम्ही याला भलतासलता प्रकार म्हणाल ना ?

**आश्विन**—फाल्गुनरावांच्या आंगावर लोळूं लागली ?

**कृत्तिका**—हो, त्यांच्याच आंगावर-मांडीवर, झालंच त्यांच्या खांद्यावर हात टाकून-आंगाला-मला सांगायला लाज वाटते. आणखी दिवसाढवळ्या हो. अगदीं आमच्या घरासमोर-त्या झाडाखालीं.

**आश्विन**—काय बेशरम आहे पहा.

**कृत्तिका**—झालंच. त्यांनीं तिला अशी धरलेली सांगतेंना—

**आश्विन**—रेवती, तूं इतकी बेमान निघशील असं मला स्वप्नांत सुद्धां वाटलं नव्हतं ! पण लौकरच खरं स्वरूप प्रगट केलंस म्हणायचं ! असो; कृत्तिकाबाई, तुमच्या साह्यानं सर्व उलगडा झाला हे माझ्यावर तुमचे फार उपकार झाले. पण शेवटीं एकदां विचारतों-हें सर्व खरंना ?

**कृत्तिका**—खरंना ? अहो प्रत्यक्ष या डोळ्यांनी पाहिलं म्हणतेंना ! आणखी खरंना कसलं ? धडधडीत मी पाहिलं ! शिवाय आमच्या यजमानांचा मला चांगला अनुभव आहे. काय हवं तें करायला मागं पुढं पहायचे नाहींत. आतां तुमच्या रेवतीबद्दल काय विचार करायचा तो करा.

**आश्विन**—तो आतां मला केलाच पाहिजे ! बरं, फाल्गुनरावांजवळ ती तसबीर आहे का ?

**कृत्तिका**—हो त्यांच्याचजवळ आहे. मीं कुठं क्षणभर हातांत घेतली होती तर ,राक्षसासारखे चवताळून माझ्या आंगावर आले आणि माझ्या हातून ती त्यांनीं ओढून घेतली. मला संशय आलाच होता म्हणून जरा लागून बोललें, पण पुरुषच ते ! माझ्यावरच उलटले कीं हो ! (पदर डोळ्यास लावून) मलाच म्हणतात, ही तुझ्या कुणातरी ह्याचा तसबीर घेऊन बसली आहेस म्हणून. किती बरं खोटं बोलणं हें !

**आश्विन**—नका, रडूं नका. आतां मी आहे तुमचा साक्षीदार. तुम्हीं अगदीं भिऊं नका. घेऊं निरोप आतां ?

**कृत्तिका**—बरं, त्यासंबंधानं आणखी कांहीं पहाण्यासवरण्यांत आलं तर मला कळवा म्हणजे झालं.

**आश्विन**—त्याबद्दल अगदीं काळजी करूं नका. येतों तर (जातो.)

**कृत्तिका**—संभावित, मोकळ्या मनाचा आहे विचारा. नाहीं तर आमचे हे. मी म्हणतें, हे नवरे असा आमचा छळवाद करतात, त्यापेक्षां एकदम जाळून भाजून कां टाकीत नाहींत, म्हणजे झालें मोकळी ! हो, पण रोहिणीची हकीकत ऐकायची राहिली आहे. तिच्याकडे जाऊं या.

(जाते.)

—०—

## प्रवेश २ रा.

(फाल्गुनरावाचे बंगल्याजवळ.)

**फाल्गुन**—एकंदरीत त्यानं आपलं नांव आश्विनशेट म्हणून सांगितलं तें खरंच. आतां काय तोंडओळख झाली, ठिकाण समजलं, नांवही कळलं, मग राहिलं काय ?

कांहीं नाहीं. फक्त घरांत जायचं आणखी अर्धचंद्राचा प्रयोग करून तिला बाहेर काढायची. पण हा कोण ? हाच तो आश्विनशेट माझ्या घरांतून बाहेर पडतो ! आणखी हा भादव्या त्याच्या वरोबर. ( आश्विनशेट आणि भादव्या येतात. ) ( मनाशीं ) अरे भादव्या त्याच्याकडून लांच घेतो आहे ! कायरे भादव्या काय घेतलंस तें ?

**भाद्व्या**—कांहीं नाहीं धनीसाहेब ! हे म्हणाले, रुपया घे ! पण धनीसाहेब, मी कशाला घेऊं त्यांचा रुपया ? परत देणार होतों इतक्यांत आपण आलांत.

( रुपया टाकून निघून जातो. )

**फाल्गुन**—अरे चोरा, ( आश्विनशेटास ) कांहो, कां तुम्हीं माझ्या घरीं ?

**आश्विन**—आपल्याकडेच आलों होतों.

**फाल्गुन**—कां ?

**आश्विन**—माझी एक तसवीर तुमच्याजवळ आहे ना ?

**फाल्गुन**—होय आहे. ही बातमी तिनं दिली वाटतं तुम्हाला ?

**आश्विन**—हो, हो, तिनंच दिली.

**फाल्गुन**—आणखी काय सांगितलंन् ?

**आश्विन**—आणखी पुष्कळ भानगडीच्या गोष्टी सांगितल्या आहेत.

**फाल्गुन**—नाहीं, त्याबद्दल मला शंकाच नव्हती ! बरं पण आतां पुढें बेत काय ठरला आहे तुमचा ?

**आश्विन**—बेत काय ठरायचा ? हें पहा, यःकश्चित् तसबिरीबद्दल मी कांहीं तुमच्याशीं भांडत बसत नाहीं; कारण तिनं ज्याअर्थीं आपल्या खुषीनं ती तुम्हांला दिली त्याअर्थीं—

**फाल्गुन**—नाहीं नाहीं. तुम्ही चुकतां इथं. तिनं दिली नाहीं, मी घेतली.

**आश्विन**—तिनं दिली असो, किंवा तुम्ही घेतली असो, सध्यां ती तसवीर तुमच्याजवळ आहे, हें खास ना ?

**फाल्गुन**—होय आहे.

**आश्विन**—झालं तर मग ! त्या तसबीरीचं तुम्हीं आतां वाटेल तें करा ! मला इतकंच म्हणायचंय कीं, माझा मात्र तुम्हीं सर्वस्वीं घांत केलात !

**फाल्गुन**—तो कसा ? मी तुमच्या चैनींत आड आलों म्हणून वाटतं ?

**आश्विन**—हो, अलबत !

**फाल्गुन**—तर मग तुमच्या मनांत मी अगदीं दुष्ट, घातकी मनुष्य ठरलों असेन, नाहीं बरं ? गरीब बापड्यांच्या सुखांत अंतर पाडणारा कोण निष्ठुर राक्षस मी !

**आश्विन**—तें काय पाहिजे तें म्हणा, पण नुकतीच जी केवळ माझी प्राण झाली होती, तिच्या माझ्यांत तुम्हीं बिघाड पाडलांत, अगदीं कायमचाच पाडलांत.

**फाल्गुन**—जी माझा केवळ प्राण झाली होती ? अगदीं उघड उघड सांगतां कीं हो ! अहो पण शहाणे ! तुमची ती प्राण झाली होती त्यावेळीं माझे प्राण तडफडत होते, त्याची कांहीं तुम्हांला कींव येत होती का ?

**आश्विन**—झालं तें झालं, पण आतां शपथ घेऊन सांगतो कीं या उपर तिचा माझा संबंध तुटला. तुम्ही तिचे आणि ती तुमची ! खुशाल लागेल तसा गोंधळ घाला.

**फाल्गुन**—औदार्य तर खूप दाखवलंत. पण त्याचा आतां मला कांहीं उपयोग नाहीं. तुम्हीं जसं मला सांगितलंत तसं मीही तुम्हांला सांगतो कीं, या उप्पर तिचा माझाही संबंध नाहीं. ही ती तुमची आणि तुम्ही तिचे. तुम्हीच वाटेल तसा गोंधळ घाला.

**आश्विन**—छे, छे, नको, आतां तिच्याशीं म्हणून व्यवहार नको. झाला तितका बस्स झाला.

**फाल्गुन**—कां इतक्यांत तिचा वीट आला वाटतं !

**आश्विन**—जितकी ती पूर्वी मला प्यारी होती तितकी आतां माझ्या मर्जीतून उतरली. बेमान !

**फाल्गुन**—बेमान ! ( स्वत:शीं ) खरंच बेमान ! काय न्याय आहे पहा ! मालकाच्या आधीं चोराची बोंब ! ( उघड ) तुमच्याशीं भांडत बसण्यांत काय अर्थ ! तिच्या संबंधानें मला जें करायचं तें मी करतों. तुम्हांला वाटेल तें करा. ( जातो )

**आश्विन**--मला दुसरं काय करायचं ? हें सगळं लबाडीचं माप तिच्या पदरांत घालतों, आणखी-हो तिच्या देवाची काय भीति आहे ? प्राण गेलें तरी बेहत्तर ! पण पुन्हां म्हणून तिचं नांव काढायचा नाहीं. (जातो.)

—०—

## प्रवेश ३ रा.

(रेवती तसबीर शोधीत येते.)

**रेवती**--ही काय पण भूतचेष्टा झाली म्हणतें मी ? त्यांनीं मला याच झाडाखालीं तसबीर दिलीं वाटतं ? हो, हेंच तें झाड आंब्याचं आणि ती पाहून मी पदराखालीं झांकून घेतली, इथूनच पुढें कार्तिकनाथाला गेलें, प्रदक्षिणा घालून बाहेर तुळशीकट्ट्यावर थोडीशीं टेकलें. तिथं तर पडलीं नसेलना ! नाहीं, कारण तिथून निघाल्यावर देवळाबाहेर येतांना ती थोडीशी उघडी पडली होती ती मी झांकून घेतलेली मला चांगलं आठवतं ! मग, मग-हो, हो ! मी याच सुमाराला घेरी येऊन पडलें; तेव्हां कदाचित् खालीं जमिनीवर पडली असेल, आणखी मी शुद्धीवर येऊन घरीं जातांना माझं मन जरासं गोंधळून गेलं होतं म्हणून कीं काय कोण जाणे, तिची कांहीं मला शुद्ध राहिली नसावी. मला ज्यांनीं घरीं पोंचविली त्यांच्या तर ती हातीं लागली नसेलना ? पण तसं झालं असतं तर त्यांनीं ती माझी मला पोंचती केली असती. तर मग काय झालं तसबिरीचं ? आश्विनशेट म्हणाले, ती मी एका गृहस्थाच्या हातांत पाहिली. तो गृहस्थ कोण असावा बाई ? त्यांच्या मनांत जी शंका आली ती त्यांच्या समजुतीप्रमाणें वाजवी आहे. पण आतां मी काय करूं ? ते माझ्यावर रागावून गेले; म्हणून मेली हळहळ लागून राहिली आहे.

पद ('शाम घुंगट पट खोलो' या चालीवर.)

**संशय कां मनिं आला ॥ कळेना ॥ कारण काय तयाला ॥ ध्रु० ॥**
**आळ वृथा कीं, चित्र दिलें मीं ॥ कोण्या पर-पुरुषाला ॥ १ ॥**
**कोपुनि गेले; ही मज लागे ॥ हळहळ थोर मनाला ॥ २ ॥**

(पाहून) अगबाई, हे आश्विनशेटजीच इकडे येत आहेत. ही मुद्रा रागाची म्हणावी

कीं संशयाची म्हणावी ? या चिन्हांवरून मनांत कांहीं गोंधळ चालला आहे खरा. (आश्विनशेट येतो त्यास) दृष्टी बिचारी माझ्याकडे धांव घेते तिला बलात्कारानं दुसरीकडे वळविण्यांत काय अर्थ ?

**आश्विन**—(पुटपुटतो) हो, दृष्टि धांव घेते तर ! फोडून टाकीन अशी सैरावैरा धावूं लागली तर.

**रेवती**—मला ऐकूं येण्यासारखं मुद्दाम पुटपुटायचं, त्यापेक्षां उघड बोललेलं काय वाईट ? हे मी झाडावरच्या पोपटाला म्हणतें हो—नाहींतर इथें कुणी आपल्या-कडेच ओढून घेईल.

**आश्विन**—लागली मायाजाळ पसरायला, पण हा पोपट असला तसला नव्हे. असलीं दहावीस जाळीं घेऊन उडून जाणारा हा पोपट आहे.

**रेवती**—मग का घोटाळतो इथं ?

**आश्विन**—कांहीं कुणाची भीति नाहीं. हमरस्ता आहे हा. पाहिजे त्यानं हवं तिथं तब्येत लागेल तितका वेळ उभं राहावं आणि लहर लागेल तेव्हां जावं. ज्याचा तो मुखत्यार आहे.

**रेवती**—(जवळ जाऊन) परवां त्या बुवानं किती उघड अर्थाचं कवन म्हटलं तें मी आपल्या मनाशीं मोठ्यांदा म्हणतें. कुणी ऐकायचं नाहीं ! काय बरं तें ? हों !

**पद** (जल जयो ऐसो—या चालीवर) 

हृदयीं धरा हा बोध खरा ॥ संसारीं शांतिचा झरा ॥ ध्रु० ॥
संशय खट झोटिंग महा ॥ देउं नका त्या ठाव जरा ॥ १ ॥
निशाचरी कल्पना खुळी ॥ कवटाळिल ही भीति धरा ॥ २ ॥
बहुरूपा ती जनवाणी ॥ खरी मानितां घात पुरा ॥ ३ ॥

कां, समजला कां याचा अर्थ ?

**आश्विन**—हो ! हो ! समजला याचा अर्थ. आणखी तुझाही अर्थ लक्षांत आला.

**रेवती**—नुसती मेली माझ्या अर्थाची ओळख पटायला इतकी का उरस्फोड करावी लागली ? आतां तरी पुरती ओळख पटली ना ?

**आश्विन**—पटली, आतां अगदीं पुरी ओळख पटली. तूं एक छानदार सोनेरी मुलामा दिलेली–हिणकस–चालती बोलती बाहुली आहेस झालं.

**रेवती**—( मनाशीं ) अजून कांहीं यांच्यावरचा संशयाविषाचा अम्मल उतरला नाहीं. काय बरं करावं ? ( उघड ) इतका विनोद पुरे नाहीं का झाला ? हा मेला विनोदाचा मासला मला नाहीं आवडत; म्हणून म्हणतें, एकदां गालांतच कां होईना पण गोडसं हंसून घरापर्यंत चला. आणखी मी एक गोड पट्टी करून देतें तेवढी खाऊन मग हवें तर पुन्हां माझ्यावर रागावून चला. कां ? झालं ? झालं मनासारखं ? हे पहा तुम्ही न हसतां हे गालच हसूं लागले.

**आश्विन**—आतां तुझं घर आणखी तुझ्या हातची पट्टी ? विसरा–विसरा तें आतां.

**रेवती**—पहा बरं, काय बोलतां ह्याचा विचार करा. ही संधि पुन्हां यावयाची नाहीं. इतकंच नव्हे, पण मग कितीही शपथा घेतल्यात, वचनं दिलींत, चुकलों म्हटलंत, क्षमा मागितलीत तरी मी तिकडे लक्ष सुद्धां द्यायची नाहीं; म्हणून म्हणतें नीट विचार करा, आणखी चला माझ्या घरापर्यंत.

**आश्विन**—ती आर्जवाची आणि क्षमा मागण्याची वेळ गेली पार निघून. याउप्पर तसली गोष्ट स्वप्नांत सुद्धां आणूं नकोस. इतका कांहीं मी दुधखुळा नाहीं.

**रेवती**—खरंच का, पण हें मला नाहीं वाटत ! ( हांसते. )

**आश्विन**—हांस, वाटेल तितकी हांस. इतके दिवस मला आपला भोळसरसा पाहून पिंजऱ्यांत कोंडून ठेवायचा बेत केला होतास, पण—

पद ( 'कर तुले जाये' या चालीवर. )

**कुटिल हेतु तुझा फसला ॥ निजपाशीं गज बांधायाचा ॥ ध्रु० ॥ महा घोर मरणांतुनि सुटलों ॥ उरीं विषारी नेत्र–भल्ल हा होता घुसला ॥ १ ॥**

**रेवती**—बरं झालं हो, तुमचं नशीब चांगलं म्हणून लौकर उमजून मोकळे झालांत. आतां पाहिजे तिकडे बिनघोर चला.

**आश्विन**—मी पाहिजे तिकडे जातों, आणि तूंही पाहिजे तिकडे जा किंवा पाहिजे त्याच्या—

**रेवती**—हं महाराज, मर्यादा सुटूं लागली !

**आश्विन**—कांहीं हरकत नाहीं. मर्यादेची पर्वा बाळगण्याची ही वेळ नव्हे. तुझ्यासारख्या खोडसाळ बायकोजवळ कसली आली आहे मर्यादा !

**रेवती**—मी खोडसाळ ?

**आश्विन**—हो हो खोडसाळ, तुझं सर्व गारूड मला समजलं आहे. पण कशाला बोलूं ? रेवती, खरोखर मी तुला प्राणापेक्षां प्यार समजत होतों. पण तोच तुझा मला आतां इतका तिटकारा आला आहे कीं काय सांगूं ? थोडंसं वाईट वाटतं, पण सांगतोंच कीं, या उप्पर माझी भेट तुला कधीं व्हायची नाहीं !

**रेवती**—ती कां व्हायची नाहीं ? आणि असं तिटकारा येण्यासारखं माझ्या हातून काय झालं ?

**आश्विन**—काय झालं ? एक तर मी दिलेली तसबीर तूं एका सोद्याला देऊन टाकलीस.

**रेवती**—( मनाशीं ) अगदीं खोटा आरोप करतात, तेव्हां यांची अशीच खोड मोडली पाहिजे ! त्याशिवाय इलाज नाहीं.

**आश्विन**—कां बोलत नाहींस ! दिलीस कीं नाहींस ?

**रेवती**—हो दिली ? मग काय म्हणणं आहे आपलं ?

**आश्विन**—कां दिलीस ?

**रेवती**—कां म्हणजे ? मला वाटलं, मीं दिली.

**आश्विन**—दिलीस तर दिलीस. मला थोडंच वाईट वाटणार आहे त्याबद्दल !

**रेवती**—मग असे सुस्कारे कां सोडतां ?

**आश्विन**—मी आणि सुस्कारे ? कांहीं बांगड्या नाहीं भरल्या हातांत.

**रेवती**—हो हातांत दिसत नाहींत खऱ्याच, पण सांभाळा हो! हें वीरश्रीचं पाणी जाईल जिरून आणि पुन्हा लागाल माझ्या दाराचे उंबरठे झिजवायला, पण मग मी पाऊल सुद्धां ठेवूं द्यायची नाहीं, संभाळून असा.

**आश्विन**—आणखी तूंही पण संभाळून ऐस, नाहींतर एकदां पडलीस तशी पुन्हां भर रस्त्यांत त्याच्या गळ्यांत जाऊन पडशील.

**रेवती**—ती कुणाच्या? केव्हां? कुठं-( मनाशीं ) हें नवीनच काढलंय यांनी?

**आश्विन**—कुठं म्हणजे? या झाडाखालीं, काल सकाळीं. तो म्हणत होता, घरांत चल. कां आलं कीं नाहीं ध्यानांत अजून?

**रेवती**—( मनाशीं ) समजलें, मी घेरी येऊन पडलें होतें त्यावेळचं असावं हें. पण यांच्याशीं खरं बोलून उपयोग नाहीं. कांहीं वेळ म घासारखं वाकडंच बोललं पाहिजे!

**आश्विन**—पटलीं कीं नाहीं खूण?

**रेवती**—बरं पटली. मग?

**आश्विन**—पुन्हां तशी पडूं नकोस.

**रेवती**—तें कां? कुणाची वंदी आहे मला? माझी मी मुक्त्यारीण आहे!

**आश्विन**—मग असं तूं अगोदरच सांगायचं होतंस.

**रेवती**—आम्ही जर असं सांगायला लागलों, तर आटपला आमचा बाजार!

**आश्विन**—तर मग—

पद ( नगरी मोरी ) 22

**स्वकर शपथ-वचनिं वाहिला ॥ उगिच कां तुवां ॥ निजतनु दिधली मला, तो काय, पोरखेळ नवा ॥ ध्रु० ॥ पसरली माया लटकिच कां ती ॥ वरिलें मग कां करुनि साक्षी त्या माधवा ॥ १ ॥**

**रेवती**—त्या शपथा आपण खऱ्या समजलांत एकूण?

पद ( हे श्रवण ) 22

**भोळिं खुळीं गवसती जीं धनिक वणिक बाळें ॥ धरायास त्यांस पाश असति निरनिराळे ॥ ध्रु० ॥ आण शपथ मम वचनें मानिति खरी कां ॥ हंसतिल जन म्हणतील ते शंभु खरे भोळे ॥ १ ॥**

**आश्विन**—बस्स, बस्स! झालं. हीच तुझी माझी अखेरची भेट. जातो आतां—

**रेवती**—सुखरूप चला बरं. पुन्हां असे फसूं नका.

**आश्विन**—( परतून ) तुला वाटत असेल कीं पुन्हां भेटेन म्हणून, पण तें विसरा आतां.

**रेवती**—विसरतें बरं, पण चला आतां एकदाचे! अगबाई, पुन्हां परतली स्वारी, आणखी काय राहिलं सांगायचं?

**आश्विन**—शेवटची, अखेरची एकच गोष्ट सांगायची राहिली ती ही कीं, तूं खरोखर माझं मन चोरून घेतलं होतंस, आणि मींही तें मोठ्या आनंदानं तुझ्या स्वाधीन केलं होतं, म्हणून तुला सोडून जायचं माझ्या जिवावर आलं आहे; तरी एकदां निश्चय केला तो केला, तो फिरायचा नाहीं; पण शेवटचं इतकंच सांगायचं कीं कुठंही खुशाल ऐस. ( जाऊं लागतो व पुन्हां परततो. ) आणि तुझ्याबद्दल कांहीं वेडंवाकडं माझ्या कानांवर येईल असं करूं नकोस. कारण

पद ( क्षण एक जो )

**मानिली आपुली तुजसि मीं एकदां ॥ दुःख शोक न कदा शिवुत तुजलागिं ते ॥ ध्रु० ॥ वंचिलें त्वां जरी हितचि तव वांछितो ॥ धरुनि सन्मार्ग तो धरिं सदा सुमतितें ॥ १ ॥ कष्ट जरि सोडितां नच नये मोडितां ॥ म्हणुनी जातों अतां गाळि नयनाश्रुतें ॥ २ ॥**

**रेवती**—या बरं. खरोखरंच पुन्हां भेटणार नाहीं?

**आश्विन**—आतां नांवच नको कांहूं भेटायचं! एकदां तोंडांतून शब्द गेले ते गेले धनुष्यावरचे बाण!

**रेवती**—तें खरं, पण संध्याकाळीं मीं बाहेर नकोना जाऊं? नाहीतर आपण याल आणि चुकामूक पडेल, म्हणून विचारतें.

**आश्विन**—प्राण गेला तरी यायचं नाहीं म्हणतो ना? मग चूकामूक कशी पडणार? ( जाऊं लागतो. )

**रेवती**---तें आलं माझ्या ध्यानांत, पण मी आज स्वत: मसाल्याचं दूध करणार आहे. आलां नाहींत तर मी रागवेन बरं !

**आश्विन**---रागाव, खुशाल रागव. ( म्हणत निघून जातो. )

**रेवती**---खरंच, यांचं माझ्यावर मनापासून प्रेम आहे. पण त्या तसविरीनं केला घोटाळा करून ठेवला आहे तो आधीं घरीं जाऊन उलगडला पाहिजे.

पद ( मेरा चित्त ) 25

**मजवरी तयांचें प्रेम खरें ॥ जें पहिलें जडलें तें उरे ॥ ध्रु० ॥**
**कसास लावुनि अंत पाहिला ॥ परि न जराही ओसरे ॥ १ ॥**
**संशय पटला दूर सारितां ॥ प्रकाशेल कीं मग पुरें ॥ २ ॥**

# अंक चवथा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**—आश्विनशेटजींचें घर.

**आश्विन**—मनानं पुष्कळ ओढाताण केली, परंतु मीच खंबीर पडलों, म्हणून तं आवरलं गेलं, नाहींतर कांहीं घडगत नव्हती. रेवतीच्या जहरी नेत्रभाल्याच्य माऱ्यांतून मोठ्या–मोठ्या शर्थीनं बचावलों, यांत संशय नाहीं. बड्या मी मी म्हण णारांची तारांबळ उडाली असती. असो. झालं तें होऊन गेलं म्हणा; पण ती ज आपल्या इमानाला जागली असती तर माझ्या सौख्याला आणि चैनीला मर्याद नव्हती. ती एक लाखांत खुपसुरत पोरगी आहे. पण आतां हा विचार कशाला तिच्या खुपसुरतीशीं मला काय करायचं? खुपसुरती म्हणजे एकंदर मुलामाच कं नाहीं? होता–बांधा चांगला होता.

पद ( बंधन वा बांधो. )—२६

**मृगनयना रसिक मोहिनी ॥ कामिनी होती ती मंजुळ मधुरा लापिनी ॥ नवयौवनसंपन्न रम्यगति विलासिनी ॥ ध्रु० ॥**
**आल्हादक मुखचंद्रहि होता, होती दृष्टी ती प्रेम–रस–वाहिनी ॥**

पण हे वरचेच अलंकार कीं नाहीं? जाऊ दे, तिचं नांव नको. तिच्या सद्गुणांचं आठवण नको पुन्हां. एकदां संबंध तोडला तो तोडला. स्मरण नाहीं करायच तिचं. पण–तिचं स्मरण बुजायला काय करावं वरं? रेवती, असा दगा दिलास अं–[ आषाढ्या येतो. ]

**आषाढ्या**—शेटसाहेब !

**आश्विन**—जाऊं द्या, जगांतच नाहीं म्हटलं, मोकळं झालं. (गुणगुणूं लागतो-)
" गणिकेचा संग नको, संग नको बारे "

**आषाढ्या**—( मनाशीं ) गाण्याची लहर लागली आहे. ( उघड ) शेटसाहेब, शेटसाहेब, मला-जरा—

**आश्विन**—( मनाशीं ) बस, ठरला निश्चय; त्याशिवाय भागायचं नाहीं, ( पाहून ) कोण ? आषाढ्या कारे ?

**आषाढ्या**—हें एक पत्र आलं आहे शेटसाहेब.

**आश्विन**—( मनाशीं ) असं करील म्हणून कधीं ध्यानीं नाहीं, मनीं नाहीं, स्वप्नीं नाहीं ( उघड ) अं? हो, हो काय म्हटलंस तूं?

**आषाढ्या**—हें एक पत्र आलं आहे आपल्या नांवाचं.

**आश्विन**—आतां नको जा, आणखी केव्हां तरी दे. ( मनाशीं ) तिचीं फळं ती भोगील, आपण मनाला कां उगीच ताप करून घ्या ?

**आषाढ्या**—शेटसाहेब, बघा तरी अगोदर कोणाकडून आलं आहे तें ?

**आश्विन**—काय म्हटलंस ?

**आषाढ्या** ( हळूंच ) मंगळवाड्याकडून आलं आहे, शेटसाहेब.

**आश्विन**—रेवतीकडून ? जा, जा. तें घेऊन जा आधीं. मला जरूर नाहीं त्याची; ढुंकून नाहीं बघायचा त्या पत्राकडे. चालता हो येथून. तें फाडून टाक, तुकडे तुकडे कर, जाळून राख कर त्याची. जा, जा.

**आषाढ्या**—( मनाशीं ) हें लचांड निराळंच दिसतंय ! हात दाखवला वाटतं त्या नायकिणीच्या पोरीनं, म्हणून अशी बिथरली आहे स्वारी. ( उघड ) खरंच घेऊन जाऊं कां शेटसाहेब ? का-

**आश्विन**—कां नाहीं कूं नाहीं. तें पत्र पुन्हां दाखवलंत तर खबरदार ! आत काय संबंध तिचा, आणि तिच्या पत्राचा ?

**आषाढ्या**—म्हणजे शेटसाहेब तिनं कांहीं—

**आश्विन**—पुन्हां तिनं-तिचं नांव नको काढूंस माझ्यासमोर. ती म्हणजे अशी ( मनाशीं ) पण आपण कशाला तिच्याबद्दल वाईट बोला ? भेटलं नाहीं-बोललं नाहीं-पत्र वाचलं नाहीं-किंवा निरोप ऐकला नाहीं म्हणजे झालं. मग काय चालणार आहे तिचं ? ( उघड ) आषाढ्या, आत्तांच्या आतां माझ्या मुशाफरीची तयारी करायला कारकुनाला जाऊन सांग. आणखी माझी थोरली घोड्याची गाडी जोडून आण. जा आधीं.

**आषाढ्या**—इतकी घाई ! मला वाटतं शेटसाहेब, आजचा बेत उद्यां सकाळावर टाकला तर बरा. म्हणजे कदाचित्—

**आश्विन**—नाहीं, या घटकेला निघणार. गाडी जोडूनं आण तूं.

**आषाढ्या**—मी ह्मणतो शेटसाहेब उद्यां सकाळीं शिळोप्याचें वेळीं त्रासही नाहीं व्हायचा. निघाल्यावर रात्रींच्या चांदण्यानं कदाचित् आपलं मन फिरलं ह्मणजे पुन्हां अर्ध्या रस्त्यांतून परत यायची दगदग नको.

**आश्विन**—काय शहाणा आहे ! माझं मन म्हणे तिच्याबद्दल फिरणार ! अरे भउचडीत नायकिणीची पोरगी ती, तिची कशाला एवढी मिजास ? जा गाडी आण आधी आणि तिलाही एकदां पक्कं कळलं पाहिजे, कीं मी कांहीं असा ढिला गडी नाहीं.

**आषाढ्या**—शेटसाहेब, याला इतकी मुशाफरीची तयारी कशाला पाहिजे ? आपली मर्जी खप्पा झाली आहे, हे तिला कळलं म्हणजे लोटांगण घालीत येईल पायापर्यंत.

**आश्विन**—अशी ढकलून देईन आली तर—पण तुला काय त्याचं ? सांगितलेलं काम कर मुकाट्यानं.

**आषाढ्या**—हुकूम शेटसाहेब; पण अगदीं सड्या स्वारीची एक मजलेची तयारी करायची ना ? कपडेबिपडे फार बरोबर नकोत ना ?

**आश्विन**—अगदीं सगळे सगळे पाहिजेत. एक महिना बाहेर घालवायचा अशा बेतानें तयारी पाहिजे,

**आषाढ्या**— एक महिना कशाला शेटसाहेब ?

**आश्विन**—तुला काय त्याची पंचाईत ? मनांत आलं, ठरलं, निश्चय केला तो नाहीं फिरायचा आतां हं, जा. (जाऊं लागतो) अशी मीं तिची खोड मोडणार. म्हणजे एक महिन्यांत तिचं दर्शन व्हायचं नाहीं आणि इतक्या अवधींत कदाचित् तिचं विस्मरणही पडलं तर पडण्याचा संभव आहे. तिचं स्मरण झालं कीं भडका होतो आंगाचा. आतां तसं जरा वाईटं वाटतं. अजून माझं मन तिच्याकडे ओढ घेतं. अजून वाटतं कीं–पण–छे, छे, छे, छे, छे ! हा नेभळेपणा बिलकुल उपयोगी नाहीं. तिचा आतां विचार मनांत येऊं दिला नाहीं म्हणजे झालं. पण- (मोठ्यानें) आषाढ्या, अरे आषाढ्या, गेला नाहींस अजून ? समजलों मी. तें पत्र जाळून टाक म्हणून तुला सांगितलं तें कांहीं तुझ्या हातून व्हायचं नाहीं. कुठं आहे तें पत्र ? दे फेंकून त्या कोंपऱ्यांत नाहीं तर आण इकडे. मीच त्याची व्यवस्था करतों.

**आषाढ्या**—(परत येऊन) मला वाटलंच होतं मागाल म्हणून. हें घ्यां शेटसाहेब. जाऊं आतां गाडी आणायला ?

**आश्विन**—वरचेवर काय विचारतोस ? पांचव्या आंकड्यें मोजीपर्यंत आली पाहिजे गाडी. ('हुकूम' म्हणून आषाढ्या जातो फाडून तर टाकायचं तर ठरलंच, पण यांत त्यासंबंधानं काय मखलाशी केली आहे ती तरी पाहूं (पत्र उघडून वाचू लागतो) "प्रिय वल्लभाच्या चरणीं नम्र रेवतीची विज्ञापना विशेष. कांहीं वेळांपूर्वी झालेल्या भेटींत मीं आपली थोडीशी थट्टा केली त्याबद्दल मला फार वाईट वाटतं त्या घटकेपासून माझ्या मनाला. चटका लागला आहे. तरी या गरीब दासीची चुकी पोटांत घालून एकवार भेट देण्याची कृपा करावी. म्हणजे आपल्या मनांत मजविषयीं जो संशय आला आहे तो दूर करीन. मूढ दासीनं अधिक काय लिहावं, हे विज्ञापना." काय भ्रमिष्ट आहे पहा. ! माझा संशय दूर करणार ! संशय उरला आहे कुणाला आधीं ? पुरी खात्री झाली आहे. आतां अशा लाडीगोडीनं कांहीं व्हायचं नाहीं. (पत्र फाडीत फाडीत.) 'मनाला चटका लागला आहे' अं ! फार नाजूक मन ! 'चुकी पोटांत घालून' ! काय लीनता ! पण मावली पाहिजेना पोटांत ! मूढ 'दासीनं अधिक काय लिहावं ?' खरोखरच मूढ ! नाहीं तर तिनं हे पत्रच लिहिलं नसतं. म्हणे 'माझ्या प्रियवल्लभा' ! माझ्यासारखे



**आश्विन**—अरे तीं सगळीं सोंग मला ठाऊक आहेत. जाऊं द्या; मला कशाला आतां रिकामी उठाठेव ? पण खरंच रडत होती का ?

**वैशाख**—तुमच्या गळ्याशपथ. तिची ती केविलवाणी मुद्रा पाहून मीं सुद्धां एकदां डोळ्यावरून हात फिरविला. तिला रडविण्यांत तुम्हांला काय थोरपणा वाटत असेल तो असो.

**आश्विन**—मी तिला मुद्दाम रडवीन असं कां तुला वाटतं ? त्या फाल्गुनरावाच्या बायकोनं मला सांगितलंन् तें तूं ऐकलं असतंस तर असं खास म्हटलं नसतंच.

**वैशाख**—तें सुद्धां कळलं आहे मला. आतां मी विचारतो त्याची मनोदेवता स्मरून खरीं खरीं उत्तरं द्या. तुमचं आणि तिचं ठरल्याप्रमाणें ती तुम्हाला रमाकांताच्या देवळांत भेटली, तुम्ही तिला तसबीर दिलीत, देवासमोर आणाभाका झाल्या. इथपर्यंत सर्व ठीक झालं. नंतर ती तेथून घरीं जायला निघाली. ती म्हणजे एक नाजूक जाईचं फूल. तिला कडक ऊन लागून वाटेंत जर घेरी आली तर हा तिचा दोष म्हणाल तुम्हीं ?

**आश्विन**—मी का वेडा आहें हा तिचा दोष म्हणायला ?

**वैशाख**—बरं घेरी येऊन पडणार इतक्यांत सुदैवानं तिथं फाल्गुनराव होते, त्यांनीं तिला सांवरून धरलं, वारा घालून शुद्धीवर आणलं, यांत कांहीं तिचा अपराध आहे ? न्यायाला स्मरून मात्र उत्तर द्या हं !

**आश्विन**—हा तिचा अपराध नाहीं, हे कुणीही कबूल करील.

**वैशाख**—रास्त बोललांत. बरं अगदीं भेदरून गेलेली, त्यांतून पुरी शुद्धीवर आली नव्हती; अशा स्थितींत हातांतून गळून बाजूला पडलेल्या तसबिरीचं तिला भान राहिलं नाहीं, तर हा काय तिचा गुन्हा म्हणायचा ?

**आश्विन**—हा कसा तिचा गुन्हा होईल ? असं म्हणणारा शतमूर्ख असला पाहिजे.

**वैशाख**—अगदीं बरोबर बोललांत ! बरं, तिथं ती पडलेली तसबीर कुणाच्या हातीं लागली तर ?

**आश्विन**—तसबिरी संबंधानं तिच्याकडे दोष नाहीं, हें केव्हांच माझ्या मनांत येऊन चुकलं आहे; पण फाल्गुनरावाच्या बायकोनं जो अप्रशस्त प्रकार पाहिलान्, त्याबद्दल काय सांगणार तूं ?

**वैशाख**—तेंच सांगणार होतो. अहो धडधडीत अस्ताव्यस्त स्थितींत तिला फाल्गुनरावानं पडतां पडतां आपल्या अंगावर सांवरून धरली होती, अशा प्रसंगीं कृत्तिकाबाईनीं तिला आणि आपल्या नवऱ्याला पाहिलं; तेव्हां आधींच मत्सरानं जळणाऱ्या तिच्या मनांत भलत्याच कल्पना आल्या, त्याला रेवतीनं काय करावं? खरंच सांगा त्या स्थितींत तुम्हीं काय केलं असतंत ?

**आश्विन**—(चेहेरा खुलत) खरंच! खरंच! खरंच! पण हें सगळं खरंच सांगतोस ना? खराच असा प्रकार घडला? माझ्या गळ्याशपथ?

**वैशाख**—अगदीं तुमच्या गळ्याशपथ.

**आश्विन**—तर मग हा निघालों तिच्याकडे. तिला भेटेन, तिची क्षमा मागेन, तिची समजूत पाडीन, तिला हंसायला लावीन तरच तुला फिरून तोंड दाखवीन.

**आषाढ्या**—(आंतून येत येत) शेटसाहेब. गाडी तयार आहे.

**आश्विन**—जा. जरूर नाहीं गाडीची. आमचा बेत फिरला.

**आषाढ्या**—हें मीं आधींच सांगित होतं. सोडतो तर घोडे. (जातो.)

**आश्विन**—शाबास वैशाख! आज तूं होतास म्हणून थोडक्यांत निभावलं, नाहीं तर गोष्ट कोणत्या थराला गेली असती सांगवत नाहीं. विनाकारण मी तिचा छळ केला तिला भेटलंच पाहिजे. अरे आषाढ्या, गाडी-पण नको पायींच जाऊं. काय कृत्तिकाबाई मूर्ख पहा, कारण तें काय क्षुल्लक, आणखी संशय काय घेतलंना आतां आधीं फाल्गुनरावाकडून तसबीर घेतों, आणि तीच पुन्हां रेवतीला नजर करतों. खरंच, यांत दुहेरी मौज होणार आहे. वैशाख तूं जा आतां. मी आतां चाललों फाल्गुनरावाकडे. (दोघे जातात)

—०—

## प्रवेश २ रा.

### स्थळ रेवतीचें घर.

(रेवती बोलत बसली आहे.)

**रेवती**—(आपल्याशीं) आपला शेंडा ना बुडखा! संशय आला तरी कसा मनांत? खरं म्हटलं म्हणजे, त्यांचं तोंडसुद्धां पाहूं नये पुन्हां. पण असं मनांत येतं, कीं त्यांच्याकडे तरी काय आहे? त्या कृत्तिकाबाईनं त्यांच्या मनांत विषारी वारं फुंकलं, त्यानं त्यांचं डोकं असं भणभणून गेलं. कोण आहे ग तिकडे? तारके, शेटजींकडे पत्र घेऊन गेलेला मनुष्य आला का? (तारका येते.)

**तारका**—अजून नाहीं आला.

**रेवती**—कां बरें नाहीं आला? म्हटलं म्हणजे, इतका उशीर लागूं नये. एकदां भेटेन, आणि संशय दूर करीन असं झालं आहे. उगीच मीं चांडाळणीनं त्यांना नांवं ठेवलीं, त्यांचा पाणउतारा केला; तसाच त्यांचा राग शांत करायचा टाकून उलट मीं त्यांना टाकून बोलून खिजवलं; बरं, फाल्गुनरावाकडे निरोप घेऊन गेला होता त्याचं काय झालं?

**तारका**—त्यांचा निरोप आला, ते स्वतःच इकडे यायला निघाले आहेत, इतक्यांत येतील.

**रेवती**—(मनाशीं) ते आले म्हणजे त्यांच्याकडून आश्विनशेटजींच्या मनांतली तळमळ काढली पाहिजे. निघेल अशी खात्री नाहींच, पण आपली मनाची समजूत. यापुढें मात्र कानाला चिमटा! अगदीं बेतानं, मर्जीचा कल पाहून तोंडांतून शब्द काढायचा. (पाहून) हे फाल्गुनरावच आले.. तारके, ते आले म्हणजे तूं बाहेर जा, बरं का. (फाल्गुनराव येतो)

**रेवती**—या, बसा. माझ्या विनंतीला मान दिलांत, आनंद झाला मला.

**फाल्गुन**—यांत कसला मान? हें चालायचंच असं.

**रेवती**—निरोप पाठवायचं कारण इतकंच कीं, आपल्या घरांत कांहीं प्रकार घडला आहे. मला कांहीं त्यासंबंधानं बोलायची गरज नाहीं, पण त्याची झळ मला येऊन लागली म्हणून बोलायचं.

**फाल्गुन**—तुला ही एकदांच लागली. पण मला रात्रंदिवस त्या झळींतच होरपळावं लागतं, त्यांची फिर्याद कुठें करूं ?

**रेवती**—मग काय म्हणायचं ? पण आपण कृपाकरून मनावर घ्याल तर माझा तरी त्रास चुकणार आहे.

**फाल्गुन**—कसा तो सांग, म्हणजे माझ्याकडून कांहीं कसूर व्हायची नाहीं. हें मी अगदीं मनापासून सांगतों.

**रेवती**—माझ्यावर जो प्रसंग गुदरला आहे तो आपल्या कुटुंबा—

**फाल्गुन**—समजलों. तिच्यामुळें माझ्यावर काय कहर उठला आहे तो सांगून सुद्धां तुला कळायचा नाहीं. असो; पण तिनं काय केलं ?

**रेवती**—त्यांनीं आमच्या ह्यांच्यांत आणि माझ्यांत कांहीं कलागत लावून माझ्या जन्माचा घात करून टाकला. अशी मीं त्यांची काय गाय मारली होती बरं ?

**फाल्गुन**—(मनाशीं) ही कांहीं नवीनच भानगड दिसते. (उघड) ती काय कलागत लावली सांग पाहूं ?

**रेवती**—कलागत हीच कीं आमच्यांची माझ्यावर अगदीं कायमची गैरमर्जी करविली.

**फाल्गुन**—आणि तिची मर्जी त्यांनीं संपादन केली, असंच ना ?

**रेवती**—तसं मी कशाला म्हणूं? पण कृत्तिकाबाईच्या मनांत माझ्याबद्दल सवतीमत्सर शिरला आहे खरा.

**फाल्गुन**—सवतीमत्सर ! तुझ्याबद्दल सवतीमत्सर ? तो कां ?

**रेवती**—रमाकान्ताला ठाऊक ! आपण काल, मला पडतां पडतां सांवरून धरलीत ती ? त्याचा कांहीं त्यांनीं भलताच अर्थ केला, आणि आमच्यांना असं सांगितलं कीं, आपला माझा म्हणे-काय बरं हे !

**फाल्गुन**—अग कुभांडे! हां समजलों. आपलीं कारस्थानं लपवायला तिनं हा कावा केला आहे.

**रेवती**—तें काय असेल तें ईश्वराला माहीत! पण आपणच सांगा, कीं या कुभांडांत एक अक्षर तरी खरं आहे कां? मला नायकिणीला म्हणजे अगदींच का अब्रू नाहीं.

**फाल्गुन**—तूं अगदीं काळजी करूं नकोस. मीच तुझ्या त्यांना भेटून सांगतो म्हणजे झालं कीं नाहीं? नांव काय त्यांचं?

**रेवती**—बहुतकरून इतक्यांतच येतील ते. त्यांच नांव आश्विनशेट.

**फाल्गुन**—आश्विनशेट!

**रेवती**—होय, पण आपण असे दचकलांत कां? ओळख आहे वाटतं कांहीं?

**फाल्गुन**—ओळख? अशी तशी नाहीं. त्याला जेव्हां मी चांगला हात दाखवीन, तेव्हांच कदाचित् त्याची ओळख विसरेन.

**रेवती**—( घाबरून ) अगबाई! म्हणजे?

**फाल्गुन**—हा माझ्या बायकोचा कावा आहे म्हणून मीं तुला मघाशीं सांगितलंच. त्या संबंधांत त्याचांहि अंग आहे. त्या दोघांनीं मिळून तुझ्याप्रमाणेंच माझ्यावरहि आरोप आणला आहे. म्हणजे तूं आणि मी-निव्वळ खोटं आहे कीं नाहीं हें?

**रेवती**—मीं अग्नींत उभी राहून सांगतें कीं, हें अगदीं खोटं आहे म्हणून. पण आश्विनशेट अशी गोष्ट करतीलसं आपल्याला वाटतं?

**फाल्गुन**—नुसतं वाटत नाहीं. माझी खात्री झाली आहे त्या विषयीं; आणि म्हणूनच तर मी इतका जळतों त्याच्याबद्दल.

**रेवती**—मला नाहीं खरं वाटत बाई, खरंच का सांगतां हें?

**फाल्गुन**—संशय कशाला? ही तसबीर आश्विनशेटांनीं तिला दिली. ( ती दाखवितो. ) पाहिलीस! आणि मीं ही तिच्या हातांतून हिसकाऊन घेतली. तिनं हिचे मुके घेतलेले आणि हिला उराशीं धरलेलं मीं पाहिलं. बोल, आतां कोणती शंका राहिली?

**रेवती**—त्यांनीं ही तसबीर तुमच्या कुटुंबाला दिली? मम मात्र शिकस्त झाली कुबेगिरीची! आपण दुसऱ्याला देऊन माझ्याशीं विनाकारण कीं हो तंटा केला? त्यांनीं दिली हें जर खरं ठरलं—

**फाल्गुन**—त्यांत शंकाच घेऊं नकोस. माझ्या घरांतून असा भामट्यासारखा, टेहेळीत टेहेळीत छपून येतांना मीं त्याला पाहिला; त्याची माझी बोलाचाली झडाली; त्याला मीं चांगला खरपूस झाडला; इतकं झाल्यावर शंका कसली?

**रेवती**—लफंगे हो लफंगे हे! काय वचनं दिलीं, किती आणाशपथा वाहिल्या! कशी साखर पेरली! पण सारी लबाडी! आतां आपल्याला माझी काळजी. दुसरं काय बोलूं!

**फाल्गुन**—त्यांची नको फिकीर. त्याचे सर्व बेत ढासळून टाकले नाहींत तर, मी कसला फाल्गुनराव! बरं मग मी जातों आतां, बभ्रा करून फायदा नाहीं. त्याला चांगला नरम आणला पाहिजे.

**रेवती**—( पानाला चुना लावीत ) चांगली फंजिती करा बरं कां! पुन्हां तोंड काढूं नये वर.

**फाल्गुन**—माझ्या हातून होईल तितकं करतों, झालं!

**रेवती**—( पट्टी करीत मनाशीं ) उगीच मीं पत्र लिहिलं असं वाटतं आतां—
( ती पट्टी देते, फाल्गुनराव निरोप घेऊन जातो. )

**पद.** ( बाट चलत छेडत. ) २८

हा खचित दिसत मम भाग्यकाल ॥
मोहुनी त्यांच्या कपट भाषणा ॥
नाहिं सोडिलें सदन काल ॥ ध्रु० ॥
श्रीयुत संभाविती हे दाविती ॥
परि आचरणीं उलट चाल ॥ १ ॥
भव्या, हीन मग गणिका आम्ही ॥
उघड घालितो मोहजाल ॥ २ ॥

पुन्हां पत्र लिहितें की आतां भेटायला यायची कांहीं जरूर नाही. झाल्या भेटी तितक्या पुष्कळ झाल्या. ( जाते )

—०—

## प्रवेश ३ रा.

( आंबराईचा कोपरा. फाल्गुनराव येतो. )

**फाल्गुन**—संध्याकाळ झाली, अंधार पडत चालला, दिसेनासं झालं, तरी ती स्वाती कां येत नाहीं ? भादव्यानं जागा तर भलतीच सांगितली नाहीं ना ? नाहींतर, मीं सांगितलं होतं आंबराईचा कोंपरा, आणि त्यानं सांगितलं असेल कोपऱ्यांतली आंबराई. ( न्याहाळून ) तें काय बरं ? मनुष्य आहे. तसाच बुरखा दिसतो, तेव्हां बायको असावी, आणखी बायको म्हणजे स्वातीच. ( खाकऱ्या आवाजानें ) ए, ए, ए स्वाती ! हो तीच ! अग इकडे, इकडे ये. बस्स, अगदीं म्हणजे वेळेवर अगदीं आलीस ( बुरखेवाली प्रवेश करिते. )

**बुरखेवाली**—( घाबऱ्या घाबऱ्या ) आलें बाई एकदां सुरक्षित. फाल्गुनराव, मीं अगदीं घाबरून गेलें आहे. अगबाई !

**फाल्गुन**—आं ! आं !! काय, झालं काय ?

**बुरखेवाली**—हा पहा, सर्वांगाचा थरकांप झाला आहे. छे छे ! नकोग बाई अशा वेळीं एकटं हिंडणं !

**फाल्गुन**—पण काय झालं तें तरी आधीं सांग.

**बुरखेवाली**—आपल्याला काय सांगू फाल्गुनरावजी, येतां येतां वाटेंत त्या तिथं–पलीकडे एक कोण मेला दांडगेश्वर भेटला कुणाला ठाऊक ? पण इथं नाहीं सांगत, मला आपल्या घरांत घेऊन चला लौकर.

**फाल्गुन**—माझ्या घरांत ? छे छे, दुसऱ्या एखाद्या घरांत गेलों तर नाहीं का चालायचं ?

**बुरखेवाली**—अहं: ! प्राण गेला तरी दुसऱ्याच्या घरांत नाहीं यायची,

**फाल्गुन**—( मनाशीं ) ही तर असं म्हणते, आणि–आणि काय ? माझी बायको कांहीं यावेळीं घरांत नाहीं, हें ध्यानांतच नव्हतं. ( उघड ) बरं चल, पण दुसऱ्या एखाद्या घरांत गेलों असतों, म्हणजे बायकोची धास्ती बाळगायला नको होती.

**बुरखेवाली**—तें कांहीं नाहीं, मला आपण कसंहि करून आपल्याच घरीं घेऊन चला.

**फाल्गुन**—बरं तर चल; तिला कशाला इतकं भ्यायला पाहिजे ? ( दूर उभा केलेल्या भादव्यास ) अरे एं भादव्या, इकडे ये. कां रे आह्मी बाहेर पडलों तेव्हां ती घरांत नव्हती ना ?

**भादव्या**—( हळूंच पुढें येतो ) नव्हत्या धनीसाहेब.

**फाल्गुन**—बरं तर तूं पुढं हो आणि दारवीर उघडून ठेव आणखी दरवाजाच्या आंतल्या बाजूचा मोठा कंदील मालवून टाक. आंत जातांना कुणाला दिसणार नाहीं अशी तजवीज कर, समजलास ? जा लौकर.

**भादव्या**—होय धनीसाहेब. ( जातो. )

**फाल्गुन**—( तिच्या पाठीवर हात मारून ) शाबास, शाबास, आलीस, खूष झालों. चल आतां हळूच माझ्या आडून-आडून.

**बुरखेवाली**—पण हें कळायचं नाहींना तुमच्या घरांत ?

**फाल्गुन**—भलतंच, फक्त तुला ठाऊक कीं मला ठाऊक. ( दोघे जातात. )

—x—

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—फाल्गुनरावाचें घर.

( आश्विनशेट आणि रोहिणी. )

**रोहिणी**—जो घोंटाळा माजला आहे म्हणतां ! त्यांच्या मनांत यांचा संशय आणि यांच्या मनांत त्यांचा संशय. हे सगळे तुम्ही म्हणतां; त्या तसबिरांचे प्रताप ! दुसरं कारण कांहीं दिसत नाहीं.

**आश्विन**—या गोंधळाचा खुलासा करावा म्हणून तर मुद्दाम मी इथें आलों आहे. या कामीं मला फाल्गुनरावांची गांठ घेतलीच पाहिजे, दुसरी तोड नाहीं. म्हणून ते येईपर्यंत मी इथें थांबतो.

**रोहिणी**—मला वाटतं तुम्हीं इथं बसूं नये. कारण तुमच्या बसण्यानं भडकलेल्या आगींत तेल ओतल्यासारखें होईल.

**आश्विन**—तें कसं ?

**रोहिणी**—कसं तें काय सांगूं ? पण बसूं नये हें चांगलं. फिरून कांहीं वेळानं या हवेतर, पण आतां चला. ( चपापून ) अगबाई, आले. आले हो आले, त्यांचाच शब्द हा ! चला, चला लवकर या दारानं, आतां काय सांगावं बाई यांना ? त्यांनीं जर तुम्हांला या घरांत पाहिलं, तर बाईसाहेबांचा सर्वस्वी घात झाला म्हणून समजा. तुम्ही बाईसाहेबांकडे आलांत असं त्यांनीं एकदां डोक्यांत घेतलं म्हणजे देवालासुद्धां निघायचं नाहीं.

**आश्विन**—पण मी त्यांना असं समजून सांगेन कीं—

**रोहिणी**—हो, तुम्ही सांगाल हवं तें, पण त्यांनीं समजून घेतलं पाहिजेना ? ( ऐकून ) झालं, इकडेच येताहेत वाटतं. मी पाहून तरी येतें.

**आश्विन**—काय मूर्ख आहे ही ! विनाकारण घाबरून गेली आहे. ही कांहीं म्हणेना, मी फाल्गुनरावांची गांठ घेणारच.

**रोहिणी**—( घाईघाईनें ) तेच हो तेच, आले ! आणि त्यांच्याबरोबर बुरखा घेतलेली एक बायको आहे.

**आश्विन**—( मनाशीं ) बुरखा घेतलेली बायको ? रेवती तर नसेलना ? पुन्हां संशय आला. ( उघड ) तिचा चेहरा पाहिलास कां ?

**रोहिणी**—अहो बुरखा घेतलेली म्हणते ना ? पण तुम्ही, कृपा करून, सांगतें तिथें लपून बसा. एवढा कराच माझ्यावर उपकार.

**आश्विन**—ठीक आहे. लपून बसतों. ती बुरखा घेतलेली कोण, हें मलाहि कळलच पाहिजे. पण कुठें लपून बसूं ? एखादी निराळी खोली आहे का ?

**रोहिणी**—फाल्गुनराव निघून जाईपर्यंत तुम्ही या खोलींत बसा. फार झालं तर घटका अर्धी घटका बसावं लागेल. येतांना ? चला लवकर.

**आश्विन**—( हातरुमाल, जोडा वगैरे घेत ) चल, खोलींत लपीव, पेटांत लपीव, हवें तर बिछान्यांत लपीव, कुठेंहि लपीव, चल. ( मनाशीं ) ती जर कां रेवती असली तर—

**रोहिणी**—( त्याला खोलींत घालून ) हं बसा इथं. मी बाहेरून कुलूप घालतें बरं कां ? म्हणजे काळजी नाहीं. घालूं ना ?

**आश्विन**—हं, एक कां ? दोन घाल हवीं तर. ( ती कुलूप घालून जाते. )

( फाल्गुनराव व बुरखेवाली प्रवेश करतात. )

**फाल्गुन**—मी सांगितलं त्याला हं म्हण, मागशील तें देईन तुला. बरं आतां बुरखा काढीनास तोंडावरचा.

**बुरखेवाली**—नको नको, तें ऐकलंत कां ? कोणसं बोलतं आहे. कुणी पाहिलं तर काय होईल कोण जाणे.

**फाल्गुन**—इथं कोण येत काहे पहायला ? घाबरट कुठली ! या प्रसंगा माझं म्हणणं कबूल कर, की मी तुला जन्मभर विसरणार नाहीं, ही शपथ..

**बुरखेवाली**—पन तुमचा माझा कांहीं एकांत झाला हें जर तुमच्या बायकोला कळलं, तर मग कांहीं माझी धडगत नाहीं.

**फाल्गुन**—पण कळणार कसं ? हं बुरखा काढ आतां—

**बुरखेवाली**—मी नाहीं बाई ! पाहील कुणी !

**फाल्गुन**—दाराला कडी लावून येतों, मग तर झालं ? ( तसें करितो. ) या बायका म्हणजे भारी भित्र्या !

**बुरखेवाली**—नाहीं तर तुम्ही नवराबायको भांडाल आणि एक व्हाल, माझं मात्र मधल्यामध्यें मरण,

**फाल्गुन**—पुन्हां आणखी आपलं तेंच. अग एकदां तुटलेलं फळ फिरून चिकटेल कां ? त्यांतून त्या गचाळ बायकोचा मला इतका वीट वैताग आला आहे कीं, तिचं तोंड पाहायचा नाहीं याउप्पर ! मग दुसरं तिसरं दूरच राहिलं.

**बुरखेवाली**—पण हें बोलणं खरं कशावरून ?

**फाल्गुन**—तुझ्या गळ्याशपथ ! झालं आतां ?

**बुरखेवाली**—मग हा काढला बुरखा. (तसं करून उभी राहते) कां ? दचकलांत कां ? माझी काय भीति पडली तुह्मांला ?

**फाल्गुन**—[ गोंधळून ] अरे, ही तर माझी बायको !

**कृत्तिका**—अहो महाराज, महाराज, आतां कां तोंड मिटलं ? कां स्वातीला शपथ दिली ह्मणून माझ्याकडे पाहायचं नाहीं ? सांपडलेत कां आतां चांगले ? अजून युक्ति नाहीं वाटतं एखादी सुचत ?

**फाल्गुन**—तूं पाहिजे तें ह्मण. ह्या गाढव भादव्यानं हा पाजीपणा केलान्. कसा तो सांगतों तुला—

**कृत्तिका**—सांगा सांगा पाहूं ! गाढव भादव्या ! त्यानं फसवलं कां या भोळ्या शंकराला ?

**फाल्गुन**—तसं नाहींग लाडके !

**कृत्तिका**—असं असं, इतक्यांत मी गचाळाची लाडकीसुद्धां झालेसा ? तिची ओकारी आली आहे, तोंडसुद्धां बघायचं नाहीं, मग दुसरं तिसरं दूरच.' हें सुद्धां आपण म्हणालांत ना इतक्यांत ?

**फाल्गुन**—अग, मनांतला माझा तुजविषयींचा संशय घालवायला ही मी युक्ति काढली होती इतकंच.

**कृत्तिका**—एवढं माझं काम केलंस म्हणजे तुला जन्मभर विसरणार नाहीं, हें युक्तीतलंच कां सगळं ?

**फाल्गुन**—मग दुसरं काय ? मला ठाऊक, कीं त्या स्वातीला निरोप पाठवला ह्मणजे तुला कळणार; मग तूं बुरखा घेऊन मला भेटणार ! हें सर्व आधींच जुळवून

ठेवलं होतं मी. लोक बोलतात तें खोटं, उगीच संशय घेणं वाईट असं तुला कळावं ह्मणून हें मी केलं, समजलीस ?

**कृत्तिका**—फार खासं केलंत हो ! आतां मी भावाला पत्र लिहून इकडे बोलावते.

**फाल्गुन**—बोलाविनास ? तुझीच फजिती होईल.

**कृत्तिका**—पाहीन मग कुणाची होते ती. ( खोलीच्या दरवाज्याजवळ येऊन ) कुलुप कुणी घातलं दाराला ? आपण वाटतं ? हं, समजलें, मी बाहेर गेलेली पाहून या खोलींत एखादी औषध घ्यायला बसली आहे वाटतं ?

**फाल्गुन**—( हंसत ) शाबास, शाबास, चांगलं ओळखलंस ? वेडी कुठची ?

**कृत्तिका**—मुकाट्यानें कुलुपाची किल्ली द्या, नाहीं तर हें कुलुप फोडून पाहीन आंत कोण आहे तें. सोडायची नाहीं.

**फाल्गुन**—नाहींच सोडायचीस, मला ठाऊक आहे. तूं कसली हट्टी !

**कृत्तिका**—कोण आहेग बाहेर ? रोहिणी ! कोण मेली बसली आहे माझ्या खोलीत ती पाहतें. ( रोहिणी येते. )

**कृत्तिका**—कायग, या कुलुपाची किल्ली कुठं आहे ?

**रोहिणी**—( घाबरून ) माझ्यापाशीं आहे बाईसाहेब.

**कृत्तिका**—दे तर ती अगोदर.

**रोहिणी**—( तिच्या कानांत ) या वेळेला मागूं नका. ( उघड ) आहे म्हटलं पण माझ्याजवळ नाहीं बाईसाहेब. ( हळूंच ) ते गेल्यावर मग मागा. आतां मागूं नका.

**कृत्तिका**—मागूं नका म्हणजे ? तूं कोण नको म्हणणार ? आण ती इकडे.

**फाल्गुन**—( मनाशीं ) आहे म्हणाली आणि देत कां बरं नाहीं ? हें तंत्र कांहीं निराळंच दिसतं आहे. ( उघड ) तिला नको देऊस, माझ्या हातांत दे.

**कृत्तिका**—तें काय म्हणून ? मलाच ती पाहिजे. देग !

**रोहिणी**—कुठें हातांतून पडली. ( हळूंच ) मागूं नका म्हणतेंना इतक्यांत !

**कृत्तिका**—मी नाहीं ऐकायची तसलं.

**कृत्तिका**—आणि मला तरी काय करायचं आहे तुमच्या घरांत राहून! आहे माझा भाऊ, सांभाळील मला.

**फाल्गुन**— ही आजची हकीगत त्याला लिहून कळवितों, मग पाहीन कसा सांभाळतो तो. हा निघालोंच बघ त्या उद्योगाला. काय समजलीस? हडळ! डांकिण!

**कृत्तिका**—तुम्ही लिहा आणि मी लिहिते; हे नवरे म्हणजे समंध! ब्रह्मराक्षस रोहिणी, अग रोहिणा! (निघून जाते.)

**आश्विन**—हा ब्रह्मराक्षस आणि ही हडळ, जोडा खासा जमला आहे! पण मी कोण! रेवतीचा भुत्या; आतां पश्चात्तापाची दिवटी पाजळून, तिच्यावर प्रेमाचें तेल ओतून, ही तसबिरीची भेट घेऊन तिच्याकडे जातों, आणि तिचा उदे उदे करून अपराधाची क्षमा मागतों. पुढें तिची इच्छा आणि आमचं नशीब, काय होईल तें होईल!

# अंक पांचवा.

## प्रवेश १ ला

**स्थळ**–रेवतीचें घर.

(रेवती व तारका.)

**रेवती**— ( मनाशीं ) असा भिडस्तपणाच माणसाला बाधतो मेला. तें कांहीं नाहीं, दुर्जनाला दुरूनच नमस्कार केला पाहिजे. कायग तारके, आश्विनशेटजींनीं कसा निचपणा केला तो ऐकलासना ?

**तारका**— हो, ऐकला.

**रेवती**—इतकी वचनं, आणाभाका देऊन, प्रत्यक्ष रमाकांतासमोर पाणिग्रहणाचा विधि करून, शेवटीं उघड उघड लग्न करण्याचं ठरवून, अखेरीस त्यांनीं मला हें असं फशी पाडलं. तें कांहीं नाहीं. तूं अशाच्या अशीच जा, आणि सांग आजपासून मी तुम्हाला अंतरलें आणि तुम्हीं मला अंतरला ! आणि त्यांना निक्षून सांग, इतकं होऊन पुन्हां माझ्या घरीं आलांत तर मी तुम्हांला भेटायची नाहीं, तुमच्याशीं भाषण करायची नाहीं, चिठीचपाटी आली तर वाचायची नाहीं, तुमच्या नोकरमाणसाशीं बोलायचीसुद्धां नाहीं कीं निरोपसुद्धां ऐकायची नाहीं. आलं लक्षांत काय सांगायचं तें ?

**तारका**—लक्षांत आलं, पण हें फार नाहीं का होत ?

**रेवती**—फार नाहीं नि कमी नाहीं, अस्संच जाऊन सांग.

**तारका**—पण मी म्हणतें—

**रेवती**—कांहीं म्हणूं नको. अशा माणसांची अशीच खोड मोडली पाहिजे.

**तारका**—पण बाईसाहेब तेच आले पहा. आतां—

**रेवती**—येऊं देत मी माडीवर जाऊन बसतें. ते आले म्हणजे मी तुला मघांशीं सांगितलं तसच्या तसंच जाऊन सांग. (जातां जातां मागें वळून) ते गेले म्हणजे मी येईन. [जाते.]

(आश्विनशेट येतो.)

**आश्विन**—तारके, रेवती आहे का घरांत ?

**तारका**—हो आहेत. पण भेट व्हायची नाहीं असं त्यांनीं मला निक्षून सांगितलं आहे.

**आश्विन**—असं सांगण्याचं कारण ?

**तारका**—कारण काय असेल तें असो, पण काल संध्याकाळीं त्यांच्याकडे फाल्गुनराव आले होते, नि त्यांनीं त्यांच्या मनांत भरवून दिलं असावं.

**आश्विन**—रेवतीकडे फाल्गुनराव आला होता ? तर मग या गोष्टीचा उलगडा करण्याकरितां मला रेवतीला जरूर भेटलंच पाहिजे.

**तारका**—छे, छे, आपला निरोप ऐकायचा नाहीं, आपली चिठीसुद्धां पहायची नाहीं, असं त्यांनीं ठरवलं आहे. मग भेट घ्यायचं, बोलायचं, मनांतसुद्धां आणूं नका. अशा वेळीं त्यांची भेट घेण्यापेक्षां फाल्गुनरावांनाच जाऊन कां भेटत नाहीं ? मला वाटतं त्याचा उपयोग जास्त होईल.

**आश्विन**—हो, तुझंहि म्हणणं वाजवी आहे. मी तिकडेच जातों. पण माझं एक काम करशील का ? मी जाऊन येई तों तिची समजूत घाल. जराशी रदबदली कर माझ्याकरतां. तिच्या मनांत काय भरलं आहे तें मी खात्रीनं दूर करीन. पण तारके, रेवतीनं चांगलं केलन् का ?

पद ( चाल-मारगमूं कोन )

**सदय किती कोमलमती रेवती ती ॥ शोभे ही काय तिला निष्ठुरा कृति ॥ ध्रु० ॥ कानिं कुणी विष वमिलें मानुनी खरें ॥ कुपित होय भेट न घे, प्रेम सांडिती ॥ १ ॥**

**तारका**—म्हणूनच म्हणतें, तुम्ही फाल्गुनरावांना भेटून या. आपण सांगितल्या-प्रमाणं मी इकडे त्यांचं मन वळवायचं बघतें.

**आश्विन**—ठीक आहे. तिला आणखी असं सांग, तुझ्याबद्दल माझ्या मनांत आलेला सर्व संशय दूर झाला. तुझ्यावर विनाकारण दोषारोप केल्याबद्दल माझ्या मनास अतिशय पश्चात्ताप झाला आहे, म्हणून मी तुझी क्षमा मागण्याकरितां आतां इथं आलों होतों. जाऊं तर ?

**तारका**—हं चला; माझ्याकडे लागलं सगळं. ( आश्विनशेट जातो. ) यांच्या बोलण्यांत कांहीं कपट दिसत नाहीं, अगदीं खरं ना।। दिसतं.

( रेवती येते. )

**रेवती**—कायग, काय म्हणत होते ?

**तारका**—अगदीं मोठ्या कष्टानं गेले. आणि जातांना मला तुमच्याशीं रदबदली करायला सांगितली आहे. विनाकारण तुमच्याबद्दल संशय घेतल्याचा आपल्याला फार पश्चात्ताप झाल्याचं सांगत होते. तुमची भेट व्हायाची नाहीं, असं जेव्हां मी निक्षून सांगितलं, तेव्हां तर त्यांना फार वाईट वाटलं. आणि जातांनासुद्धां अगदीं कष्टी मुद्रा करून गेले. आणि तूं तरी माझ्याकरतां रदबदली कर म्हणून मला सांगुन गेले.

**रेवती**—यांचं तर हें असं सांगतेस. फाल्गुनराव तर तसं म्हणतात. तेव्हां आतां मीं काय करावं ?

**तारका**—मला वाटतं, सांगोसांगी गोष्टीवर विश्वास ठेवण्यापेक्षां फाल्गुनरावाच्या बायकोलाच विचारलं म्हणजे सर्व निकाल लागेल. शिवाय आश्विनशेटजीसुद्धां आतां तिकडेच जाणार आहेत. तेव्हां हा काय प्रकार आहे हें प्रत्यक्ष पहायला सांपडेल. असल्या गोष्टी समक्ष-समक्ष झालेल्या चांगल्या, म्हणजे संशय राहत नाहीं.

**रेवती**— ही तुझी मसलत बरी दिसते. जा, तो माझा पांघरायचा हा-घेऊन ये, म्हणजे मी कृत्तिकाबाईना जाऊन भेटतें. ( तारका जाते. ) हो, नुसत्या संशयावरच आश्विनशेटजींना मी गमावून बसलें, तर जन्मभर तळमळ लागेल. ( तारका येते. ) आणलास का ? दे इकडे. ( पांघरते ) कदाचित् कुठं गेली आहे असं आईनं जर विचारलं तर फाल्गुनरावांच्या घरीं जाऊन आतां येतें, असं सांगून गेल्या आहेत, असं सांग. ( जाते. )

—०—

# प्रवेश २ रा.

## स्थळ—रेवतीचें घर.

( मघा आणि तारका येते. )

**मघा**—कायग तारके, कुठं गेली ही ? आणि परवांपासून या पोरीनं काय घोंटाळा माजवला आहे ?

**तारका**—घोंटाळा माजला होता, पण तो आतां मिटत आला आहे. त्यासाठींच ह्या आतां बाहेर गेल्या आहेत.

**मघा**—पण मी असतांना या पोरीला स्वतःच थेर थेर करायला सांगितलं होतं कुणी ? आश्विनशेट, आश्विनशेट, म्हणून महिनाभर नाचली. तेव्हांच मी सांगत होतें. पण म्हटलं एकुलती एक पोरगी. राहिना कां तिच्याच मनाप्रमाणं त्यांच्याजवळ. पण अलीकडे दोन तीन दिवस पाहते तों ती त्यांच्याशीं भांडली म्हणून ऐकतें !

**तारका**—तसं कांहीं नाहीं, आपलं गोडीगुलाबीचं भांडण आहे.

**मघा**—बरं, काल तो फाल्गुनराव कशाला ग आला होता तिच्याकडे ?

**तारका**—तें नाहीं मला कळलं, पण आतां त्यांच्याच घराकडे जाऊन येतें म्हणून बाहेर गेल्या आहेत.

**मघा**—त्याच्या घराकडे गेली आहे? जा, आधीं माझी गाडी जोडायला सांग. असा नाचरेपणा चांगला नाहीं म्हणून मी दहादां सांगितलं आहे कारटीला; सदाच आपला छंद, हें नाहीं मला आवडत. जा तूं—

**तारका**—जातें-त्याच इतक्यांत येतील म्हणून—

**मघा**—तूं आपली गाडी तयार करायला सांग जा. तोंवर मी आंतून जाऊन येतें.

—०—

# प्रवेश ३ रा.

**स्थळ—फाल्गुनरावांचें घर.**

( भादव्या येतो. )

**भादव्या**—कालपासून एका घटकेचा विसावा नाहीं. इकडे धांव, तिकडे धांव, ही चिठ्ठी दे, तो निरोप कळीव, खरं सांग, खोटं बोलतोस, हा गोंधळ चालला आहे सारखा. पुष्कळ धनी पाहिले, परंतु ही तऱ्हा अजब आहे. हं आलं वाटतं कुणी, कोण बरं? ही आमची धनीन. आतां मात्र माझी शंभर भरली. धनीसाहेब आणि रेवती खोलींत खलबत करीत बसले आहेत, हें जर हिला कळलं तर नुसता विजेचा कडकडाट, दुसरं बोलणं नाहीं. इकडेच आली ही, धनीसाहेब, धनीसाहेब!

**फाल्गुन**—( दारांतून डोकावून ) कायरे, कोण आलं? ती आली कारे?

**भादव्या**—होय धनीसाहेब!

**फाल्गुन**—रेवती आंत आहे म्हणून सांगूं नकोस बरं का?

**भादव्या**—मला विचारतील तर सांगायचं! तशाच आंत घुसल्या तर? पण या आल्याच. दार घ्या ओढून–( फाल्गुनराव तसें करतो. ) फार झपाट्यानें येताहेत. कुणीकडे गेल्या होत्या बरं?

**कृत्तिका**—भादव्या, आहेत कां रे आंत?

**भाद्व्या**—आहेत वाटतं!

**कृत्तिका**—दुसरं कुणी आहे कां जवळ ?

**भाद्व्या**—छे, कुणी नाहीं बाईसाहेब, एकटेच पत्र लिहित बसले आहेत, आणि कोणाला आंत सोडूं नकोस म्हणून सांगितलं आहे.

**कृत्तिका**—मी नाहीं जात आंत बर! खुशाल बसूं देत एकांत करीत.

**भाद्व्या**—(मनाशीं) आं? यांना कसं समजलं? (उघड) एकांत नाहीं बाईसाहेब, कांहीं लिहित वाचित बसले आहेत.

**कृत्तिका**—इतक्यांत किती खोटं बोललास. आतां खरं बोल, खोटं बोल, मला काय करायचं आहे? संबंध सुटला आणि तंटा मिटला. मीच आतां हें घर सोडून जाणार आहें मी गेलें म्हणून त्यांना कळीव, आणि म्हणावं आतां हवातसा स्वच्छंदपणा करा. माझी कांहीं अडचण पडायची नाहीं. (जाते.)

(फाल्गुनराव आणि रेवती बाहेर येतात)

**रेवती**—मला कृत्तीकाबाईशीं एकच शब्द बोलायचा आहे.

**फाल्गुन**—छे,छे, मेहरबानी करून आतां नको.

**रेवती**—एक दोन प्रश्नांत जर माझा सर्व संशय नाहींसा होतो, तर आपण कां बरं अडथळा घालतां?

**फाल्गुन**—कां, तें विचारूं नकोस, हजार कारणं आहेत. तूं जर या घरांत तिला दिसलीस तर काय अनर्थ होईल तो नाहीं तुझ्या लक्षांत आला. शेंकडों कुतर्क काढीत बसेल. तूं इथं आहेस तोंपर्यंत माझ्या जिवांत जीव नाहीं; पण तूं तरी कां इतका आग्रह धरतेस ?

**रेवती**—आश्विनशेटजींवर जो आळ आला आहे, तो खरा कीं खोटा, याचा मला शोध लावायचा आहे, दुसरं कांहीं नाहीं कारण!

**फाल्गुन**—त्याचा उलगडा करायला ती कशाला पाहिजे? मी करतों. अग, इथं काय पुराव्यावर पुरावा. मी तुला भेटलों त्यानंतर माझ्या घरांत–तिच्या खोलींत–लपून बसलेला पाहिला.

**रेवती**—त्यांच्या खोलींत ?

**फाल्गुन**—हो, हो, अगदीं तिच्या निजायच्या खोलींत पुढें बोल—

**रेवती**—आतां काय कपाळ बोलूं ? खरं का पण हें ?

**फाल्गुन**—खरं का ? हे डोळे, हा मी ! प्रत्यक्ष त्याला पाहिला, त्याच्याशीं बोललों, त्याची फजिती केली, झाली खात्री ? तिच्याच कुळंबिणीनं, म्हणजे रोहिणीनं त्याला खोलींत लपवून ठेवला होता. अर्थात् तिच्याच मसलतीनं. आणखी किती पाहिजे पुरावा ?

**रेवती**—आणखी असेल तितका सांगा—

**फाल्गुन**—आतां नको, आणखी केव्हां तरी. आतां तुला भादव्या पोंचवायला येईल, त्याच्याबरोबर घरीं जा. कदाचित् तिनं आम्हां दोघांना एका ठिकाणीं पाहिलं तर उगीच–( ऐकून ) आली, आली वाटतं. तूं जा–भादव्या कुठं गेला बरं ?

**रेवती**—हें जर खरं ठरलं तर, थोडी कुठं आशा होती, तीहि संपलीच म्हणावं झालं ! ( सुस्कारा टाकते. )

**मघा**—( पडद्यांत ) अरे ए माझी मुलगी रेवती आंत आहे कारे ?

**रेवती**—अग बाई, माझी आई आली. तिला मी इथं नाहीं म्हणून सांगा, आणि मला कुठें तरी लपवा अगोदर-त्या खोलींत जाऊं का ?

**फाल्गुन**—म्हणजे खासं, चोरानं लपण्याकरतां चावडीकडं धांव घ्यायची. उत्तम काम ! तुझी आई त्याच खोलीकडे चालली आहे.

**रेवती**—बरं, माडीवर जाऊं का ? सांगा.

**फाल्गुन**—हें त्याच्याहिपेक्षां नामी ! म्हणजे आयतीच माझ्या बायकोच्या हातीं लागावीस. ( ऐकून ) जिना वाजतो, झाला घात, तीच आली खालीं ! आतां–हो–हो त्या पेटीच्या आड ! हो लवकर !

**रेवती**—मी अगदीं भेदरून गेलें आहें. मला हवी तिथं उचलून ठेवा, माझा बाई पाय उचलत नाहीं ! ( फाल्गुनराव तिला हातांत धरून उचलून नेतो. ) अग बाई, या केरकचऱ्यांत बसूं !

**फाल्गुन**—बैस लौकर.( ती बसते. ) निभावलं म्हणायचं; ये म्हणावं आतां !

( कृत्तिका येते. )

**कृत्तिका**—मला एक गोष्ट विचारायची आहे. माझा माहेरचा कंठा आपल्या-जवळ होता—

**फाल्गुन**—मग आतां काय त्याचं ? ( मघा आंत येते. )

**मघा**—तुम्ही गृहस्थ आणि मी नायकीण, तेव्हां न विचारतां तुमच्या घरांत शिरलें, म्हणून तुम्हांला राग येईल; पण माझा इलाज नाहीं. माझी मुलगी रेवती इथं आहे असं समजलं म्हणून मी तिचा शोध करायला आलें आहें.

**फाल्गुन**—अहो, पण—

**कृत्तिका**—ऐका हो महाराज ! तिलासुद्धां कळलं !

**मघा**—ती कशाकरितां आली आहे, हें जरी मला कळलं नाहीं, तरी तिच्या-सारख्या अल्लड पोरीला तुम्ही फूस लावून घरांत घेणं म्हणजे अगदीं, अगदीं वाईट !

**फाल्गुन**—अहो, पण सांगितलं कुणीं मीं घरांत घेतली म्हणून ? अशी भलतीच गोष्ट मी करीन कशी !

**कृत्तिका**—छे, भलतंच; त्यांच्या हातून अशी गोष्ट मुळींच व्हायची नाहीं. साधु पुरुष हे ! आहे हो, तुमच्या मुलीला यांची फूस आहे.

**मघा**—खरंच कां ?

**फाल्गुन**—छे हो, बिलकुल नाहीं. ही लबाड बोलते.

**कृत्तिका**—अगदीं खरं बोलतें मी. अहो बाई, तुमच्या मुलीला आश्रय देऊन मला घराबाहेर काढण्याचा यांचा विचार आहे.

**फाल्गुन**—तुम्ही काय ऐकतां तिचं ? तिला अलीकडे वेड लागलं आहे. त्याच्या लहरींत अशीच बडबडत असते.

**कृत्तिका**—आपल्यालाच रेवतीचं वेड लागलं आहे. मला कुणाचं लागणार वेड ?

**फाल्गुन**—( पाहून ) कुणाचं ? हे पहा येत आहेत, यांचं !

( इतक्यांत आश्विनशेट येतो. )

**मघा**—बरं झालं, देवच पावला, अगदीं वेळेवर आलांत !

**फाल्गुन**—( बायकोस ) आणि तुला नाहीं का देव पावला ? हे म्हटलं तुझे तुझे आश्विनशेट !

**आश्विन**—अहो फाल्गुनराव, मी कांहीं लपून छपून आलों नाहीं. राजरोस आलों आहे; कां म्हणाल, तर इतक्या मंडळींच्या देखत तुमच्याकडून तुमच्या नीच कृत्याचा जबाब मागायला आलों आहें.

**फाल्गुन**—मग त्याला असा राजरोसपणा कशाला ? ती खोली आहेच रिकामी ! चला आंत, बाहेरून कुलूप लावायला रोहिणी तयार आहेच.

**कृत्तिका**—असलं खोडसाळपणाचं बोलणं पुन्हां बोलाल तर जीभ झडून पडेल ! म्हणे ती खोली आहे रिकामी ! त्या मेल्या रोहिणीच्या चुकीसाठीं माझ्यावर असा भलताच आळ म्हणजे काय ?

**फाल्गुन**—तुझ्या सल्लामसलतीनं झालेल्या गोष्टींत रोहिणीची कसली चूकी ! ती काय, हुकुमाची बंदी !

**मघा**—पण या तंट्याशीं मला काय करायचं आहे ? मी माझ्या मुलीसाठीं आलें आहे. ती या घरांत आहे कीं नाहीं, सांगा.

**फाल्गुन**—या घरांत ? आमच्या घरांत अशा नायकिणीच्या मुली येत नसतात. अहो, तिची माझी ओळखसुद्धां नाहीं.

**कृत्तिका**—ओळख नाहीं, चांगली मांडीवर घेऊन बसलां होतां, आणि ओळख नाहीं म्हणायला कांहीं वाटतं कां ?

**मघा**—मांडीवर ! म्हणजे ? सांगा पाहूं ? कधीं ? कुठं ?

**कृत्तिका**—कुठं काय ? तिथं ह्या-झाडाखालीं-त्यांनाच विचारा म्हणजे सांगतील सगळं ! " ज्यानं करावं पाप, त्यानंच ओतावं माप " मी कशाला उच्चारूं !

**फाल्गुन**—काय आगलावी बायको आहे पहा.

**मघा**—तें जाऊं द्या, पण मांडीवर कधीं घेतली होती ?

**कृत्तिका**—मी सांगतें, काल सकाळीं त्या आंब्याच्या झाडाखालीं.

**आश्विन**—हं हं हं हं! कृत्तिकाबाई, हें साफ खोटं, मी शपथेवर सांगतों—

**फाल्गुन**—आणि मीहि पाहिजे त्याची शपथ घेऊन सांगतों कीं यांत एक अक्षरसुद्धां खरं नाहीं. ( आश्विनशेटच्या जवळ जाऊन कुजबुजतो. )

**कृत्तिका**—समजले! चोराला चोर सामील. तुम्ही दोघांनीं मिळून कट केला आहे.

**फाल्गुन**—मघाजी, ती काय सांगते, आणि तुम्ही काय ऐकतां? वाटसरूलासुद्धां शंका आली नसती वास्तविक.

**आश्विन**—त्या गोष्टींत शंका घेणं म्हणजेच पातक.

**कृत्तिका**—तुम्ही काय ऐकतां त्यांचं? दोघेहि लबाड आहेत.

**आश्विन**—म्हणजे हे बघा, रेवती वाटेंत घेरी येऊन पडली, तिला या फाल्गुनरावांनीं सांवरून धरून शुद्धीवर आणली, हा यांचा अपराध?

**मघा**—यांत काय अपराध? उपकाराला का अपराध म्हणायचा! ती गोष्ट मला कळली आहे. घरीं आल्यावर देखील तिला काल एकदां घेरी आली होती.

**फाल्गुन**—बघा म्हणजे झालं! आणि ही दीड शहाणी असं म्हणते.

**आश्विन**—अहो, मी सांगतोंना? रेवती थोडीशी गर्विष्ठ आहे, म्हणून तिचं माझं पटत नाहीं. एरव्ही वागणुकीसंबंधानं म्हणाल तर गरतीची छाती नाहीं तिला नांवं ठेवायला.

**फाल्गुन**—बरोबर आहे. अगदीं बाजवी! मघाजी, बोला; ही काय ती खरी हकीगत. बोला, आतां या प्रकरणांत माझ्याकडे काय दोष?

**कृत्तिका**—ही सगळी खरी हकीकत का? चोरून कां ठेवतां आतां? ती तसबीर तुम्हाला नजर केली ती—

**फाल्गुन**—तिनं मला नजर केली, कीं या आश्विनशेटजींनीं तुला नजर केली?

**कृत्तिका**—ऐका, ऐका, आश्विनशेटजी, ऐका ही स्वारींचीं मुक्ताफळं!

**आश्विन**—फाल्गुनराव, हें तुम्ही निव्वळ खोटं बोलतां. मी यांना मुळींच तसबीर दिली नाहीं.

**फाल्गुन**—हें तुम्ही अत्यंत खोटं बोलतां. तुम्ही तिला दिलीत, तिनं तिचं चुंबन घेतलं, तें मीं पाहिलं, आणि मग तिच्या हातून ती तसबीर मी काढून घेतली.

**आश्विन**—हें सुद्धां खोटं. ती तसबीर मी रेवतीला दिली होती. तिला घेरी आली, तेव्हां तिच्या हातांतून गळून पडली, ती तुमच्या कुटुंबाला सांपडली.

**कृत्तिका**—हो, असं झालं खरं, उगीच कां म्हणून खोटं बोलावं? मला ती त्या झाडाखालीं सांपडली.

**आश्विन**—ऐका फाल्गुनराव, झाली खात्री ?

**फाल्गुन**—तसबिरीचं जाऊं द्या हो, त्या बाबतींत तुमचं म्हणणं खरं धरून चालतों मी. पण तुम्ही हिच्या निजायच्या खोलींत लपून बसलां होतां, त्याचा द्या जबाब. म्हणे झाली खात्री का!

**कृत्तिका**—त्याचा काय जबाब ? मघांशीं नाहीं कां सांगितलं, कीं ती त्या रोहिणीची चुकी म्हणून, त्यांच्याकडे काय ह्याचा संबंध! कां उगीच आपलं "सोनुबाईन चोरली सरी, आणि साळुबाईच्या गळ्यांत बांधा दोरी," असं करण्यांत काय अर्थ?

**मघा**—मला वाटतं फाल्गुनराव, हा सगळा संशय तुमचा तुम्हांला बाधला. तसंच या बाईचं. मी कशाला बाजाराच्या भाकरी भाजूं म्हणा, पण मला वाटलं तें सांगितलं. या बाईनं उगीच माझ्या मुलीचं नांव मध्यें गोवलं झालं!

**कृत्तिका**—उगीच गोवलं का? म्हणजे मीच खोटी? बरोबरच आहे. "कावळ्यांत बगळा आणि तोसुद्धां झाला कावळा." जे कोणी येतं तें त्यांना मिळतं. मिळा म्हणावं, मी आत्तांच्या आत्तां चालती होतें भावाकडे.

**फाल्गुन**—तूं मोठ्या आनंदानें चालती होशील भावाकडे, पण मी जाऊं दिली पाहिजे ना? ( तिला आडवतो. )

**कृत्तिका**—मग मला खोडा घालून अडकवून ठेवणार कीं काय ?

**फाल्गुन**—हो, हो.

**कृत्तिका**—बायको झालें हें पातक झालं वाटतं ?

**फाल्गुन**—अलबत !

**कृत्तिका**—ह्मणजे मला इतकीसुद्धां मोकळीक नाहीं का ?

**फाल्गुन**—मुळींच नाहीं.

**कृत्तिका**—तर मग जन्मभर तुह्मी मला अशीच कां छळणार ?

**फाल्गुन**—यांत काय संशय !

**कृत्तिका**—बरोबर आहे. "गोठणचं गाईल आणि घरांतली बाइल घाल तितका मार खाईल."

**मघा**—बरं, फाल्गुनराव, खरंच माझी मुलगी इकडे आली नाहींना ?

**फाल्गुन**—छे हो, असून कां मी नाहीं म्हणेन. पहा हवी तर कुठें लपून ठेवली आहे का— (इतक्यांत रेवती खोकते)

**आश्विन**—आतां कोणी खोकल्यासारखा नाहीं का आवाज आला ?

**फाल्गुन**—(स्वतःशीं) छे, छे, छे, घात झाला; घात झाला, घात झाला !

**आश्विन**—कांहो तुम्हीं नाहीं कां ऐकला ?

**फाल्गुन**—तिकडे ती रेवती–रेवती नव्हे, आपली रोहिणी पलीकडे काम करतां करतां खोकली असेल झालं ?

**कृत्तिका**—रोहिणी ! रोहिणी कशी खोकेल ? तिला तर मीं बाहेर कामाला पाठविली आहे.

**फाल्गुन**—रोहिणी नसेल तर भाद्रव्या असेल.

**कृत्तिका**—भाद्रव्या नव्हे हा. बायकोचा आवाज आहे हा. !

**फाल्गुन**—बायकोचा कुठला ? इथं कोणाची आली बायको ! भाद्रव्याच तो.

**कृत्तिका**—त्या पेटीच्या बाजूनं आला, पहातें.

( फाल्गुनराव अग, अग, करीत असतां कृत्तिका जाते. रेवती खोकत उभी राहते.)

**कृत्तिका**—हा पाहिलात का भादव्या! भादव्या, ये बाबा असा पुढें. ( तिला धरून आणून) कांहो. रेवती नव्हती ना इथें? मग कां आभाळांतून उतरून पेटीच्या आड गेली वाटतं?

**भादव्या**—( मनाशीं ) ही सगळी मसलत अंगावर ढासळली. हिला हा मध्येंच खोकला कुणीकडून आला कोण जाणे!

**कृत्तिका**—कायग? आमच्या स्वारीनं तुला बोलावली म्हणून तूं आलीसना!

**रेवती**—मी होऊन आलें. फाल्गुनरावांकडे कांहीं नाहीं त्यांतलं.

**कृत्तिका**—इथं कां आलीस?

**रेवती**—तुम्हां नवराबायकोंचा आचरटपणा मला बाधायला लागला—

**कृत्तिका**—माझा नव्हे, या स्वारीचा आचरटपणा. या आश्विनशेटजींवर विनाकारण भलताच आळ घेतला त्यांनीं!

**आश्विन**—खरंच, तो तर फाल्गुनरावांचाच आचरटपणा. अहो मघाजी, ही रेवती इथं कां आली आणि या पेटीच्या आड कां लपली होती, याचा जबाब पाहिजे.

**रेवती**—अशी आडून गोळी कशाला? मी सांगते. ती तसबीर या कृत्तिकाबाईना तुम्हीं दिली, असं या फाल्गुनरावांनीं मला सांगितलं, पण मला तें खरं वाटेना. म्हणून मी कृत्तिकाबाईचीच गांठ घ्यावी आणि संशयाचा उलगडा करून घ्यावा म्हणून इथं आलें, पण हें बघ आई, त्या घरांत नव्हत्या, म्हणून इथं जरा उभी होतें. इतक्यांत तूं आलीस म्हणून भिऊन लपून बसलें.

**आश्विन**—यांत कांहीं तसं वावगं नाहीं दिसत.

**मघा**—पण पोरी, खऱ्या गोष्टीला भ्यायचं काय कारण होतं? मला घरींच सांगितलं असतंस तर मीच येऊन भेटलें असतें या बाईना. पण आतां काय राहिलं त्याचं! झालाना सगळ्यांचा संशय दूर?

**आश्विन**—माझा तर झाला.

**रेवती**—मला तसा संशय नव्हताच आधीं.

**मघा**—अहो फाल्गुनराव, झालना सगळा उलगडा ?

**फाल्गुन**—उलगडा कसा होतो ! या आतां तुम्हांला मी सगळी हकीगत सांगतों. पण हिच्या समक्ष नको. अशा इकडे या. (तिला नेऊं लागतो.)

**कृत्तिका**—माझ्या समक्ष कां नको. ? अहो मघाबाई, मलाहि यांच्या पुष्कळ लबाड्या सांगावयाच्या आहेत. मीहि येतें. (तीहि जाते.)

**मघा**—(जातां जातां) आलेंच बरं कां ? अश्विनशेटजी, आहांतना इथं ? (तिघेही जातात.)

(रेवती व आश्विनशेट तोंडें वळवून उभीं राहतात.)

**रेवती**—अशी चूक म्हणून माझ्या हातून कधीं व्हायची नाहीं.

**आश्विन**—मी पुन्हां असा संशय येऊं द्यायचा नाही.

**रेवती**—खरंच मी अगदीं वेडेपणा केला.

**आश्विन**—माझ्या हातून हा मूर्खपणाच झाला.

**रेवती**—बरं, झालं तें झालं, आतां काय त्याचं ?

**आश्विन**—हो, होऊन गेल्यावर मग काय करायचं ?

**रेवती**—पण हा अबोला चालायचा किती वेळ ?

**आश्विन**—पण तिहीचा आणि सहाचा बसायचा कसा मेळ !

**रेवती**—ज्यानं पहिल्यांदा भांडण काढलं, त्यानं बसवावा हवा तर. मी कांहीं क्षमा मागितल्याशिवाय बोलायची नाहीं.

**आश्विन**—आणि क्षमा कशी मागावी हें कळल्याशिवाय माझ्या तोंडांतून एक अक्षरसुद्धां निघायचं नाही.

**रेवती**—त्यांत काय करायचं ? क्षमा मागायची म्हणजे कांहीं पाया नको पडायला. नुसतं चुकलों चुकलों म्हणायचं !

**आश्विन**—चुकलों, क्षमा कर. असं दहादां म्हटलं, पण राग जाऊन समजूत पडत नाहीं, त्याला काय करायचं ?

**रेवती**—दहादां म्हटलं तसंच आणखी एकदां !

**आश्विन**—( तोंड फिरवून ) इतकं कळल्यावर आणखी एकदां का शंभरदा. रेवती !

**रेवती**—झाला आरंभ !

**आश्विन**—रेवती–

**रेवती**—( तोंड फिरवून ) प्रियकर प्राणपति–

**आश्विन**—वाहवा ! मी तुझ्याविषयीं खोटा संशय घेतला, चुकलों, चुकलों.

**रेवती**—( हसंत ) पुरे, पुरे, पुरे !

**आश्विन**—हंसलीरे हंसली, झालं आतां ?

**रेवती**—ती तसबीर दिल्याशिवायच झालं म्हणतां ?

**आश्विन**—ही घे तसबीर. ( देतो. )

**रेवती**—( हंसत ) शेवटीं तुम्हींच हरलांत अं ? तुम्ही अगोदर बोललांत, मग मी !

**आश्विन**—अग, तुझ्या माझ्या भांडणांत मीच हरायचा नेहमीं ?

( इतक्यांत फाल्गुनराव, मघा, कृत्तिका हंसत बाहेर येतात. )

**फाल्गुन**—आतां मात्र माझ्या पागलपणाबद्दल मला हंसूं येतं. त्यांत हिच्या मूर्खपणाबद्दल तर फारच. खरंच सांगतों आश्विनशेट, इतकी उघड उघड गोष्ट आम्हांला कळली नाहीं म्हणजे केवढं आश्चर्य ! तुमच्या माझ्यांत त्या–"ती" नं केवढा घोंटाळा केला होता !

**आश्विन**—तुम्ही "ती" म्हणजे कृत्तिका समजत होतां—

**फाल्गुन**—आणि तुम्ही रेवती समजत होतां. मिळून तुम्ही आम्ही दोघेहि धोत्रा प्याले होतां. आणखी पहा— ( हंसत हंसत कुजबुजतात. )

**कृत्तिका**—रेवती, तूं म्हणत होतीस तें खरंग खरं! या तुझ्या आईनं कशी हां हां म्हणतां समजूत घातली. काय मेलं डोक्यांत शिरलं होतं कुणाला ठाऊक? पण त्यांच्या दहा पांच प्रश्नांत निकाल!

**आश्विन**—फाल्गुनराव, मी सांगत नव्हतों तुम्हांला! मी तुमच्या घरीं पहिल्यांदांच काल काय तो आलों. ह्याच्यापूर्वी कधीं पाऊल नाहीं, कीं तुमच्या कुटुंबाशीं भाषण नाहीं.

**फाल्गुन**—तें आतां सगळं ध्यानांत आलं. अहो, एकदां मनुष्य संशयाच्या डगरीवरून घसरायला लागलं कीं चाललं घसरत खालीं खालीं. ज्या रंगाचा चष्मा त्याच रंगाची वस्तु, हेंच खरं.

**मघा**—आणि कृत्तिकाबाई, तुम्हीं तरी माझ्या मुलीच्या संबंधानं अगदीं राईचा डोंगर केला होता!

**फाल्गुन**—ही ना? ही मुळापासूनच अशी संशयी.

**कृत्तिका**—( हंसत ) आणखी आपण काय कमी? माझ्यापेक्षां कांकणभर जास्तच. मला कारण तरी लागतं, आपल्याला तें सुद्धां नको.

**भाद्र्या**—( दुरूनच ) धनीसाहेब, मी म्हणत नव्हतो. पण आपण उलट मलाच पागल ठरवलं होतं.

**रोहिणी**—मी किल्ली देत नाहीं म्हटलं, तेव्हां बाईसाहेबानीं केवढे डोळे केले होते, ते तूं पाहिलंस ना भाद्र्या?

**मघा**—ते झालं तुमचं दोघांचं, आणि या आश्विनशेटजींनीं सुद्धां तुमचाच कित्ता गिरवला होता फाल्गुनराव!

**आश्विन**—हो हो, बरोबर, रेवतीनं कृत्तिकाबाइचा उचलला म्हणून मी फाल्गुनरावांचा पसंत केला.

**रेवती**—पण पहिल्यांदां आपण, मग मी!

**मघा**—हा सगळा तसबिरीचा घोंटाळा ! असो, झालं ते झालं, यापुढें त ज्यानं त्यानं नीट जपून वागावं, म्हणजे झालं ? ( **बुवा** आंतून **'हृदयीं धरा हा बोध खरा'** हें पद म्हणतो. व बाहेर येऊन )

**बुवा**.—कां ? माझ्या उपदेशाचा सत्यपणा तुम्हांला बिंबलाना ? आतां तरी कार्तिकनाथाच्या दीपोत्सवाकरितां दानधर्म कराल कीं नाहीं ?

**फाल्गुन**—हिच्या एक मण तेलाबरोबर माझेहि एक मण तेल पाठवून देतों. ह्या शुभप्रसंगीं कार्तिकनाथापाशीं आमची अशी प्रार्थना आहे कीं,

## कोरस

**चिन्मया सकलहृदया. सदया, दे या गोविंदा, वर वरदा, कलिमल-विलया ॥ ध्रु० ॥ विषयपिपांसापीडितसा, निःसारा संसारा, मृगनीरासम भुललों, मी, परि फसलों, विस्मरलों तव भजनीं लागाया ॥ १ ॥ काम-धनाशा ही विवशा मन्नाशा सरसावे, तत्पाशीं सांपडलों, ये धांवोनीं यांतूनी, सोडवुनी मज घ्याया ॥२॥ सौख्य सदा नव ज्या ठायीं, तापाच पापाचा लेश नसे, शांति वसे, ने येवोनी, त्या स्थानीं, सुखभुवनं दासा या ॥ ३ ॥**

संग्रहालय